…ाक ४

मध्यप्रदेश संशोधन मंडळ ग्रंथमाला

नागपूरचा सांस्कृतिक इतिहास

लेखक :

देवीदास गोविंद लांडगे

१९५४

क्रमांक ४

मध्यप्रदेश संशोधन मंडळ ग्रंथमाला

नागपूरचा सांस्कृतिक इतिहास

लेखक :—देवीदास गोविंद लांडगे

प्रकाशक :— मध्यप्रदेश संशोधन मंडळ, नागपूर.

मुद्रक—गोपाल प्रिंटिंग प्रेस, नागपूर.

प्रथम संस्करण] १९५४ [किंमत रु. २

अनुक्रमणिका

प्रकाशकाचे दोन शब्द.

मध्यप्रदेश संशोधन मंडळानें १९३७ सालीं 'नागपूरकर भोसल्यांची बखर' या दुर्मिळ पुस्तकाचें पुनर्मुद्रण केलें. त्यानंतर सन १९४९ सालीं 'निवडक निबंध, भाग १' हें पुस्तक प्रसिद्ध केलें आतां चार वर्षांनीं श्री. दे. गो. लांडगे, यांचे 'नागपूरचा सांस्कृतिक इतिहास' हें संशोधनात्मक पुस्तक मंडळातर्फे प्रकाशित होत आहे त्याचप्रमाणें इतरहि प्रकाशनें अपेक्षित आहेत. मध्यंतरींच्या काळांत अनेक अडचणींमुळें कांहीं प्रकाशन करतां आले नाहीं याचा खेद होतो.

कोणत्याही प्रदेशाचा राजकीय इतिहास शिला लेख, ताम्रपट, नाणीं कागदपत्र इत्यादि उपलब्ध साधनांवरून कालान्तरानेंही थोडा बहुत सांगता येतो. पण सांस्कृतिक इतिहासाचें तसें नाहीं. त्याची माहिती समकालीन किंवा नजीकच्या उत्तरकालीन लेखकांनी लेखनिविष्ट करून ठेवली नाहीं तर मागाहून जमविणें कठीण जातें. या कारणामुळे प्राचीन भारताच्या राजकीय इतिहासाची चौकट आता बरीचशी निश्चित झाली आहे, पण त्याच्या सांस्कृतिक इतिहासाचें आपलें ज्ञान अत्यंत मर्यादित आहे. या दृष्टीनें श्री. लांडगे यांच्या प्रस्तुत पुस्तकाचे महत्त्व असामान्य आहे.

श्री. लांडगे यांना प्रस्तुत पुस्तकांतल्यासारखी सांस्कृतिक इतिहासाची माहिती जमविण्याचा अत्यंत हव्यास आहे. त्यांनी त्याकरितां अतिशय परिश्रम केले आहेत. उपलब्ध प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथ व लेख चाळले आहेतच, पण त्याशिवाय अनेक वृद्ध गृहस्थांची समक्ष गांठ घेऊन त्यांच्या तोंडून मिळालेली माहिती संगृहीत केली आहे, अनेक जुन्या इमारती–देवळें, मशीदी, प्रार्थना–मंदिरें--स्वतः पाहून त्यांच्याविषयीं माहिती अत्यंत साक्षेपानें जमविली आहे किंबहुना त्यांनी जुन्या नागपूर शहराविषयीं व त्यांतील इमारती, व्यक्ति, सामाजिक जीवन इत्यादिकांविषयीं जशी माहिती जमविली आहे तशी भारतांतील इतर नगराविषयीं क्वचितच

कोणी जमविली असेल. प्रस्तुत पुस्तकांत त्या माहितीचा अत्यल्प अंश आला आहे एवढें सांगितलें म्हणजे कोणासही त्यांच्या अपार परिश्रमाची कल्पना करतां येईल.

महाराष्ट्रीय जनतेकडून प्रस्तुत पुस्तकाचें स्वागत झाल्यास मंडळास श्री. लांडगे यांचा यांच विषयावरील बृहद् ग्रंथ प्रकाशनास घेण्याची उमेद येईल.

पुस्तकांत अनवधानामुळें राहून गेलेल्या मुद्रण दोषांपैकीं महत्त्वाचे दोष शुद्धिपत्रांत दुरुस्त केले आहेत. ते जमेस धरून वाचकांनी पुस्तक वाचावे ही विनंती.

नागपूर
ता. २०-११-१९५३

वा. वि. मिराशी,
अध्यक्ष, कार्यकारी समिति,
मध्यप्रदेश संशोधन मंडळ.

हृद्गत

Each generation is but one link in the lengthening chain. —Burke.

हल्ली राजकीय मतमतान्तरें, आन्तरराष्ट्रीय समस्या, धान्योत्पादन, श्रमजीवी व पुंजीपती यांच्यातील तेढ इत्यादि विषयांची दैनंदिन जीवनांत एवढी गर्दी उसळली आहे की, इतिहास व परंपरा यांचा मागोवा घ्यावयास कोणास फुरसद नाही. तथापि राष्ट्राच्या जीवनांत काय किंवा व्यक्तिजीवनांत काय असे क्षण उद्‌भवतात, कीं तें राष्ट्र किंवा ती व्यक्ति प्रसंग विशेषीं हतबुद्ध होते व जरा मागें पाहूं लागते. याच्या उलटहि विचारसरणी पहावयास मिळते. तरी या दुसऱ्या पक्षालाहि जुना इतिहास व परंपरा कितपत उधळून लावावयाची याकरितां तरी पूर्वेतिहासाचें निरीक्षण करावेंच लागते. तेव्हां दोघांच्याहि दृष्टीनें आत्मनिरीक्षणाची जरूरी भासते. वैयक्तिक जीवनांत तर हें पुष्कळदां उपकारक ठरते व जे पिंडीं तें ब्रम्हांडीं हा न्याय जर खरा असेल, तर समाजालाहि मधून मधून अन्तर्मुख व्हावें लागते.

२. परवा परवा पर्यंत हा प्रान्त जरी मागासला समजला जात होता, तरी त्याला इतिहास आहे, हें सांगावयास नको. हल्ली तर प्राचीन इतिहासाच्या संशोधकांनी या प्रान्ताच्या पूर्व परंपरेवर बराच प्रकाश पाडला आहे. किंबहुना राजकीय इतिहासापेक्षां प्राचीन सांस्कृतिक इतिहासच अधिक उपलब्ध झाला असून त्यावरच कै. या. मा. काळे यांच्या सारख्यांनी वऱ्हाडचा इतिहास लिहून भर दिला आहे. त्यांनीं नागपूर प्रान्ताचाहि इतिहास लिहिला, परंतु त्यांत त्यांना सांस्कृतिक इतिहासाला फारसें स्थान देतां आलें नाही. ही उणीव अंशतः दूर व्हावी व पुढें मागें विस्तृत इतिहास कोणी लिहूं लागल्यास, पूर्व प्रयत्नाचा झालाच तर कांहीं त्याला उपयोग व्हावा या बुद्धीनें, हें मुख्यतः नागपूर पुरतें छोटेसें सांस्कृतिक इतिहासाचें पुस्तक यथामति मध्यप्रदेश संशोधन मंडळाच्या आज्ञेनें लिहावयास घेतलें. याचा स्वीकार कसा काय

होतो हें पाहून मी याच विषयावर जें मुळांत विस्तार पूर्वक लिहून ठेविलें आहे, तें वाचकांपुढे मांडीन. या पुस्तकांत सांस्कृतिक इतिहासाला आवश्यक तेवढी राजकीय इतिहासाची पार्श्वभूमीहि जोडण्यांत आली आहे.

प्रस्तुत प्रयत्नाविषयीं आणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे. ती ही की यांत आलेली माहिती जरी उपलब्ध मुद्रित व अमुद्रित ग्रंथांवर किंवा कागदपत्रांवर आधारलेली असली, तरी त्यांतील कांहीं अंश लेखकानें ज्या सुबुद्ध व विश्वसनीय वृद्धांच्या (या सर्वांचा लेखक ऋणी आहे) कांहीं वर्षांपासून भेटीगाठी घतल्या, त्यांचाहि उपयोग झाला आहे, अर्थात् शक्यतोंवर लिखित आधारांच्या अनुरोधानें उपरोक्त माहिती तपासून घेतली आहे. ती चुकली असल्यास वाचकांनी मला तसें कळवावे म्हणजे मी त्यांचा आभारी होईन.

शेवटीं, मध्यप्रदेश संशोधन मंडळातील माझे सहकारी व मार्गदर्शक, विशेषत: मंडळांचे कार्याध्यक्ष माझे सन्मान्य मित्र म. म. वा. वि. मिराशी, उपाध्यक्ष, प्रि. श्री. ल. पांढरीपांडे व प्रा. पां. कृ. सावळापूरकर व प्रि. ह. ना. नेने यांनी या पुस्तिकेच्या बाबतींत ज्या उपयुक्त सूचना केल्या व इतर साहाय्य केलें, त्याबद्दल त्यांचे व मंडळाचे आभार मानून व माझे ज्येष्ठ मित्र डॉ. य. खु. देशपांडे यांस नमन करून ही नम्रकृति वाचकांपुढे ठेवतों.

या पुस्तिकेच्या मुद्रणांत माझे मित्र प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांनी अत्यंत मदत केली आहे. त्यांनी जर अंग मोडून प्रुफें तपासण्याचे जिकिरीचें काम केलें नसते, तर पुस्तक जेवढ्या अवधींत बाहेर येत आहे, तेवढ्या अवधींत तें बाहेर आलें नसते. तेव्हां मी त्यांचा अतिशय ऋणी आहे. तसेच गोपाल प्रिंटिंग प्रेसचे मालक व मुद्रक यांनाहि मी अन्त:करणापासून धन्यवाद देतो.

दे. गो. लांडगे.

नागपूरचा सांस्कृतिक इतिहास
प्रस्तावना

(ले. डॉ. यशवंत खुशाल देशपांडे एम्. ए. एल्. एल्. बी. डी. लिट्.
शारदाश्रम, यवतमाळ.)

नागपूरचा 'सांस्कृतिक इतिहास' ही पुस्तिका मध्यप्रदेश संशोधन मंडळाचे उत्साही आणि कर्तव्यदक्ष चिटणीस श्री. दे. गो. लांडगे यांनी लिहिली आहे. किंबहुना 'नागपूरचा राजकीय व सांस्कृतिक इतिहास' हा सुमारें ५०० पृष्ठांचा मोठा ग्रंथ प्रकाशित करण्याचा श्री. लांडगे यांचा संकल्प असून त्या ग्रंथाचें साहित्य आणि लिखानहि त्यांच्या जवळ तयार आहे. त्या विस्तृत ग्रंथाची वाचकांना कल्पना यावी म्हणून ही प्रस्तुत पुस्तिका म्हणजे एक वानगी आहे.

वास्तविक श्री. दे. गो. लांडगे यांचा पिंड म्हणजे इतिहास आणि वाङ्मय यांच्या संशोधनाचा, तथापि उच्च शिक्षणक्रम पुरा झाल्यानंतर प्रथम शिक्षण क्षेत्रांत आणि नंतर सहकारी पेढयांच्या व्यवसायांत व सार्वजनिक क्षेत्रांत यांनी कामगिरी केली. उद्योग धंद्यांत मग्न असतांना सुद्धां मधून मधून प्रवास वर्णने वगैरे सारखे कित्येक लेख लिहून आपली साहित्योतिहास विषयक आवड त्यांनी जागृत ठेविली होती.

सुमारें ७ वर्षां पूर्वी सेवा निवृत्तीच्या संधिकालांत श्री. बाबासाहेब लांडगे मुद्दाम यवतमाळला आले आणि दोन दिवस राहून त्यांनी नागपूरच्या सांस्कृतिक इतिहासा संबंधाने स्थानिक संशोधन करण्याची आणि त्यावर विस्तृत ग्रंथ लिहिण्याची आपली योजना मला समजावून सांगितली. स. १९१३

पासून यवतमाळ जिल्हा बँक व प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह बँक यांच्या कारभाराशीं माझा दोन तपांचा संबंध असल्यामुळें आणि श्री. लांडगे यांची नोकरी प्रॉव्हिन्शिअल बँकेतच असल्यामुळें त्यांच्या कर्तबगारीवर माझा पूर्ण भरंवसा होता, आणि म्हणून हें संशोधन कार्य स्वतःच्या पैशाच्या व परिश्रमाच्या बळावर करावयाचें जें त्यांनी ठरविलें होतें, तें अवश्य हातीं घेण्यास मी त्यांना प्रोत्साहन दिलें.

या ७ वर्षांच्या दीर्घकालांत जेव्हां जेव्हां मी नागपुरास कामानिमित्त येई, तेव्हां तेव्हां श्री. बाबासाहेब लांडगे यांच्याशी माझ्या बैठकी होत आणि त्यावेळीं त्यांनी चालविलेल्या या नागपूरच्या संशोधना संबंधी आणि त्या वरील लिखाणा संबंधी चर्चा होत असे. त्यामुळें या संशोधन कार्याकरितां श्री. लांडगे यांनी किती पैसा, वेळ आणि परिश्रम एक निष्ठेने खर्ची घातले, याची मला पूर्ण जाणीव आहे. त्यांना खास नागपूर शहरांत आणि सभोंवताली जुनी घराणीं, वयोवृद्ध पुरुष व स्त्रिया, जुने वाडे व मंदिरे, स्मशाने इत्यादिकांकडे जाऊन माहिती गोळा करतांना किती जणांची मर्जी संभाळावी लागली असेल, किती हेलपाटे खावे लागले असतील, याची जाणीव "जावे त्याचे वंशा" तेव्हांच होण्यासारखी आहे. श्री. बाबासाहेबासारखा शिस्तबी व काटेकोर वर्तनाचा गृहस्थ आज ७ वर्षें द्रव्याकडे पाठ फिरवून वैयक्तिक संशोधनाकडे स्वतःला वाहून घेतो, हें पाहून वैयक्तिक संशोधनांत कांही किमया आहे, असें म्हणावेसें वाटते. त्यांनी मिळविलेली समग्र माहिती जेव्हां जनतेपुढे येईल तेव्हां येईल. तत्पूर्वी ती शक्य तेवढी संक्षेपाने श्री. लांडगे यांच्याकडून एकत्रित करवून घेऊन ती संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल संशोधन मंडळाच्या कार्यकारी मंडळास धन्यवाद दिले पाहिजेत.

शंभर फुटी डामरी सडकेवरून स्वैरगतीने प्रवास करण्याची संवय असलेल्यास तारेवरून तोल संभाळून चालण्यात यशस्वी होणे म्हणजे एक प्रकारचा विक्रमच आहे. या पुस्तिकेंत श्री. बाबासाहेब यांची हीच स्थिति झाली आहे. त्यांचेशी खासगी संभाषण करा, त्यांचे व्याख्यान ऐकां, त्यांचे लेख किंवा निबंध वाचा, त्यांच्या शब्द संपत्तीचा ओघ सारखा वाहतो. या

पार्श्वभूमीवर श्री. बाबासाहेबांनी थोडक्यांत आपला विषय मांडण्यात खरोखरीच अपूर्व यश संपादन केलें आहे. आपण तारेवरची कसरत करीत आहों याची जाणीव श्री. बाबासाहेबांना असल्याचें पानापानातून दिसते.

आतां आपण पुस्तिकेच्या अंतरंगाकडे वळूं. या पुस्तिकेंत कथन पद्धति वापरली आहे. त्यामुळें तें वाचनीय झालें आहे. छोटी छोटी वाक्यें, सरळ सुबोध भाषा, संक्षेपाने निवेदन, त्यामुळें चक्षुःपटा पुढून अनेक प्रसंग आणि घटना भराभर सरकत जात आहेत, असें वाटते. हा सांस्कृतिक इतिहास नागपूरकर भोसल्यांच्या राजवटीच्या पार्श्वभूमीवर आधारल्यामुळें पानांपैकीं केवळ १० पानें भोसल्यांच्या इतिहासास दिलीं असून, १२१ तत्पूर्वीचा इतिहास केवळ २ पानांतच संचविला आहे. १३ व्या पानापासून सांस्कृतिक इतिहासाला सुरुवात झाली आहे. प्रथम कर्तृत्ववान् पुरुष, त्यामध्यें सतकुळी मराठे आणि इतर मराठे, नंतर ब्राम्हण, मुसलमान प्रभु आणि इतर घराणीं, असा प्रसिद्ध पुरुष आणि घराण्यांचा क्रम लाविला आहे. या नंतर धार्मिक व साहित्यिक भाग येतो. त्यांतहि आधीं वैदिक, नंतर संत, नंतर पंडित व त्यानंतर हरिदास पुराणिक असें विवेचन आहे. पुढील भागांत सार्वजनिक उपासना स्थानें, हिंदु मंदिरे, जैन मंदिरे, मशींदी व ख्रिस्ती मंदिरे असा विषय आहे. यापुढें कलात्मक आणि बौद्धिक जीवन दिलें आहे. यांत गायन वादन आणि त्यांच्या विविध अंगाचा परामर्ष घेतला आहे. पुढील भागांत शिक्षण आणि शिक्षण संस्था यांचे वर्णन आलें आहे. त्या नंतर सांघिक व वैयक्तिक सार्वजानिक जीवनाची चर्चा केली आहे. यांत मल्लविद्या, गोरक्षण, पाणी व पाणवठे यांचे दिग्दर्शन करून सामाजिक जीवनाच्या इतर पर्यायाकडे लेखक वळले आहेत. यांत दिनचर्या, विवाह विधी व संस्कार यांचे सिंहावलोकन करून शेवटल्या म्हणजे ९ व्या भागांत लोकसंख्या, बाजार भाव, वेषभूषा व अगदी शेवटीं नागपुरी भाषा हे विषय चर्चिले आहेत. अंती नियोजित मर्यादा संपल्यामुळें कांहीं विषय टाकून दिल्याचे लेखकानें सांगितलें आहे.

सारांश, प्रथम रघूजीच्या राज्य स्थापनेपासून सुमारें सव्वाशे दीडशे वर्षांचा नागपूरच्या सांस्कृतिक इतिहासाचा या पुस्तिकेंत परामर्ष घेतल

आहे. श्री. लांडगे यांनी परिश्रमपूर्वक इतकी माहिती गोळा केली आहे की, नागपूरच्या सांस्कृतिक इतिहासांत ज्या घराण्यान्ना अथवा व्यक्तीचा संबंध आला आहे असें घराणें किंवा व्यक्ति क्वचितच वगळल्या गेली असेल. या काळांत होऊन गेलेलीं कर्तबगार घराणीं आणि पुरुष यांच्या विद्यमान वंशजांना या सांस्कृतिक इतिहासांत बरीच नवीन माहिती आढळून येईल. श्री. लांडगे यांनी आपलें कर्तव्य निरपेक्ष बुद्धीने केलें आहे. आपल्या पूर्वजांच्या कर्तबगारीचे हें वाङ्मय स्मारक रक्षून ठेवणें हें विद्यमान पीढीचें कर्तव्य आहे. हा मोठा ग्रंथ प्रकाशांत आणणे कांहीं काठिण गोष्ट नाही. या ग्रंथांच्या प्रकाशनास लागणारे पांच हजार रुपये मनात आणील तर एकटाच कोणी खर्च करील आणि आपल्या पितृऋणांतून अंशतः मुक्त होईल. नागपूरची ग्राम देवता **जागृतेश्वर** अशी कोणास तरी सुबुद्धि देवो, अशी आशा व्यक्त करून आणि पुनश्च मध्यप्रदेश संशोधन मंडळ आणि माझे मित्र श्री. बाबा-साहेब लांडगे यांचे आभार मानून ही प्रस्तावना संपवितो. इति शम्.

शारदाश्रम, यवतमाळ
दि० ३१–१०–५३

य. खु. देशपांडे.

भाग पहिला

थोडी पूर्वपीठिका

अठराव्या शतकाच्या प्रारंभीं श्री छत्रपति शाहूमहाराजांची औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोंगलांच्या कैदेतून सुटका झाली (इ. स. १७०७) त्या सुमारास मराठ्यांचा या प्रान्तांत खरा प्रवेश झाला. त्या पूर्वी येथें गोंड राजांपैकीं बहुतेकांची सत्ता सरासरीनें १०० ते १५० वर्षें तरी नांदत होती. हा काळ ठोकळ मानानें अकबर ते औरंगजेब या मोंगल बादशहांचा होय. त्या पूर्वीं अनेक मुसलमानी सत्ता एका मागून एक उत्तरेंत निर्माण झाल्या. त्यांच्या तर्फे पुनः निरानिराळ्या प्रांतावर जे सुभेदार नियुक्त झाले त्यांपैकी बहुतेक स्वतःच सर्वाधिकार बळकावून बसले व त्यांचा त्या त्या प्रांतांवर अविच्छिन्न अंमल चालूं लागला. तथापि या प्रांतांवर मात्र, विशेषतः मध्यप्रदेशाच्या मराठी प्रान्तावर (बालाघाट, लांजी पर्यंत सर्व मराठी भाग) गोंडांची व कांहीं अंशी देवगिरीकर यादव यांची सत्ता असल्याकारणानें या प्रांताला मुसलमानी सत्तेपासून विशेष उपसर्ग पोंचला नाहीं. तरी चौदाव्या शतकाच्या प्रारंभीं देवगिरीकर बुडाल्यावर मात्र या प्रांतांत प्रबल व एकसूत्री अशी अधिसत्ता जवळपास राहिली नाही म्हटलें तरी चालेल. यादवांच्या पूर्वीं एका बाजूला म्हणजे जबलपूरकडे कलचुरी वंश व दुसऱ्या बाजूला म्हणजे मराठी विभागांत राष्ट्रकूट व उत्तरचालुक्य राजे आपला अंमल गाजवीत होते. त्या पूर्वीं पूर्व चालुक्याची सत्ता महाराष्ट्रांत होती व श्रीहर्ष आणि परमार यांची राज्यें उत्तरीय प्रांतांत होतीं.

त्यांच्या पूर्वीं तिसऱ्या शतकापासून तो सहाव्या शतका पर्यंत अधिकांश भागावर वाकाटक व कांहीं भागावर गुप्त सम्राट् यांची अधिसत्ता होती. त्यांच्याहि पूर्वीं आपल्याला अशोका पर्यंत जाता येते. कारण त्याचे वेळीं राष्ट्रीक व पिट्टनिक (पैठण) यांचा उल्लेख सापडतो. ज्याना आपण गौळी म्हणतो त्यानाच अहीर (आभीर) असें म्हणतात. या आभीरानीं इसवी सनाच्या ३ ऱ्या शतकापर्यंत राज्य करीत असलेल्या सातवाहनांच्या सत्तेला शह दिला. परंतु लवकरच स्थानिक राज्यें उदयास आल्यापासून हे आभीर

दाक्षिणेपर्यंत इतस्ततः विखुरलेले दिसतात. त्यांपैकींच वेळ आल्यावर कांहींनी या प्रांतात गोंडांच्या पूर्वी थोडा फार अंमल बसविलेला दिसतो. परंतु शकहूणांप्रमाणें हे परकीय समजले जाणारे आभीरही आपल्यात समरस झाले. कृष्णेच्या खालीं जी चेर, चोल, पांड्य, पल्लव, होयशल, कदंब इत्यादि राज्यें होतीं, त्यांच्याशीही महाराष्ट्राचा थोडा फार संबंध आला. अशी ही एकूण परंपरा आहे.

आपला भारतवर्ष इतिहासपूर्व काळापासून तो १९४७ पावेतों अखंड होता. आन्तर देशीय व्यापार, तीर्थयात्रा, यज्ञयागादि समारंभ व महोत्सव, साहित्याचें आदान प्रदान, शास्त्रचर्चा इत्यादि साधनांमुळें देशांतील पुढारलेल्या लोकांचे एकमेकाशी संबंध येत. तसेच कांही लोकसमूह दुष्काळ, परचक्रादि प्रसंगविशेषाने स्थलान्तर करून स्थानिक समाजांत विलीन होत. विशेषतः विदर्भाची कीर्ति दूरवर पसरली असल्यामुळें बाहेरून लोक आकृष्ट होत व एका समाजाचे दुसऱ्यावर संस्कार होत. तेव्हां याहि प्रांतांत संस्कार संपन्न लोक होते आणि म्हणूनतर गोंडाना स्वतःला राजगोंड म्हणून घ्यावेसे वाटे व अशा रीतीने क्षत्रियपद पटकावेसें वाटे. तेव्हां दाक्षिणेंत बाहामनी राज्यांमुळे यवनमय झालें असतां, वर दर्शविल्या प्रमाणें महाराष्ट्रपरंपरेंत वाढलेल्या समाजानें मराठी सत्तेनें इकडे पाऊल टाकल्या बरोबर तिचें स्वागत केलें. त्याना शिवाजी महाराजांचे वेरूळ व जिजामातेंचें माहेर जें शिंदखेडचे जाधव यांचा पूर्ण परिचय होता. तरी मध्यंतरीच्या काळांत जी गोंड राजवट झाली व ज्यांच्या पासून मराठ्यांनी सत्ता हिरावली, तिचें थोडें वर्णन करणें क्रमप्राप्त आहे.

देवगडकर गोंड व नागपूर शहराची स्थापना

सर्वच गोंडराजवटींचा पूर्वेतिहास इतका रम्य व आकर्षक आहे कीं, तो प्रत्येकानें समजून घेतला पाहिजे. या दृष्टीनें गढामंडल्याच्या गोंड राजवटीप्रमाणें चंद्रपूरचे व छिंदवाड्याकडील देवगडकर गोंड यांच्याही राजवटी अभ्यसनीय आहेत. देवगडकरांनी सोयीच्या दृष्टीनें आपली राजधानी कालान्तरानें देवगड येथून हलवून ती नागपूरास आणली. त्यापूर्वीं नागपूर हें एक परगण्याचें मुख्य ठिकाण होतें. नागपूर येथें राजधानी स्थापन करण्याचें

मुख्य श्रेय बख्तबुलंद उर्फ बखतशाह या राजास आहे. (१७०२ इ०) त्यापूर्वीं नागपूरला राजापूर बारस्त असें संबोधण्यात आलें आहे. शेवटचा पदच्युत झालेला गोंडराजा बुऱ्हानशहा याच्या नावावरून बुरानशाचा किल्ला म्हणून शहराच्या एका विभागास अझूनहि संबोधण्यांत येते. तेथें आपल्याला जुन्या किल्ल्याचा एक बुरुज पाहावयास मिळतो. बाकींचे तीन बुरुज शहाजहान बादशहाचे वेळीं खान दौरान या मोगलांच्या प्रसिद्ध सेनापतीनें गोंडराजा कोकशहाचे वेळीं एका वेढ्याचे प्रसंगी पाडले होते. पुढें गृहकलहामुळें बखतशहावर जेव्हां औरंगजेब बादशहाची मदत घेण्याचा प्रसंग आला (इ. स. १६८८) तेव्हां अर्धवट कां होईना, पण मुसलमानी धर्माची दीक्षा घेण्याची अट त्याला पत्करावी लागली. तेव्हां पासून हा गोंड वंश मुसलमान धर्मानुयायी होता. परंतु सुदैवानें १९५० च्या ऑक्टोबर महिन्यांत म्हणजे सुमारे २६० वर्षांनीं त्या कुटुंबाच्या हल्लीच्या वंशजाने म्हणजे राजेअजमशहा यानीं सहकुटुंब पुनश्च हिंदुधर्मांत प्रवेश केला. चंद्रपूरच्या गोंड राजवटीनेंही त्यांचें राज्य भोसल्यांनी हिरावून घेण्यापूर्वीं कित्येक पिढ्या तिकडच्या भागाच्या सुख समृद्धींत भर घातली. हा वंश मात्र त्यांचा मुसलमानाशीं थोडा फार संघर्ष होऊनहि पूर्णतया हिंदु राहिला व त्यांचे वंशज आज चंद्रपुरास आहेत.

भाग दुसरा

मराठ्यांचा प्रवेश

श्री शाहू छत्रपतीची मुक्तता झाल्यावर त्याचा कांहीं काळ राजारामाची पत्नी ताराबाई हिच्याशी झगडण्यांत गेला. त्यानंतर त्यानें मराठी राज्याचा विस्तार करण्याकडे आपलें लक्ष पुरविलें. नागपूरकर भोसल्यांचा मूळ पराक्रमी पुरुष परसोजी * हा छत्रपति शिवाजी महाराजांच्या तालमीत वाढला होता. राजारामानें परसोजीला इ. स. १६९९ मध्यें सेना साहेब सुभा या पदाने गौरवून, त्याला वऱ्हाडच्या कामगिरीवर पाठविले. तेंच पद त्याचा पुत्र

Shahus greatest help came from Parsoji Bhonsle Sardesai: History of marathas P. 13

कान्होजी याजकडे आलें. परंतु पुढें त्याचे शाहूशी वितुष्ट आल्यावर कान्होजीचा पुतण्या रघूजी याला तें पद बहाल करण्यात आलें.

मानाचें स्थान

नागपूरकर भोसल्यांना मराठशाहींत प्रथमतः मानाचें अग्रस्थान होतें. त्यांचा व शिवाजीचा वंश एकच होय असाहि इतिहासग्रंथांत दावा केला जातो. नागपूरकर भोसलेहि आपल्याला शिवाजी प्रमाणे शिसोदिया घराण्याचे म्हणवीत आले आहेत. दुसरें, शाहू खरा कीं खोटा या बाबतींतचा जो अंतिम निर्णय परसोजीनें दिला, त्याला ताराबाईला मान्यता देणे भाग पडलें व अशा प्रकारें शाहूला छत्रपतीचें पद प्राप्त होण्याकरितां नागपूरकर भोसले एका दृष्टीनें कारणीभूत झाल्यामुळेंहि या वंशाला प्रारंभी मराठशाहींत महत्वाचें स्थान होतें. एका प्रकरणीं निझामानेहि शाहूची गादी तुला देववितो म्हणून मुधोजीला म्हणजे आद्य रघूजीच्या मुलाला आपलेकडे वळविण्याचा प्रयत्न केला होता. याच गोष्टींची पुनरावृत्ति वॉरन हेस्टिंग्स या खंद्या व कारस्थानी गव्हर्नरानें केली होती. खेरीज शाहूने आपली भाचीही रघूजीला दिली होती. अशाच या व इतर कारणास्तव नागपूरकर भोसल्यांना मराठशाहीत जें अग्रस्थान असल्याचें प्रतिपादण्यांत येतें, तें योग्य होय. दुःख एवढेंच कीं, मानाप्रमाणें त्यानीं आपला बोज मात्र राखला नाहीं.

आद्य रघूजी

आद्य रघूजीची कारकीर्द त्याच्या पूर्वीच्या व नंतरच्या सेनासाहेब सुभ्यांच्या मानानें बरीच प्रभावी झाली. त्याने बंगालवर स्वाऱ्या करून ओडीसा प्रान्त आपल्या कब्जांत आणला, तिकडील पवित्र स्थानांचा यथाशक्ति बंदोबस्त केला व १७५१ च्या तहाप्रमाणें बंगालबद्दल १२ लक्ष रुपयांची वार्षिक खंडणीही बंगालचा तेव्हांचा नबाब अलींवर्दीखान याज कडून कबूल करविली. रघूजीनें नागपूरचें गोंडराज्य तर पूर्णतया घेतलेंच, पण रत्नपूरचे (छत्तीसगड) हैहय वंशीयांचें राज्य व चंद्रपूरचें गोंड राज्यही मराठी मुलखास जोडलें. तसाच वऱ्हाडावरही प्राधान्येकरून मराठा अंमल बसविला. बंगाल्यांतील कामगिरींत मात्र भास्करराम कोल्हटकर सारखा मोहरा अली-

आद्य रघोजी भोसले, सेनासाहेब सुभे



बर्दीखानच्या कपट कारस्थानामुळें बळी पडला व त्याजबरोबर त्याच्या २१ नामवंत सरदारांनाही (यांत बहुतेक मराठेच होते) कंठस्नान घडलें. यामुळे पुढील भोसले राजवटीसच नव्हे, तर पर्यायानें मराठशाहीसहि धक्का बसला असावा. कारण, खरे वीर व कर्तबगार सरदार नाहीसे झाल्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाला व मार्गदर्शनाला भोसलेशाही अंतरली, असें म्हणणें चूक होणार नाही. रघूजीने कर्नाटकांतहि फत्तेसिंग भोसल्याबरोबर कामगिरी बजाविली. असा हा तेव्हांच्या काळांत इतरांच्या मानाने आपल्या पराक्रमाने तळपणारा वीर वयाच्या ६२ व्या वर्षी १७५५ मध्यें मृत्यु पावला. त्याच्या स्मरणार्थ नागपूर शहरांत नव्या शुक्रवारीत एक सुंदर छत्री उभारली आहे, ती कायम असून प्रेक्षणीय आहे, ती संरक्षिली मात्र पाहिजे.

गृहकलह

रघूजीनें * आपल्या चार मुलांत गादीचीं भांडणे होऊं नये म्हणून मरणापूर्वी मुख्य गादी जानोजीस देऊन इतरांस राज्यांतिल चंद्रपूर, छत्तीसगड, व वऱ्हाडातील दारव्हा वगैरे असे तीन भाग वाटून दिले. चार भावांपैकीं, जानोजी व साबाजी हे एका आईचे व मुधोजी आणि बिंबाजी हे दुसऱ्या आईच्या पोटचे होत. मुधोजी हा मोठा उपद्व्यापी माणूस. जानोजी जरी मुधोजीच्या पूर्वी कांहीं तास जन्मास आला होता, तरी मुधोजीची आई जानोजीच्या आई पेक्षां वडील असल्या कारणानें मुधोजी स्वतःला गादीचा वारस समजत होता. त्यानें गादी मिळावी म्हणून अनेक कुभांडे रचिलीं. शेवटीं पेशव्यानी समेट केला, परंतु तो टिकला नाही. पेशव्यानी १७५७-५८ च्या निझामाच्या विरुद्ध उभारलेल्या मोहिमेंत भोसले बंधू सामलि झाले परंतु १७६० च्या उद्गीरच्या लढाईत (यात निजाम चेपला गेला) व पुढील वर्षाच्या पानपतच्या क्रान्तिकारक संग्रामांत मात्र भोसले बंधू अलिप्त राहिले पानपतच्या महायुद्धांत विश्वासराव, सदाशिवराव भाऊ व इतर सहस्त्रावधि मराठे वीर धारातीर्थी पतन पावल्यामुळें नानासाहेब पेशव्यास धक्का बसला व त्यांतच त्यांचा अंत झाला. त्यामुळें तरुण पेशवा माधवराव

---

* रघूजीला एकंदर ७ बायका होत्या (औरंगाबाद बखर) ६ सती गेल्या त्या प्रीत्यर्थ ६ कमानी समाधीवर उभारल्या आहेत.

याचेवर मराठी राज्याच्या संरक्षणाची सर्व जबाबदारी येऊन पडली. परंतु चुलता राघोबा दादा यानें पेशवेपदाची हाव धरल्यामुळें पेशवाईत गृहकलह सुरू झाला. यांत मुख्यतः जानोजी व मुधोजी या दोन बंधू पैकीं एक एका पक्षास, तर दुसरा दुसऱ्या पक्षास असा प्रकार सुरूं झाल्यामुळें, शेवटीं माधवराव पेशव्यानीं नागपूरवर चाल केली. पेशव्याची एक १७६५ त व दुसरी १७६८ त अशा दोन स्वाऱ्या झाल्या व या दोन्ही स्वाऱ्यांस भोसल्यांना तोंड द्यावें लागलें. शेवटी २३-३-१७६९ रोजीं कनकपूरच्या तहामुळे समेट झाला. यांत १७६३ च्या राक्षस भुवनच्या निजामाविरुद्धच्या लढाईंत जो ३२ लाखांचा मुलूख निजामास सहाय्य न केल्याबद्दल भोसल्यांना दिला होता, तो परत घेण्यांत आला व अशा रीतीनें भोसल्यांची शक्ति कमी करण्यांत आली. यानंतर जानोजी आणि माधवराव पेशवे यांच्या मागेपुढे झालेल्या मृत्यूपर्यंत (१७७२ च्या अखेर पावेतो) शांत राहिलें परंतु जानोजी वारल्यावर अन्तः कलहानें पुनः उठाव केला व परिणामी साबाजी व मुधोजी हे दोन सावत्र बंधु पांचगांव[1] येथें हिरीरीनें झुंजले व मुधोजीनें स्वतः पिस्तुल चालवून साबाजीचा प्राण घेतला. यावेळीं आद्य रघूजी बरोबर जे अधिकारी व झुंजार आले होते, त्यांचें महत्व संपून, देवाजीपंत चोरघडे, भवानी काळू व जामदार इत्यादींचा नवीन अधिकारीवर्ग पुढे आला होता. तिकडे पुण्यातही नारायण राव पेशव्याच्या मृत्यूच्या दुर्घटनेंत मुधोजीचा हात होता. अर्थात् परिणामतः मुधोजीचा कल इंग्रजाकडे वळला व याच वृत्तींत स्वतःच्या राज्याच्याच नव्हे तर अन्ती अखिल राष्ट्राच्या पारतंत्र्याचें बीज आहे.

इंग्रजा विरुद्ध व्यूह

नारायणराव पेशव्याच्या सुतकांतच पुण्यास बारभाईच्या अधिकारी मंडळाची रचना झाली व त्याचें पुढारीपण सखाराम बापू व नाना फडणवीस यांचेकडे आलें. सवाई माधवराव पेशवा १८-४-१७७४ रोजी जन्मास आला व राघोबाचे पेशवाई पदाचे स्वप्न हवेंत विरलें. त्याने सरळ इंग्रजांच्या घरची वाट धरली. मद्रास व कलकत्तेकराप्रमाणें मुंबईकर इंग्रज अधिकाऱ्यांतहि राज्य स्थापनेची महत्वाकांक्षा उत्पन्न झाली व त्यांनी राघोबाला आपले

१ उमरेडच्या सडकेवर नागपूर पासून १० मैल

नादी लावून पेशवाईत बखेडे उत्पन्न केले. १७७६ साली प्रसिद्ध पुरंदरचा तह झाला परंतु तो पाळणे मुंबईकरांच्या जिवावर आलें. त्यांनी आपलें बलाबल न पाहतां व कलकत्ता येथील वरिष्ठ इंग्रजांच्या कौन्सिलला बाजूला ठेवून कुरापत काढली, तळेगावीं चांगला मार खाल्ला व त्यांना पेशव्याशी वडगांवचा अत्यंत नामुष्कीचा तह करावा लागला. या सर्व प्रकरणी भोसले तटस्थ दिसतात. पुढें वडगावच्या तहाची शाई वाळते न वाळते तोंच इंग्रजांचें पाऊल वाकडें पडूं लागलें व कलकत्त्याच्या कौन्सिलचाही त्याला आधार मिळाला. हें पाहून मात्र मराठे अगदीं चिडले व त्यांनी इंग्रजांना देशाबाहेर घालवून देण्याचा महान् व्यूह रचला. विशेषतः निझामानें यांत फारच अवसान आणलें पण तोच शेवटी मागे राहिला. हैदर व भोसले हेही या मेळांत सामील झाले. हैदरानें आपलें कर्तव्य बजावलें परंतु भोसल्यांनी मात्र वरकरणी इंग्रजाविरुद्ध पूर्व योजनेप्रमाणें बंगाल्यावर स्वारी करूनही आंतून व्यूह पोखरला. हा सर्व प्रकार एकंदर मोठा उद्वेगजनक असून त्यांत मुधोजी हा खरा पापाचा धनी झाला आहे. या बाबतींत जे विश्वसनीय कागदपत्र फार विस्तृत प्रमाणावर उपलब्ध आहेत. त्यावरून नागपूरकर भोसले या देशाला पारतंत्र्याच्या गर्तेत लोटण्यास बऱ्याच अंशी कारणीभूत झाले, हें दुर्दैवाने सिद्ध होऊं पाहते. शिवाय स्वकीयांत नागपूरकरांची छी थू झाली ती वेगळीच. यानंतर द्वितीय बाजीराव सारखा दिवटा पेशवाईत निपजला व मराठी साम्राज्याची कशी राख रांगोळी झाली हें वाचकांस माहीत आहे.

लचका तोडला

१७७२ साली जानोजीचा मृत्यु झाल्यावर मुधोजीचा मुलगा द्वितीय रघूजी हा १३ वर्षांच्या वयांत गादीवर बसला परंतु मुधोजीचा १७८८ मध्यें मृत्यु होईतों त्याला स्वतःचें मन असें फारसे नव्हतेच. त्याचा धाकटा भाऊ चिमणा बापू एवढा राक्षसी बांध्याचा, पण त्यालाही वडीलांचेच धोरण बंगालच्या स्वारीत पत्करावे लागले. मुधोजी, वॉरन हेस्टिंग्स व मुधोजींचा इंग्रजाकडील बदसल्लागार वकील पं. बेनीराम व चिमणा बापू यांचा जो आपसांत पत्रव्यवहार झाला आहे, तो वाचून मन विषण्ण होते व सर्वांग

बाधिर पडतें. पुढें १७८५ मध्ये चिमणाजीनें हैदरा विरुद्ध बदामीच्या लढाईंत पराक्रम गाजविला, पण तेवढ्यावरून त्याचेविषयी आदर उत्पन्न होत नाही. दुर्दैवानें तो १६-८-१७८९ रोजीं ऐन तारुण्यांत अकाल्पित रीतीनें मृत्यू पावला. त्यावर जादूची मूठ मारण्यांत आली होती, अशी समजूत राजवाड्यांत व बाहेरहि त्यावेळीं प्रसृत झाली होती. यानंतर १७९५ मध्यें जी निजामाविरुद्ध खर्ड्याची प्रसिद्ध लढाई झाली, तींत मात्र द्वितीय रघूजीनें मनोभावाने पेशव्यास मदत केली. यांत त्याचा सेनापति विठ्ठल बल्लाळ सुभेदार यानें पराक्रम गाजविला व लढाईच्या यशस्वी निकालानंतर रघूजीच्या मनांत आत्मविश्वासहि उत्पन्न झाला. पेशवाईतील महादजी शिंदे, नाना फडणवीस, हरिपंत फडके इत्यादि महान् महान् वीर व मुत्सद्दी काळानें ओढून नेले असतां व उलट इंग्रजाकडे ताज्या दमाचे मुत्सद्दी व आर्थर वेलस्ली सारखे लढवय्ये रणांगणावर सज्ज झाले असतांहि दौलतराव शिंदे व द्वितीय रघूजी यांनी दुसरे मराठा युद्ध छेडलें. हा मराठशाही जिवंत ठेवण्याचा इंग्रजविरुद्ध शेवटचा महत्वाचा प्रयत्न होता. यात होळकर जर सामील झाला असता तर युध्यमान पक्षांची कांही बलपरीक्षा झाली असती. तसें झालें नाहीं व शिंदे आणि भोसले हेही एकोप्याने चांगले झुंजले नाहीत. शेवटी अडगावच्या तहानें (१८०४) द्वितीय रघूजीला ओडीसा व बहुतांशाने वऱ्हाड या दोहोंसही मुकावे लागले. अडगांवच्या लढाईचे वेळीं रघूजीचा धाकटा भाऊ व्यंकोजी याजकडे सेनापतित्व होते. विठ्ठल बल्लाळ सुभेदार हिरीरीनें लढला. बेनीराम किल्लेदारानें तर या गाविलगडावर आपला देह ठेविला, परंतु कोणाचाच उपयोग झाला नाही हें वेगळे !

द्वितीय रघूजीनंतर

यानंतर १८०४ च्या मार्च मध्यें नागपुरास एल्फिन्स्टन रेसिडेन्ट म्हणून येऊन बसला. मराठ्यांच्या केन्द्र सत्तेपासून भोसल्यांना फोडण्याचा व तैनाती तहाचा पाया रचण्याचा सुमारें २० वर्षांपासून इंग्रजांचा गुप्त प्रयत्न जारी होता व त्याकरितां इकडून तिकडे वकील सारखे येत जात होते. परंतु द्वितीय रघूजीनें आपले अर्धे राज्य गमावून बसल्यावरहि तैनातीतह

आमृत्यु म्हणजे १८१६ पावेतों मोठ्या शिताफीनें टाळला.* रघूजीचा धाकटा भाऊ व्यंकोजी, हा १८११ त काशी येथें क्षयानें वारला परंतु त्याचा मुधोजी उर्फ आपासाहेब नावाचा सुमारें १८ वर्षांचा मुलगा चुलत्याचे वाईट चिंतीत असे. रघूजीनें मरण समयी त्याला जवळ बोलावून सर्व मुत्सद्यांसमोर स्वतःचा मुलगा व गादीचा वारस परसोजी या साध्या भोळ्या व्यक्तीस निभावून घेण्यास सांगितले व उर्वरित राज्यांत बखेडे उत्पन्न न करण्याचा उपदेश केला पण धूर्त इंग्रजांचा प्रतिनिधि सर रिचर्ड जेन्किन्स हा नागपूर महाविद्यालयाच्या इमारतींतच ठाण देऊन बसला होता. तो थोडाच आपासाहेबाला मोकळा सोडणार होता. परसोजी गादीवर बसला परंतु जेन्किन्सनें आपासाहेबाशी आंतून सन्धान बांधलें व त्याला पुरेपूर आपल्या जाळ्यांत गुरफटल्यावर, त्याच्याकडून २८ मे १८१६ ला परसोजीच्या वतीनें तैनातीतह कबूल करवून घेतला. यानंतर परसोजीचा १-२-१८१७ रोजीं हल्लीच्या नर्सिंग टॉकीजच्या खालीं जुन्या महालाच्या तळघरांत संशयास्पद रीतीनें अंत झाला. राज्याचा कट्टा अभिमानी धर्माजी भोसले याला आपासाहेबानें नाहीसा केला. द्वितीय रघूजीची पट्टराणी बाकाबाई हिला इंग्रजांच्या बळावर गप्प बसविलें व गुजाबा दादा गुजर (द्वितीय रघूजीचा भाचा) याला इंग्रजाच्या रक्षणाखालीं प्रयागास पळ काढावयास लावले. आपण स्वतः सर्वाधिकारी बनला. परंपरेस अनुसरून छत्रपतीकडून सेनासाहेबसुभापदाचीं वस्त्रें मागविलीं व तीं समारंभानें घ्यावयाचें ठरविलें.

बर्डीची लढाई व आपासाहेब

२४-११-१८१७ हा मुहूर्त निश्चित झाला व आदले दिवशीं रेसिडेन्टला समारंभास उपस्थित राहण्याबद्दल आपासाहेबानें आमन्त्रण पाठविलें, परंतु तत्पूर्वीच मराठ्यांच्या मुख्यानें म्हणजे पेशव्यानें पुण्याच्या रेसिडेन्सीवर आक्रमण केल्याची बातमी नागपूरास आल्यामुळें आपासाहेबालाहि शत्रु समजण्यांत

---

* त्याचें वर्णन एल्फिन्स्टन असें करतो " Short, fat, dark man rather mean in his appearance but mild and decent in his behaviour " नागपूर रेसि. रेकार्ड भाग १ पत्र नं. ७

आले व रेसिडेन्ट किंवा त्याचे तर्फे कोणीहि समारंभास हजर राहिला नाही. शेवटी सीताबर्डी व नागपूरच्या लढायांचे प्रसंग ओढवले व इंग्रजांचा बावटा राजवाड्यावर ३०-१२-१८१७ रोजी २-३० वाजतां दुपारी फडकला .आपासाहेब इंग्रजाकडे ओलीस राहिला. लगेच आपासाहेबाशी तह झाल्यावर त्याला ९-१-१८१८ ला राजवाडयांत परत पाठविला. परंतु तिकडे पेशवा पळत सुटला होता व तो चंद्रपूर पर्यंत आलाहि होता. तेव्हां आंतून दोघांचे सन्धान आहे या संशयावरून आपासाहेबास १५ मार्च रोजी कॅप्टन ब्राऊनने खेचून बाहेर काढलें. या प्रसंगी राणीवशांतील राण्यांच्या बांगडयांच्या ओरबडण्या पलीकडे कोणतीच दुखापत ब्राऊनला झाली नाहीं किंवा इतर प्रतिकार करण्यांत आला नाहीं. राजाला कैद करून त्याला प्रयागची वाटचाल करावयास लावले परंतु १०७ मैल गेल्यावर लखनादौनवरून तो इंग्रजांच्या हातावर तुरी देऊन कैदेतून पळाला तो पळालाच. पुढें १२ वर्षांनी त्याचा जोधपूर येथें पत्ता लागला, परंतु इंग्रजांचे मनांत त्या वेळीं एतद्देशिय राजांविषयीं असा तुच्छता भाव निर्माण झाला होता कीं, आपासाहेबाला न डिवचतांच त्याला १५-७-१८४० रोजीं निसर्गाने आलेलें मरण येऊं दिलें.

तृतीय रघूजी

आपासाहेबाला पदच्युत केल्यावर द्वितीय रघूजींची कन्या बनूबाई गुजर (विद्यमान सरदार व्यंकटराव उर्फ तात्यासाहेब गुजर यांचे घराणें) हिच्या १० वर्षांच्या बाजीबा नांवाच्या मुलास परसोजींची राणी दुर्गाबाई हिच्या मांडीवर दत्तक देण्यांत आले व त्याला ४८ लक्ष रुपये उत्पन्नाचे राज्य देण्यांत आलें. तो वयांत येईतो जेन्किन्सनें सर्व राज्यकारभार चालविला. वस्तुतः १८२६ साली राजा वयांत आला परंतु १८३० पासून प्रत्यक्ष कारभार त्याचे स्वाधीन करण्यांत आला. या राजाने आपल्या कारकीर्दींत नागपूरच्या वैभवांत बरीच भर घातली. शहरांतील नितान्त सुन्दर असे रुक्मिणी मंदिर, सोनेगाव व पारडी येथील मंदिरें, महाराजगंज (पारडी) व सोनेगांव येथील बगीचे व लष्करी ठाणीं, महाराजबाग, शुक्रवार दरवाज्याचें पुनर्निर्माण व त्यापलीकडील नगर सुधारणा व नव्या शुक्रवार पेठेची स्थापना, मध्यप्रदेश कोऑपरेटिव्ह बँकेची इमारत, गोल बंगला, मेसघर व नागनदीवरील २-३ पूल वगैरे बांधून तृतीय

विद्यमान राजे बहादूर

श्रीमंत रघोजीराव भोसले



रघूजीने आपलें कर्तृत्व व प्रजावात्सल्य प्रदर्शित केलें. ११–१२–१८५३ रोजीं राजा निपुत्रिक निवर्तल्यामुळें डलहौसीनें हें राज्य खालसा केलें व भोसले राज्याचा ग्रंथ आटोपला. या राजाविषयीं कांहीं लेखकांनीं इंग्रज लेखकांनीं पुरविलेल्या पूर्वग्रहदूषित माहितीच्या आधारावर अनुदार उद्गार काढले आहेत पण त्यांचें परीक्षण करण्यास आपल्यास येथें सवड नाहीं.

वैभव संपलें

यानंतर भोसले राजवंश कायम राहावा म्हणून विद्यमान रघूजी महाराजांचे वडील कै. जानोजी महाराज यांस वंशप्रतिनिधि म्हणून स्वीकारण्यांत आलें व त्यांना राणी बाकाबाई वगैरे जुन्या व नवीन राण्या, रखेल्या, सरदार मानकरी, कारभारी व इतर सरकारी नौकर वर्ग यांना पेन्शने देण्यांत आलीं. त्यांतही संतोषाची गोष्ट ही कीं, जानोजी महाराज हे फार सद्‌गुणी, उत्साही व विद्याव्यासंगी होते.[1] हे कै. नाना अहेरराव यांचे कुटुंबांतून भोसले कुळांत दत्तक आले होते. त्यांनी शक्यतों जुने वैभव कायम राखण्याचा प्रयत्न केला. १८५७ सालच्या स्वातंत्र्य युद्धाच्या नौबदी झडल्या असतां व त्याचे लोण नागपूर पर्यंत आलें असतांही राणी बाकाबाईनें भोसले वंशाच्या हितावर दूर दृष्टि ठेवून प्रजेत शांतता राखण्याचा आटोकाट प्रयत्न केला[2] तरी शेवटीं कांहीं मुसलमान व मराठा व्यक्तींना शिक्षा झाल्याच. प्रतिष्ठित दोन मुसलमान तर फांसावरहि गेले. १८८१ सालीं जानोजी महाराज वारले व संस्थान त्यांचे दोन पुत्र–विद्यमान [3]रघूजी महाराज व कै. राजे लक्ष्मणराव यांचे स्वाधीन झाले. त्यांची व इतर राजवंशातील विद्यमान पुरुषांचीं चरित्रें

---

१ यांचें त्रोटक जीवन चरित्र राष्ट्रशक्ति नांवाच्या नागपूरच्या साप्ताहिकाच्या ६-७-५१ च्या अंकांत लेखकाने दिलें आहे.

२ या तिच्या वर्तनाबद्दल धर्मवीर सावरकर यानी तिला दोषहि दिला आहे पण याबद्दल आम्ही महाराष्ट्राच्या १९४८ च्या दिवाळी अंकात स्वतंत्र लेख लिहून उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे.

३ पहा राष्ट्रशक्ति अंक २०-७-५१

जनतेच्या डोळ्यासमोर असल्याकारणाने या संक्षिप्त हकीकतीत विशेष लिहिता येत नाही. हल्ली तर मोकासे व मालगुजारीहि गेल्यामुळें ज्येष्ठ पातींतील राजे कु. फत्तेसिंगराव भोसले व त्यांचे धाकटे बंधू कु. संग्रामसिंह, तसेच धाकट्या पातींतलि राजे प्रतापसिंह व राजे राजारामसिंह प्रभृति बंधूंवर पुढील राहणीच्या दृष्टीनें मोठीच जबाबदारी आली आहे, असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं.

सिंहावलोकन

शेवटी, थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे भोसले आमदानीची पहिली २५ वर्षे नवीन प्रांत जिंकण्यांत व तेथें अंमल बसविण्यांत गेली. नंतरची १०-१५ वर्षे आपसांतील कलहांत गेल्याकारणानें, राजकर्त्यांना अन्तःसुधारणे-करितां फारसा सुरुवातीला वेळ मिळाला नाहीं. तरी सर रिचर्ड जेन्किन्सच्याच साक्षीवरून एवढे म्हणता येईल कीं, हा प्रांत जो अगदीच विलग पडला होता त्याचे व्यापारी संबंध व दळणवळण भोसले राजवटीमुळें इतर विभा-गाशीं प्रस्थापित झालें. बस्तर वगैरे कडचा भाग सोडल्यास, इतर भूप्रदेशावर शासनकर्त्यांचे व रयतेचे प्रत्यक्ष संबंध जोडण्यांत येऊन प्रजा जमीनदारांच्या जुलमा पासून मुक्त करण्यांत आली व कृषिजीवन समृद्ध करण्यांत आलें. ओडीसा प्रान्तावर जरी म्हणावे तसे भोसले शासन रुढावलें नाहीं, तरी तिकडेहि महाराष्ट्रसंस्कृतीचे पडसाद पडल्याशिवाय राहिले नाहीत. १८०४ मध्यें भोसले शासनाची अर्धी इमारत ढासळून पडली व त्यानंतर देशांतलि अनेक एतद्देशीय प्रभावी सत्ता कोलमडून पडल्यामुळें, पेंढाऱ्यांच्या रूपानें जें अराजक माजलें, त्यालाहि द्वितीय रघूजीला आपल्या पुरते तोंड द्यावे लागले तरी फावल्यावेळीं, कधीं नियोजनपूर्वक, तर कधीं राज्य शासनाच्या ओघांत नागपूरकर भोसल्यानीं तेव्हांच्या शासनपद्धतीनुसार आपल्या कल्पने प्रमाणें राज्याचा उत्कर्ष केला त्याचे थोडे फार चित्र स्थलसीमेच्या मानानें पुढील पानांत पाहावयास मिळेल.

भाग तिसरा

कर्तृत्ववान् पुरुष--मराठे.

मूळसंच:—मराठे सातार्‍याहून जाणून बुजून मुलखगिरीकरितां बाहेर पडले. पुढे या मुलुखगिरीचें रूपान्तर राज्य स्थापनेत व महाराष्ट्र संस्कृतीच्या विस्तारांत झालें. रघुजीची जेव्हां प्रथम शाहू छत्रपतीनें या प्रान्तांत योजना केली, तेव्हां इतर ठिकाणच्या प्रमाणें येथेहि दरबारांतून एक अधिकार्‍यांचा व लढवय्यांचा संच रघुजी बरोबर लावून देण्यांत आला. तसे करण्यात त्याचे कडून सरदेशमुखी व इतर बाबी छत्रपतीस मिळणें सुलभ जावें हा हेतु तर होताच, पण शिवाय राज्यकारभाराला शिस्त लागून इकडलि विश्वसनीय माहितीहि दरबारला मिळत जावी[1] हाहि असला पाहिजे. या संचाची यादी नागपूरच्या गुप्ते बखरीत दिली आहे. पुढे एक तर तेच ते लोक किंवा त्यांचे वंशज राज्यांत टिकूं न शकल्यामुळें किंवा नागपूर वर्‍हाडांतील स्थानिक लोकच कालान्तरानें पुढे आल्यामुळें किंवा पुनः कांहीं नवीन मंडळी सातारा पुणे वगैरे कडून आल्यामुळें नवीन नवीन कार्यकर्ते व कारभारी यांचा उदय झाला. बंगल्यांत जे २१ वीर कामी आले, त्यांचे वंशजाचा पत्ता मात्र क्वचित् लागतो. या सर्वांनी मिळून इतर क्षेत्राप्रमाणे सांस्कृतिक क्षेत्रांतहि आपल्या भोवतीं एक वातावरण निर्माण केलें. त्याच प्रमाणें कांहीं मंडळी विवाहादि संबंधामुळेंही इकडे आली व स्थायिक झाली. त्यांनाच धरून कांही कलावंत, कारागीर व तज्ञ यांची भर पडली. कांहींनी जंगलें तोडून नवीन आबादी केली व गांवें वसविलीं.

भास्करराम कोल्हटकर

आद्य रघूजी बरोबर आलेल्यात दोन वीर आपल्या तेजानें इतरांहून अधिक तळपताना दिसतात. एक भास्करराम कोल्हटकर व दुसरा रघूजी

---

१ गुप्ते बखर लेखन काळ शके १७४४ पहा पृ. ४३–४५ आवृत्ति २ री १९३६. या यादीतील कांहींचा शोध लागला नाहीं व ज्यांचा लागला, त्या सर्वांचेच वर्णन येथे करतां येणार नाहीं.

करांडे, कोल्हटकर घराण्याचा भोसले घराण्याशी विशेष महत्वाचा व निकटचा संबंध आला. याचा पूर्वेतिहास तर फारच हृदयंगम आहे. भास्कररामचा बंगाल्यावरील एका स्वारींत अलीवर्दीखानाने खून केल्याचा उल्लेख पूर्वी आला आहे. याचे बंधू कोन्हेरराम हेहि या राज्यांत होते. परंतु प्रिय बंधूच्या वियोगामुळें, त्याना पुढे येथें राहवलें नाहीं. भास्कररामांची पत्नी ताई ही पतीच्या वधाचे वेळी त्यांचे बरोबरच रणाङ्गणावर असून ती गरोदर होती. तिला एका मुसलमानबाईने काशीस नेले. तेथें ती प्रसूत झाली व मुलाचे नांव काशीराव असें ठेवण्यात आले. कांहीं दिवसांनी मायलेक इकडे आल्यावर काशीरावाला वऱ्हाडची सुभेदारी बहाल करण्यांत आली. काशीराव अल्पवयी असल्या कारणानें त्याचे तर्फे कृष्णाजी गोविंद म्हणून एक गृहस्थ कारभार पाहात असे. सुभेदाराचे ठाणे वऱ्हाडात पातूर नंदापूर * येथें असे. कोल्हटकरांच्या घराण्यांत पुढें कोणी कर्तृत्ववान पुरुष न निघाल्यामुळे त्याना जे इनाम व पेन्शन देण्यांत आलें तें कमी कमी होत गेलें. यांच्या वंशजापैकीं हल्ली कृष्णराव म्हणून एक गृहस्थ नागपुरास असून ते किरकोळ कामधाम करून प्रतिष्ठितपणे असतात. यांचा पूर्वीचा वाडा म्हणजे हल्लीची नागपुरांतील वेदशाळा होय म्हटलें तरी चालेल.

रघूजी करांडे

रघूजी करांडे हा आद्य रघूजीचा उजवा हात होय, असें म्हटलें तर त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. त्याचे नागपूरच्या आसमन्तातले आणि संबलपूर व वऱ्हाड येथील पराक्रम प्रसिद्ध आहेत. यानेंच माधवराव पेशव्याच्या काळांत भोसल्या तर्फे निजामास सामील होऊन सिंहगडची माची लुटली

* हा गाव आम्ही स्वतः पाहून आलों. येथें ताईचे वावर म्हणून आजहि एक शेत आहे. तेथें खडर्याच्या व अडगावच्या लढाईत प्रसिद्धीस आलेला विठ्ठल बल्लाळ सुभेदार परांजपे यांचे वंशजाची वहिवाट आहे. लेखकानें म. प्र. संशोधन मंडळापुढें २६-१२-१९४८ वाचलेल्या निबंधाचा सारांश महाराष्ट्रांत (१९४९ च्या प्रारंभी) प्रसिद्ध झाला आहे.

होती.[१] पेशवे दप्तरांतील पत्रव्यवहारावरून असें दिसते कीं, जानोजीच्या कारकीर्दींत हा अनेक राजकीय घडमोडीत सामील झाला असे. याचे प्रमाणे याचा पुत्र बापू करांडे, व भाऊ नाना करांडे हेहि वेळप्रसंगी राजकारणांत प्रामुख्यानें वापरताना दिसतात. रघुजी करांड्यांचे वैशिष्टय हें कीं, त्यांनी भंडारा जिल्ह्यांत म्हणजे वैनगंगा प्रांतांत जमीनबंदोबस्ताच्या बाबतींत प्रशंसनीय सुधारणा केली. सर रिचर्ड जेन्किन्स म्हणतो 'Under the sway of the Bhonslas the country is said much to have improved & to have received a great increase of population. xx Raghoji Kerandia, who was one of the successful of the military leaders in the early days of Bhonsla Government, became equaly celebrated as a revenue manager in those districts where he is still remembered as the father of the people entrusted to his Care. (रिपोर्ट पृ. १०६) याच वैनगंगा प्रान्तांत धाडगाव ही एकेकाळच्या भानारा [भंडारा] जमीनदारी एवढी जमीदारी होती. ती रुद्रा पटेल नावाच्या गृहस्थास रघूजी करांड्यांनी[२] दिल्याचा उल्लेख सापडतो. [पहा तोच रिपोर्ट पृ. १३२]

वर दोन व्यक्ति संबंधी उल्लेख केल्यावर इतर मंडळींचे गटवारीने वर्णन केलेलें बरें. यांत सामान्यतः ५ गट पडतात. पहिला, मराठे मंडळीचा, दुसरा ब्राम्हण मंडळीचा, तिसरा प्रभूंचा, चौथा इतर हिंदूंचा व पांचवा मुसलमानांचा. या प्रत्येकांत पुनः एक लढवय्याचा तर दुसरा मुलकी अधिकाऱ्यांचा असा भेद आहे. मराठा मंडळांत राजकुलाशी रक्ताचे संबंध आलेच आहेत पण मुसलमान मंडळीशीही कांही तसले संबध आलेल्याचे दिसून येते. सामाजिक जीवन म्हटले कीं, त्याच्या पोषणार्थ अनेक गरजा असणार. तेव्हां त्या भागविणारे लोकही असणार व सर्वांनी मिळून सामाजिक जीवन संपन्न

---

१ त्याच्या चरित्रांतील हें मोठेंच वैगुण्य होय.

२ रघूजी करांडे व त्याचे कुटुंबः—या संबंधी बरेच स्थानिक संशोधन होण्यासारखें आहे. आमचे आतांपावेतोंचे प्रयत्न निष्फळ ठरले.

करावयाचें असते. मूळ लिखाणांत या सर्वांची कुटुंबवृत्तें आलीं आहेत. व अझूनहि संशोधन केल्यास त्यांत बरीच भर पडण्याचा संभव आहे. तेथें त्यां सर्वांची केवळ तोंड ओळख करून देणें प्राप्त आहे.

सप्त कुळांतील मराठे

आद्य रघूजी बरोबर जी मराठ्यांची ११ कुटुंबें आलीं, त्यांचा उल्लेख फक्त एका पानांत बखरीत आला आहे. हाच आधार धरून संविधानक रचावयाचें आहे. यांपैकीं टाळकुटे यांची नकल झाल्याचें म्हणजे वंश संपल्याचे बखरीत लिहलें आहे. बिंबाजी वंजाळ, रघोजी करांडे व त्र्यंबकजी गव्हाणे यांची नुसती नांवेच दिलीं आहेत व बाकीच्यांचे नुसते वंशज हजर आहेत, एवढेंच वर्णन आलेलें आहे.

शिरके

नागपुरातील वाचकांना फाटे स्कूल जवळील डॉ. दाजीबांची चाळ (नागनदी स्मशान रोड,) माहीत असेल. ही दादोबा उर्फ बाहिरजी शिर्के यांचे कुटुंबाकडून डॉ. दाजीबा[1] यांजकडे आली. याने राज्य गेल्यावर १८५९ मध्यें जानोजीच्या हितार्थ एका प्रकरणी महत्वाचा भाग घेतला होता. दादोबाच्या वडीलाचे नांव गुणाजी व आजोबाचे संभाजी हे होते. संभाजी हा आद्य रघूजीचे वेळीं नागपूरला आला. तो रघूजीची राणी सकवरबाई हिचा बंधू होय. एक संभाजी शिर्के पांचगांवच्या लढाईतहि दिसतो. (१७७५) शेजारचे बुलदेवाचे घर हाहि शिर्क्यांच्याच वाड्याचा भाग होय यांचा मूळ वाडा ३ चौकी असून राज्यात यांना फार मान असे. या शिवाय गावगल्ले व पेन्शनही असे. (पेन्शन २४८० रु. साल बहिर्जी) या कुटुंबा व्यतिरिक्त आणखी शिर्क्यांची ३-४ महत्वाचीं कुटुंबे होती व तीं पूर्वीचे मिशन कन्या शाळा (ही १९४८ साली नुकतेच दिवंगत झालेले ते दामोदरपंत मुळे यांनी

१ हे गृहस्थ नागपुरांतील इतवारी भागांतील म्युनिसीपल दवाखान्यांत बरीच वर्षे डॉक्टर होते हल्ली तो दवाखाना दाजी डिस्पेन्सरी म्हणून प्रसिद्ध आहे. हे फार लोकप्रिय असून त्यांनी धनसंचयहि चांगला केला. यांचे चिरंजीव डॉ. भाऊसाहेब देशमुख वर्डीवर असतात.

सरदार व्यंकटराव गुजर



विकत घेतली) हें शिर्क्यांचेंच घर होय. कै. गोपाळराव चिकटे लँड रेकार्ड सुप. यांचें घर हेहि शिर्क्यांचेंच. तृतीय रघूजीच्या मूळ गुजर घराण्यांतील बहीण गजाबाई शिर्के यांचा वाडा नगारखान्या जवळ आहे. तो हस्तान्तरित होत होत हल्ली गुमगांवचे श्री. देवतळे पाटील यांजकडे आहे. हे सर्व शिर्के भाऊबंधच होत. शिवाय यशवंतराव गुजरांकडे डेबनकर शिर्के म्हणून असत. त्यांचा व गुजरांचा फार जुना संबंध. तृतीय रघूजीची सर्वात धाकटी राणी दर्याबाई (या बाईच्या जागेंत हल्ली कुंवर राजे संग्रामसिंह राहतात) यांच्याच कुटुंबातील होय. आपासाहेब भोसल्यांची राणी सावित्रीबाई हीहि शिरक्यांचीच कन्या होय. त्यापूर्वीचे बिंबाजी वगैरेंच्याही कांहीं राण्या या कुटुंबातून आल्या.

गुजर

नागपुरांत गुजरांचे दोन वाडे आहेत. त्यापैकीं एकाचे मालक सरदार व्यंकटराव गुजर[१] व दुसऱ्याचे श्रीमंत यशवंतराव गुजर[२] हे होत. दुसरी जेष्ठपाती होय. यांच्या पैकीं त्याच नावाच्या पूर्वजाला मुधोजी भोसल्यांची कन्या ठकूबाई ही दिली होती. धंतोलीचा कांहीं भाग याच ठकूबाईच्या पूर्व मालकीचा होय. तो राजाने चोळी बांगडी करितां दिला होता. पुढे बर्डीवरील श्री दांडिगे मालक झाले. हल्लीचे सरदार व्यंकटराव गुजर यांच्याहि त्याच नावाच्या पूर्वजास द्वितीय रघूजीची कन्या बनूबाई दिली होती. तृतीय रघूजी हिच्याच पोटीं जन्मास आला व पुढे भोसले कुटुंबात दत्तक गेला. या कुटुंबांतील जानराव हा आद्य रघूजी बरोबर इकडे आला होता. त्याचा मुलगा बंगालमध्ये खून झालेल्यांत होता. यानंतर वंशजांनी भोसले राज्यांत राजकारणांत व लढायांत भाग घेतला आहे. नातेसंबंध मागाहून झाले. हे गुजर कुटुंब मूळ खटावचे असून तें शिवाजीच्या काळांतील त्याचा सेनापति प्रतापराव याजपर्यंत जाऊन भिडतें. उपरोक्त दोन कुटुंबांशिवाय कितीतरी गुजर मंडळी महाल, कोठी, आदितवार दरवाजा व महाराष्ट्र कचेरीकडे वाड्यावाड्यातून विखुरलेली दिसते. तृतीय रघूजींचे

१ भीवापूर तालुक्याचे परवा पर्यंतचे मोकासदार, कुशल कार्यकर्ते व लोकप्रिय हिंदुधर्माभिमानी पुढारी २ मौदा व शिंदेवाही तालुक्याचे भूतपूर्व मोकासदार.

वेळी प्रसिद्धीस आलेला प्रतापराव गुजर यांचे पैकींच होय. यांचेच वंशाजाकडे राजाबाक्सरच्या मारुतीची व्यवस्था असून पांडुरंगरावांची सून हयात आहे. प्रथमोक्त श्रेष्ठ गुजरांचे मोकाशे गेल्यामुळे भविष्यकाळ निराळाच दिसतो.

मोहिते

बंगाल्यांत कपटाने खून झालेल्यांपैकीं, एक नीळकंठराव मोहिते हा होय. दुसरा महत्वाचा गृहस्थ म्हणजे बुऱ्हानजी मोहिते. हा गृहस्थ पहिल्या रघूजीच्या वेळी पण शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर छत्रपती रामराजाचे पेशव्या संबधीं सातान्यांत जें राजकारण चालू होतें, त्यांत बुऱ्हानजीने रघूजी बरोबर राहून बरोबरीच्या नात्याने भाग घेतलेला दिसतो. त्या वेळच्या भोसल्यांच्या पत्रव्यवहारांत असें पत्र नाहीं कीं, ज्यांत बुऱ्हानजीचा उल्लेख नाही. हा बुऱ्हानजी निजामाशी झालेल्या एका लढाईंत कामास येतो. या कुटुंबाचे राजकुळाशी नातेसंबंधही तसेच आहेत. मुधोजीची प्रसिद्ध कर्तबगार राणी चिमणाबाई ही शिवाजी आबाजी मोहित्याची कन्या होय. याला त्याचा भाऊ जानोजी यानें इकडे आणलें होतें. द्वितीय रघूजीचा विवाह मानसिंगराव मोहित्याची कन्या गजराबाई हिच्याशी झाला होता (१७७४ इ.) या मानसिंग रावाने नागपूरच्या नबाबपुऱ्या कडील नवी मंगळवारी वसविली. यानंतरहि भोसले व मोहिते कुळांचा बेटीव्यवहार झालेला दिसतो. साळूबाई मोहिते ही राणी बाकाबाईची कन्या होय. ही कान्होजी मोहित्यास दिली होती. त्यावेळी द्वितीय रघूजीने म्हणजे वडिलानें तिला वाडा बांधून दिला व त्याच जागेवर हल्ली संघाची भव्य इमारत उभी आहे. शिवाय या भागांत व हिस्लॉप कालेजकडे किती तरी मोहित्याचे वाडे होते. कॉलेजसमोरील राजोबा रिसालदार मोहिते यांचा वाडा हल्ली कावऱ्यांच्या ताब्यांत आहे. पद्धति अशी असे कीं ज्या कोणा मोहित्याची किंवा इतराची कन्या भोसले कुळांत पर्णिली जात असे, त्याला २ ह. रुपये सालीना किमान वेतन देण्यांत येई. मात्र प्रसंग विशेषी सेवाचाकरीहि घेण्यांत येई.

अहेरराव

वरील घराण्यांच्या मानाने यांचा राजघराण्याशी मागाहून संबंध आलेला दिसतो. किंबहुना सप्तकुळींत यांचा समावेशहि मागाहून झाला

असावा. पहिला संबंध नानासाहेब[1] अहेरराव यांची बहीण जी आपासाहेब (पदच्युत झालेला) भोसल्यास दिली होती, तेव्हापासून आला. पुढे गुजरांची कन्या (तृतीय रघूजीची भाची) नानासाहेब अहेररावास दिली व नानासाहेबांचा मुलगा यशवंतराव, जानोजी म्हणून भोसले कुळांत दत्तक आला. दोघेही पितापुत्र हुशार व देवभक्त होते. नानासाहेबांची ब्राह्मणांवरील निष्ठा व दिंडी प्रसिद्ध असे. यांनी नकललेली एक पोथीहि आमच्या पाहण्यांत आली. नागपूरच्या कृष्णाकुंभाराने त्यांचें हुबेहुब मातीचें चित्र केलें होतें. तें लेखकानें लहानपणी पाहिलें आहे. या कुटुंबाव्यतिरिक्त इतरहि अहेरराव लहान सरकारवाड्यामागे राहात. त्यापैकी बहिर्जी अहेरराव व मालोजी अहेरराव हे लढवय्ये होत. मालोजीच्या हाताखालीं १ हजार घोडेस्वारांचा रिसाला असल्याचें दिसून येतें.

सप्तकुळीपैकीं महाडिक व पालकर या आडनावाचीं दोन कुळें राहिलीं. त्यांच्यांत फक्त भोसल्यांशी नात्याने निगाडित झालेली मंडळी दिसते.

सप्तकुळी बाहेर

वरील सप्त कुळींतील मराठ्यांशिवाय इतर मराठ्यांनीही महत्वाची कामगिरी बजावलेली दिसते. अशांचा अन्तरभाव शहाण्णव कुळी मराठ्यांत केला जातो. त्यांपैकी रघोजी करांडे यांची थोडीशी माहिती वर दिली आहे. नऱ्होजी जाचक, आनंदराव वाघ, त्रिंबकजी गव्हाणे, बिंबाजी वंजाळ यांचीं नावे आद्य रघोजीबरोबर आलेल्या सरदारांचे यादींत दिलेलीं सांपडतात. त्यांपैकी जाचक व वाघ यांचें कर्तृत्व मनांत विशेष भरतें. बिंबाजी वंजाळ व त्रिंबकजी गव्हाणे यांचे उल्लेख फारच तुरळक सांपडतात व यांच्या कुटुंबाचाही शोध लागला नाही. वरील खेरीज निंबाळकर, खळदकर व बागूल यांची नावें वारंवार पत्रव्यवहारांत व इतरत्र सांपडतात. जाचक, वाघ, बागूल व खळतकार यांच्या वाड्यांचे अवशेष नागपुरातील बुधवार पेठेंत लेखकाच्या पाहण्यात आले. नऱ्होजी जाचक याने कटक प्रांतावर मूळ अंमल बसविला. तो तेथील पहिला किल्लेदार होय. तो रघोजी बरोबर कर्नाटकांतहि होता. मुधोजी व जानोजी या दोन बंधूंच्या झगड्यांत तो जानोजीच्या पक्षाचा असे.

१ नागपुरांतील गोंड किल्यासमोरील वाड्याचे भूतपूर्व मालक.

तो पांचगावच्या लढाईत दिसतो यावरून तो दीर्घायुषी होता हें सिद्ध होतें. त्यानंतर त्याचा मुलगा रखमाजी जाचक याचेशी वॉरन हेस्टिंग्सचा कितीतरी पत्रव्यवहार झालेला दिसतो. बागुलांचा मूळ पुरुष उदाजी हा होय. तो आपला पुत्र सुलतानजी व नातू जानोजी व उदाजी यांस घेऊन इकडे आद्य रघोजी बरोबर सातान्याहून आला. सुलतानजी बदामीच्या वेढ्यांत कामास आला व जानोजी व उदाजी हे जानोजी व द्वितीय रघोजी भोसले यांच्या कारकिर्दीत अनेक लढायांत हजर होते. जानोजी बागुलांच्या मुलाचें नाव गोंदाजी असून, त्याला रु. २२२२ वार्षिक पेन्शन मिळत असे. यांचे पैकी सयाजी नावाचा एक लढवय्या १८०३ च्या लढाईत ४०० स्वारांचा अंमलदार दिसतो. आजहि बुधवारीतील प्रसिद्ध व्यक्ति श्रीयुत उदाराम पहीलवान यांच्या घरामागे असलेला बागुलचा आखाडा प्रसिद्ध आहे. बागुलाप्रमाणे निंबाळकरहि प्रसिद्ध होत. नागपूरच्या इतिहासांत लढवय्ये व मुसद्दी म्हणून पिराजी नाईक निंबाळकर यांस महत्वाचें स्थान आहे. यांचे शेवटले वंशज सातान्याकडे परत गेले. यांचाहि एक आखाडा बाजीराव निंबाळकरांचा आखाडा म्हणून बुधवारींत प्रसिद्ध आहे. खळदकारांचा मूळ पुरुष खांबोजी हा आद्य रघोजी बरोबर इकडे आला. यानीच बहुधा हिंगणघाटची किल्ल्याच्या बाहेरची नवीन वस्ती वसवली असावी. ह्या कुटुंबाच्या वाड्यांचे तेथें व नागपूरच्या बुधवार पेठेत खाणा खुणा सांपडतात. यांचेपैकी माधवराव नावाच्या इसमाच्या हाताखाली आपासाहेब भोंसल्यातर्फे सिताबर्डीच्या लढाईच्यावेळी कांहीं सैन्य होतें. यांचे वंशजांपैकी एक समाजांत प्रतिष्ठा व मान्यता पावलेले लेखकाचे जेष्ट मित्र रावबहादूर निळकंठराव खळदकार हे काटोल तालुक्यांत दिग्रज येथे असतात. (हल्ली त्यांचे वय ७७ वर्षांचे आहे परंतु ते चांगले टणक आहेत) हल्लीच्या श्री बिंझाणी सिटी कॉलेजच्या मागे राणोजी नायकांचा वाडा आहे. खुद्द सिटी कालेज हा मुळांत चंद्राजी भोसल्यांचा वाडा होय. नायकांपैकी एकाने म्हणजे गिरमाजीने १८४३ त उमरावती रोडवरील बाजारगांवचे तळें बांधलें व खुद्द गांव त्यांचे आजोबा दारकोजी यांनी वसविला. यांच्या कुटुंबात हिन्यामाणकांची व मोत्यांची पारख करणारे तज्ञ असत व त्यांचे पासून तयार झालेले शिष्य, प्रशिष्यहि पहाण्यांत आले. यांचे मूळ पुरुष विश्रामजी व दारकोजी

हे दोन बंधू औरंगबाद जिल्ह्यातून इकडे आले. त्यांपैकी विश्रामजी बंगाल्यांत कामी आल्यावर दारकोजीला जानोजीचे वेळीं रिसालदाराचें पद देण्यांत येऊन शिल्लेखानाहि त्यांचे स्वाधीन करण्यांत आला व पुढेहि कुटुंबांत शिल्लेखान्याचा अधिकार चालू राहिल्यामुळें, वर म्हटल्याप्रमाणे ह्या कुटुंबात रत्नपरीक्षेचे तज्ञ निपजले. चंदाजी भोंसले हा राजकुळांतील लेकवळा होय. याने भोसल्यांचे मध्य आमदानींत संबलपूरकडे पराक्रम गाजविलेला दिसतो. चंदाजीप्रमाणेच धर्माजी भोसले हाही लेकवळाच होय. ह्याला द्वितीय रघोजीचे वेळी अत्यंत विश्वासाचें स्थान प्राप्त झालें होतें. तो परसोजीचा पक्षपाती असल्यामुळे आपासाहेब भोसल्यांच्या विरोधाला बळी पडला. ही कथा फार हृदयद्रावक असून त्याचें वर्णन एका पोवाड्यांत आलें आहे. याचा वाडा व देवळें महालावरील कर्मवीर बुक डेपोचे मागे असत. आपासाहेब भोसल्यांचे वेळी प्रसिद्धीस आलेला रामचंद्र वाघ हा वाचकांच्या माहितीचा असेल. ह्याला आपासाहेबाबरोबर पकडून प्रयागचे किल्ल्यांत ठेविले होते. बुधवारींतील वाघांच्या वाड्यांचे अवशेष जरी झपाट्याने नष्ट होत असले तरी, अजूनहि कांही आहेत. ह्यांचा मूळ पुरुष आनंदराव वाघ आद्य रघोजी बरोबर इकडे आला. हा रघोजी नंतर जानोजीचे पक्षाचा असे. याचे नंतर एक दादो महादेव वाघ यांचा उल्लेख पेशवे दप्तर (भाग २०) पत्र नं. २८६ मध्ये सांपडतो (१७६९) त्याच प्रमाणे १८०४ मध्ये “this is a considerable family” म्हणून उल्लेख असून ५०० स्वार पडार्जी वाघ याचे हाताखाली असल्याचा व रामचंद्र वाघ हा त्याच कुटुंबातील असल्याचा उल्लेख आहे. नागपूर रेसीडेन्सी रेकार्ड वरून असें दिसतें कीं, कालांतराने रामचंद्र वाघ इंग्रजांचे कैदेतून सुटला असून एलीचपूरच्या बाजूला त्याचे मुलीकडे त्याला रहावयास परवानगी मिळाली. त्यांचे वंशज मानसींगराव वाघ यांची भेट अनेकदा घेतली परंतु काही माहिती मिळाली नाही.

वरील कुटुंबांखेरीज कदम, बांडे, नवघरे, तुपकर, बारोकर, साळुंखी गायकवाड, पाटणकर, शेळके, माने, भापकर, इंगळे, चव्हाण, पवार, पांढरे, शिंदे, अशी बडी बडी मंडळी एकेकाळी प्रसिद्धीस आलेली दिसते. यांचेपैकी

काही ओडीमात मृत्यू पावले, कांहीं बदामी व खर्ड्याच्या लढायांत कामास आले तर काहींचे देह निरनिराळ्या घारातीर्थी पतन पावले. कांहीं वेळोवेळी आपल्या मूळ गावी परतले, तर कांहीं नागपूरच्या आसपास विखुरलेले दिसतात. यांचा शोध केल्यास पुष्कळ माहिती मिळण्याचा संभव आहे. कालाच्या प्रभावामुळे हल्ली त्यांचे वंशज पूर्वपराक्रम व कर्तृत्व विसरून गेले असून कोणी शेती, तर कोणी किरकोळ नोकरी करीत असताना दिसतात. कांहीं क्वचित् अजूनहि कोंबड्यांच्या झुंजींत दंग होत असताना आढळतात.

भाग चौथा

कर्तृत्ववान पुरुष–इतर

ब्राम्हण मंडळी

यांच्यांत एकापेक्षां एक पुरुष निर्माण झाले. बखरींतील यादींत ४ नांवे दिसतात. त्यांपैकीं, भास्करराम कोल्हटकर व त्यांचे बंधु कोन्हेरराम यांचे विषयीं थोडेसें वर आलें आहे. वस्तुतः कोन्हेरराम विषयीं अधिक लिहावयास पाहिजे होतें, कारण कोन्हेररामामुळेंच पुष्कळ अंशाने आद्य रघूजीला सेनासाहेब सुभा हें पद मिळालें. यांनी खंडोबल्लाळशी सन्धान बांधून शाहूचें मन वळविलें होतें. शाहू कोन्हेररामास आपला जावई समजत असे. वरील दोघाप्रमाणें व्यंकाजीपंत बक्षी, रघुनाथभट झिपरे पटवर्धन, विश्वंभर वैद्य व अनंतभट चितळे यांचे विषयीही लिहावयास पाहिजे. व्यंकाजीपंतांचे वंशज जेन्किन्सचेवेळीं कामावर होते परंतु त्यानंतर त्यांचा पत्ता आम्हास लागला नाहीं. उलट व्यंकाजींचे वंशजाचे मुतालिक अवधूतपंत मात्र पुढे आले व त्यांचे वंशज हल्ली हयात आहेत. गायनक्षेत्रांत प्रसिद्ध असलेले बाळासाहेब बक्षी व त्यांचे बंधू यांचा वंश हल्ली चालू आहे व त्यांची पुरेशी हकीकत नमूद करून ठेविली आहे. रघुनाथ भटांच्या कुटुंबाविषयीं तरुण भारताच्या २८-१०-५१ च्या अंकांत लिहिलें आहे. विश्वंभर वैद्य हे जर विश्वनाथ रघुनाथ वैद्य असले, तर पुण्यांतील वैद्य दप्तरांचे संपादक कै. शंकर लक्ष्मण वैद्य यांनी त्यां कुटुंबाचें वृत्त प्रसिद्ध केलेच आहे. यांचे पैकीं बाबूराव विश्वनाथ वैद्य हे भोसल्यांच्या

राज्यांत पेशव्यांचे वकील व निरीक्षक म्हणून मोठ्या सचोटीनें व सावधपणें कामकाज करताना व पेशव्यांना भोसल्यांच्या अन्तस्थ राजकारणाची वेचक माहिती पुरविताना दिसतात. नागपुरांत वकीलपेठ म्हणून एक पेठ आहे. परंतु तेथील अवशेषावरून निश्चित असा पत्ता लागत नाहीं. वस्तुतः पेशवे दरबाराचे वकील कोठें तरी जवळपासच रहावयास पाहिजेत इंग्रजांचा वकील कोलब्रूक यालाहि जवळच उतरविल्याचें नमूद आहे. अझूनहि एका वाड्यासंबंधी आम्हास शंका आहे. अद्याप निश्चित अनुमान झालें नाहीं. पटवर्धन कुटुंबानें मात्र नागपूरच्या राज्यांत जानोजीच्या वेळीं बराच भाग घेतला आहे. रघुनाथभट पटवर्धनानी १ लक्ष रुपये नगदी दिले नसते व १ लक्षाची हमी घेतली नसती, तर रघूजीला सनद मिळाली नसती, असा पेचप्रसंग उद्‌भवला होता. या त्यांच्या मदती बद्दल उतराई व्हावे म्हणून त्याना शिक्केनवीस नेमलें व असें नमूद आहे कीं, रघुनाथ भटाची पत्नी बचाबाई हिच्या पाटलीच्या सोन्याचा शिक्का राज्यांत रुढ होता.[1] या बाईनें बांधलेले एक देऊळ इतवारींत आहे. यांचे वाडे डॉ. चोळकरांचे हवेली मागे असत. वंशज वे. मू. राजाभाऊ हे नागपुरांतच ७८ वर्षांच्या वयांत २३-१०-१९५१ रोजी वारले. त्यांचा भोसलेकुलाविषयींचा अभिमान प्रशंसनीय होता. स्वतः ते वैदिक या नात्यानें उपजीविका करीत चितळ्यांच्या कुटुंबाने मात्र अझून आम्हास संशयांत ठेविलें आहे. कागदपत्रांचा अभाव अशा वेळीं फार नडतो. कांहीं अविच्छिन्न परंपरा असली तरी भागते, पण तसेंही कुटुंब दृष्टीस पडलें नाहीं.

या नंतर जी मंडळी पुढे आली त्यांत भवानी नागनाथ मुन्शी व श्रीधर लक्ष्मण मुन्शी, देवाजीपंत चोरघडे, भवानीपंत काळू व त्यांचे बंधू, विठ्ठल बल्लाळ सुभेदार, नारोशंकर जामदार, शिवभट साठे, नारोबा काळीकर, आनंद माधव फडणवीस, रामचंद्र दादो वकील, व्यंकाजी सगदेव, गोपाळपंत रिसालदार, सखाराम अवधूत बक्षी, आनंदराव कोठेकर, येसोबा पाणतावणे, तुकाराम जैराम भूत, महादजी बल्लाळ लष्करी, महादजी अमृत मखलाशी, नारायण गोपाळ पंडितजी, पेटकर, नागो त्र्यंबक, रामाजी केशव तिखे, सदोबा आपदेव, दामाजी खोलकुटे,

१ यांत केवळ भावनेचा भाग आहे.

मनभट उपाध्ये, चिंतामण भाऊ कप्तान घारपुरे, हरबाजी कतर्णी हे प्रमुख होत. यांचे पैकीं प्रत्येकाचें जीवनचरित्र व कुटुंबवृत्त लिहिणे स्थळ-संकोचास्तव अशक्य आहे तथापि वाचकांच्या कुतूहल वृत्तींचें थोडेतरी समाधान व्हावें म्हणून धावतें वर्णन करण्याचें योजिलें आहे.

नागो त्र्यंबक व नारायण गोपाळ पंडितजी यांचें स्थान निराळें आहे. हें जर सोडलें तर बाकींच्या बहुतेक कुटुंबांनी नागपूरच्या वैभवांत व उत्कर्षांत महत्वाची भर घातलेली दिसते. चोरघडे यांच्यावर तर एक स्वतंत्रच निबंध हवा. पेटकर व भूत हे खाजगीतले अधिकारी हे गोंडाच्या वेळेपासून अधिकारावर होते. काळूंचें कुटुंब लढवय्याचें होय. यानाही एक स्वतंत्र निबंध हवा. यांनी बक्षीगिरी व दिवाणगिरी दोन्ही उपभोगिली आहेत. विठ्ठल बल्लाळ परांजपे सुभेदार हा ४० वर्षें मलकापूरपासून तो बदामी पर्यंत व आडगांवपासून तो भोपाळपर्यंत लढतांना दिसतो. तसाच त्याचा मुलगा गणपतराव हा आपासाहेबांचे वेळीं नागपूरच्या लढाईंत (१८१७) व नंतर पेशव्याबरोबर दिसतो व शेवटीं नगरच्या तुरुंगातून इंग्रजाशीं पत्रव्यवहार करतांना आढळतो. मनभट उपाध्ये हाहि अरबाबरोबर लढला व भंडारा जिल्हयांतील अंबागड तुरुंगांत जाऊन पडला. व्यंकोजी सगदेव कटकच्या सुभेदारीपर्यंत वाढला. कोठेकर, पाणतावणे, बक्षी व रिसालदार यांनी द्वितीय रघूजीच्या वेळी तलवार गाजविली. चिंतामण भाऊ हे तृतीय रघूजींचे वेळीं फौजेचे मुख्य असून थोडे लढले आहेत, पण त्यांचें धोरण राजास विशेष अनुकूल नव्हतें. मुन्शी हे राज्याचे दिवाण. यांचें चारित्र विवेचक पद्धतीनें लिहावयास हवें. देवाजीपंत व खोलकुटे यांनी मोतीबाग वसविला म्हणून नमूद आहे. चिमूरचें व नागपूरचेंही बालाजीचें देऊळ चोरघड्यांचेच होय. त्यांनी विद्येलाही उत्तेजन दिलें महादजी लष्करी हा मुत्सद्दी. जामदार मुळांत लढवय्ये. परंतु पाचगावच्या लढाईंत जखमी झाल्यापासून जामदार खान्यावर राहिले. तरी वंशजांत मधून मधून रक्त उसळलें आहे. काळीकर मालकाळीचे अधिकारी व खजीनदार असून आबदेव व तिखे हे त्यांचे

१ लेखकांचें आजोळ. २ पहा हितवाद अंक १९–२–५२ [इंग्रजी] यांत लेखकानें थोडें लिहिलें आहे.

दुय्यम होत. फडणवीस हे अकाउंटंट जनरल. पण मूळ पुरुष आकोटचा किल्लेदार असे. नंतर यांचेपैकीं कांहीं कमिश्नरच्या व कांहीं इतर दुय्यम पदावर असत.

आम्हास या सर्वांची कुलकथा तपासतां असें दिसून आलें कीं, ज्यांच्या कुटुंबांत तलवार गाजली, त्यांच्या वंशजांच्या वागणुकींत आजही करारी वृत्ती वगैरे सारखे अनुकरणीय गुण दिसून येतात. मुलकी अधिकारी व मुत्सद्दी यांचे वंशजांत त्या वृत्तीस लागणारे गुण थोडया फार प्रमाणांत दृग्गोचर होतात. जे कपटी व कारस्थानी होते, त्यांच्या चारित्र्याचे अवशेष अजूनहि त्यांच्या कुटुंबांत रेंगाळत आहेत असा संशय येतो. अर्थात बहुतेकांचे जुने ऐश्वर्य राहिलें नाहीं. क्वचित् दुर्दैवानें निर्वंश झाले किंवा नापत्ता झाले. जे बरे आहेत त्यांच्यात काळीकर, मुन्शी, फडणवीस, जामदार यांचा उल्लेख साभिमान करावयास हवा. एवढी गोष्ट खरी कीं, नागपूरच्या सांस्कृतिक जीवनाचें जर कोणी पोषण केलें असेल तर या महाभागांनीच. मुन्शी, काळीकर, जामदार, बक्षी यांचीं देवळें व देवस्थानें प्रसिद्ध आहेत. मुन्शीनी तर काशीला घाटच बांधला व काळीकरांचे पौनी येथील मंदिराचें जरी जुने वैभव कायम नसलें तरी तें बरेंच टिकून आहे. काळूचें वाशीमचे मंदिर तर दूरपर्यंत प्रसिद्ध आहे. सुभेदार परांजपे यांचे ऐश्वर्य एकेकाळी पातूर नंदापूरला (आकोला जि.) होतें. आजहि तेथील वेशीची कमान, गढी वगैरे जुन्या वैभवाची साक्ष देतात. नागपुरांतील त्यांच्या नष्ट झालेल्या वाड्यांची स्मृति लेखकाच्या दृष्टीसमोर अझून खेळत आहे. एक शौक म्हणून वेश्या बाळगणें व नाच रंगांत दंग होणें यांत मोठ्यांच्या दृष्टीनें पूर्वीच्या काळी विशेष दूषणीय नसे. तरी बऱ्याच लोकांनी साधुसंतांच्या संगतीचा व भक्तीचा लाभ घेतलेला दिसतो. काळू, मुन्शी, पाणतावणे, सगदेव; बक्षी, आवदेव, हे निरपवाद सच्छील दिसतात. देवाजीपंत चोरघडयांना बटकीपासून एक पुत्र असे. तरी बुद्धीनें मात्र देवाजीपंत सर्वांवर ताण असे. त्यानें राष्ट्रीय दृष्टीनें कांहीं घृणास्पद वर्तन केलें आहे. इतर प्रमुख पदांवर असलेल्यांवरहि कांहीं ठपका येतो, पण विशेष बारकाव्यानें पाहण्याचें हें स्थळ नव्हे.

वर आम्ही मुख्यतः नागपुरच्याच मंडळींचें वर्णन केलें आहे. भोसल्यांचा अंमल चंद्रपूर, देवगड, छत्तीसगड, वऱ्हाड व ओरिसा इत्यादि, भागांवर असे व जरी फौजी व मुलकी मुख्य अधिकाऱ्यांना राजधानींत येऊन राहावें लागे, तरी उपरोक्त ठिकाणीं कांहीं महत्वाचे स्थानिक अधिकारी व प्रतिष्ठित कुटुंबें स्थायिक झालीं होतीं; त्यांचा समावेश ह्या वर्णनांत न केल्याबद्दल वाचक क्षमा करतील. यांचीं कारणें दोन. एक तर विस्तार-भय व दुसरें त्यांच्या संबंधी पुरेशा संशोधनाच्या अभावी असलेली त्रोटक माहिती हें होय. ह्या करितां स्थानिक मंडळींनी करून शोध करावयास हवा. ह्यापुढे येणाऱ्या वर्णनांसहि हाच न्याय वाचकांनीं लागू करावा, अशी त्यांस विनंती आहे.

मुसलमान घराणीं

लष्करांत किंवा इतरत्र मराठ्यांच्या पदरी मुसलमान नौकर असणें किंवा त्यांच्याशीं प्रेमाचे संबंध असणें किंवा त्यांच्या हातीं सत्ता व शक्ति असल्यास त्यांची मदत घेणें, ही त्यावेळची सामान्य पद्धति असे. मीर-हबीबच्या सहाय्यानेंच अलीवर्दीखानाविरुद्ध भोसल्यांच्या बंगालवर स्वाऱ्या झाल्या होत्या. एलिचपूरच्या नबाबाशी भोसल्यांचे असेच सलोख्याचे संबंध असत. निझामाशी घडून आलेल्या उलट सुलट संबंधाविषयीं तर सांगावयास नको.

शिवणीचे दिवाण

शिवणीच्या दिवाणांचें कुटुंब हें एक सत्वशील मुसलमान घराणें होय. त्याचा समग्र इतिहास येथें देणे शक्य नाहीं. त्यांच्यापैकीं प्रत्येक पुरुष पराक्रमी व सच्छील दिसतो. या कुटुंबाचा पहिला पुरुष राजखान रोहिला याचा संबंध पहिल्यानें बख्तबुलंद या गोंड राजाशी आला. त्यानें बख्तबुलंदवर जंगलांत अस्वलाचा हल्ला झाला असतां, त्याचा प्राण वाचविला. यावर खूष होऊन राजानें स्वतःच्या नातेवाईकास बाजूला सारून त्याची शिवणी तालुक्याची जहागिरी राजखानला दिली. भंडारा जिल्ह्यांत प्रतापगड येथील आपल्या सासऱ्याच्या सहाय्यानें राजखानाने सानगडी तालुका गोंड राजाकरितां ताब्यांत

घेतला. सन १७४३ त देवगड व शिवणी हे प्रान्त राज्यांत समाविष्ट झाल्या-वर रघूजीनें चांद सुलतानच्या वेळची शिवणी तालुक्याची सनद राजखानचा मुलगा महमदखान याच्या नावानें कायम केली व शिवाय 'दिवाण' ही पदवीही बहाल केली. त्याने छपाऱ्याची वाढ करून डोंगरताल येथील किल्ला व तळें बांधलें. महंमदखान १७५९ इ. ला वारला. त्याचे नंतर मजीदखान दिवाण झाला. तो १७७४ त वारला. बख्तबुलंदचा अनौरस मुलगा वलीखा याचे विरुद्ध मजीदखाने रघूजीस मदत दिली होती. कालान्तरानें उपरोक्त सानगडी प्रांत मजीदखानने राज्यांत दिला. १७६३ साली जेव्हां भोसले राक्षस-भुवनच्या लढाईवर गेलें तेव्हां चांद्याचा बंदोबस्त त्याचेवर सोपविला होता. त्याच्या भावाने कटकचा सुभेदार शिवभट साठे याला शह दिला होता. पाचगावच्या लढाईत तो आपला पुत्र अमीनखान यास घेऊन हजर होता. साबाजीचा वध झाल्यावर मुधोजी राघोबाचा पक्ष सोडून कारभाऱ्यांचा पक्षास जाऊन मिळाला. नारायणराव पेशव्याच्या खुनांत सामील असलेला इसफखा गार्दी हा पळत पळत शिवणी पर्यंत आला असतां, त्याला पकडून व त्याच्या हातापायांत बेडया टाकून पेशव्यांच्या स्वाधीन करणारा इसम मजीदखान हाच होय. मजीदखान केव्हां वारला, हें वर दिलें आहे. नंतर अमीनखान दिवाण झाला. हा खडर्यांच्या लढाईत (१७९५ इ.) होता. त्यानें शिवणी वसाविली व छपाऱ्यावरून स्थलान्तर केलें. हल्लीचा महाल यानेंच बांधला. यानंतर एका मागून एक दिवाण झाले. मध्यंतरी खड्गभारतीने[1] दिवाणगिरी केली. १८१८ त प्रांतातील इतर भागा-प्रमाणें हाहि भाग इंग्रजांच्या स्वाधीन झाला व दिवाणांच्या कुटुंबांत ३० मालगुजारी व ८९ उबारी गावें राहिलीं. हल्लीचे दिवाण नजफली हे असून त्यांचे हायकोर्टांत एक भांडण चालू होतें. १९३० साली त्यांच्या

---

१ या खड्गभारतीच्या वाडयाचे अवशेष नागपुरांत मेहदीबागकडे आमच्या पाहण्यांत आले. याच्या वंशजापैकीं एकाकडे रामटेक येथील चिमाबाईच्या समाधीच्या भोवतालच्या बगीच्याची व्यवस्था असावी असा तर्क आम्ही नुकतेच रामटेकला जाऊन आलो असता जी माहिती मिळाली त्यावरून करावासा वाटतो.

इस्टेटीचे एकूण उत्पन्न १ लक्ष ४९ ह. रुपये असून खर्चवेच जाता १८ ह. चे निव्वळ उत्पन्न होतें.

नबाब सिद्दीकअली

दुसरें महत्वाचें कुटुंब म्हणजे नबाब सिद्दीकअली यांचे होय यांचे त्याच नावाचे वंशज पाकस्थानांत स्थायिक झालेले दिसतात. यांचेकडे किंवा इतर मुसलमानांकडे जुने अस्सल कागद म्हणून एक चिठोरेही उपलब्ध झालें नाहीं नबाबपुरा म्हणून जो मोहल्ला नागपुरात प्रसिद्ध आहे व जो १९२७ च्या हिंदु मुसलमानांच्या दंग्याच्या वेळीं उद्‌वस्त झाला, तो मोहल्ला नबाब सिद्दीकअली यांनी वसविला होता. याच्या बापाचें नांव महंमद इब्राहीम. हें कुटुंब मूळ म्हैसूरकडचें होय. याला प्रथम कर्नाटकांतून हैदरानें आपल्या पदरीं आणलें. टिपूसुलतानचा वध झाला त्यावेळीं सिद्दीकअली त्याचेकडे नौकर होता. टिपूची वासलात लागल्यावर हा प्रथम हैद्राबादच्या निजामाकडे गेला तेथें जेव्हां बस्तान बसलें नाहीं तेव्हां तो नौकरीनिमित्त नागपूरकडे वळला. त्याला प्रथम २०० स्वारांचे अंमलदार करण्यांत आले. त्याने टिपू सुलतानच्या एका मुलास इंग्रजाच्या स्वाधीन केलें होतें तेव्हां मुळांतच हा माणूस इंग्रजाकडे झुकलेला दिसतो. याने पहिला पराक्रम द्वितीय रघूजीचे वेळीं वऱ्हाडांत गाजीखानाविरुद्ध गाजविला. नंतर तो भोसल्यांच्या बरोबर गोदावरीच्या यात्रेंत होता. पुढें त्यानें पेंढाऱ्यांवर चाल करून कांहीं वर्षें मीरखानाला टक्कर दिली. त्यांची छावनी गादरवाडा¹ येथे असे. पुढें सीताबर्डीचे लढाईचे वेळीं तो लढाईच्या विरुद्ध होता म्हणून आपासाहेबाने त्याला कैदेत टाकलें होतें. अरबांना नागपूरच्या बाहेर घालविण्यास यानेंच मदत केली. पुढें इंग्रजानी नेमलेल्या नारायण गोपाळ पंडितजी कडून राज्याचा कारभार होईना, तेव्हां नबाबाची नियुक्ति केली; पण

---

१ गादरवाडा येथील किल्ल्याचे अवशेष पाहण्यांत आले त्यावेळच्या कमावीसदाराचे कुटुंब किल्यापासून थोडया अंतरावर राहात असून तें सुस्थितींत आहे. त्यांजेजवळ जुने कागदपत्र मिळाले नाहींत पण कांहीं तुरळक जुन्या वस्तु पाहावयास मिळाल्या व कांहीं मनोरंजक गोष्टी ऐकावयास मिळाल्या.

तोहि अपेशीं ठरला. नंतर त्यांचें महत्व दिसत नाहीं. फक्त त्याला इंग्रजानी वार्षिक १८ हजार रुपये पेन्शन कायम केलें. पुढे त्याचा मुलगा इसनअली याच्या नावानें ३० गावांची जहागीर राहिली व त्याने मोहपा येथें वास्तव्य केलें. यांच्या वाड्याचे अवशेष मोहप्यास आजहि दिसतात. तेथील मुरलीधराचा रथ इसनअलीचे हातचा आहे, असें सांगण्यांत येते. नबाब सिद्दीकअलींचा कादरअल्ली म्हणून एक निका लावलेल्या पत्नी पासून झालेला मुलगा होता. तो व इतर मुसलमान १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धांत सामील झाल्याच्या (Treasonable Conspiracy against state) आरोपावरून इंग्रजांकडून १० जणांवर खटला भरण्यांत आला होता. त्यांपैकीं तिघांना फाशी झाली. त्यांत कादरअली एक होता. त्यावेळी तो सुमारें ६० वर्षांचा असूनही त्याच्या [1]फासाची तात दोनदां तुटल्याचे कै. या. मा. काळे यांनी लिहिलें आहे. यावरून त्याच्या शक्तीची कल्पना येते. असें म्हणतात कीं, या घराण्यांत खूब संपत्ति असे व पायांत सोन्याचा तोडा घालण्याचा त्यांना मान होता. अद्यावत् सांगावयाचें म्हणजे नबाबांच्या समाधी ह्या शेजारीच नागनदीच्या पुलाजवळ असून आज एक पडके घर व मशीद एवढेच अवशेष नबाबपुऱ्यांत आहेत. राजाचे मीठ खाल्लेल्या एका मुसलमान पहिलवानानें १९२७ च्या दंग्यांत या पुऱ्यांतील असहाय हिंदूवर बंदूक चालविली होती व त्यामुळें दंग्यास भीषण स्वरूप आलें होतें. ही भूमीच तशी शिवणीचे दिवाण निराळे !

हकीमजी

हकीमजीची तट्टी म्हणून शुक्रवार तळ्याच्या ईशान्य कोपऱ्यांत वाकररोडच्या व भालदारपुऱ्यांच्या मागें एक जुना वाडा आहे. हकीमबुनियाद हुसेन तृतीय रघुजीचे मृत्यूचे वेळीं हा २५[2] वर्षांचा तरुण होता. त्याचा वडील यादगार हुसेन हा येथें आला. कुटुंबीय तर पूर्वज इराणांतून आल्याचें सांगतात

---

१ याला ता. १४-८-१८५७ रोजीं फाशी दिलें. त्याला ३४१९ रु. वार्षिक पेन्शन असे.

२ हिस्लाप तर हा १५ वर्षांचा होता असें म्हणतो.

खरें असेल देव जाणे. पुरावा मात्र दिला[1] नाहीं. यादगार हुसेनचे वेळींच शुक्रवार तळयांतून यांचे घरी पाण्याचे नळ नेले होते व त्या नळांचा संबंध इतवारीतील मींठगंज टाक्याशी असल्याबद्दल आम्हास संशय नाहीं. तृतीय रघूजीनें १७३७ मध्यें ८००० रु. वार्षिक वेतनावर यादगार हुसेनला पारडीच्या सैन्यात 'मेजर' म्हणून नेमिले[2] होते, पण त्याला तें काम झेपलें नाहीं. हा १७३९ मध्यें राजाबरोबर काशीस गेला होता. याला ५००० रु. पगार व शिवाय ८ ह. रुपये 'गुडाखू' करितां वार्षिक वेतन मिळत असे. हा वारला तेव्हां, कुटुंबाच्या इस्टेटीची अफरातफर होऊ नये म्हणून (इस्टेटीची किंमत ६० ह. रुपये) ती राजानें आपले स्वाधीन केली व मुलाला म्हणजे बुनियाद हुसेनला पूर्वीचेंच वेतन चालू ठेविलें. राजाचे मृत्यूनंतर ८ हजार रुपये चालू असल्याचे नमूद असून ५ ह. रु. चा प्रश्न अनिर्णित असल्याचा उल्लेख सापडतो. आजहि या कुटुंबांत वार्षिक २॥ ह. रुपये पेन्शन चालू आहे. राजाच्या मरणापूर्वी ज्याना औषधी-क्रिया केली त्यांच्यांत सर्व मुसलमान होते; असे इंग्रजी दप्तरावरून दिसते पण बुनियाद हुसेनचें मात्र त्यांत नाव नाहीं. दुसरें एक आश्चर्य हें कीं, हिंदूंत इतके नामांकित वैद्य असतां राजानें युनानीच औषध कां घ्यावें ? हे कुटुंब शिया पंथी असून एकेकाळी यांचेकडे मोहरमांत मोठा उत्सव होई. लेखक तेव्हांच्या पद्धतीप्रमाणें आपल्या भाविक आजोबाबरोबर त्यांचें बोट धरून या व अशा मोहरमांतील इतर उत्सवांत व स्वाऱ्यांत रात्रीच्या वेळी गेला आहे. उत्सवांत चालणाऱ्या गायनाचा धांगडधिंगा समजो कीं न समजो, उत्सवांत भाग घेणे तेव्हां पुण्यकर्म समजलें जाई. हल्ली कुटुंबात इस्टेट ही विशेष उरली नाहीं व कुटुंबीयांत शिक्षणहि बेताचेच आहे.

१ हिंदुस्थानांत बहुसंख्य मुसलमान धर्मच्छळामुळें बाटलेलेच दिसून येतात.

२ तृतीय रघूजींचें धोरणच होतें कीं, मानकऱ्यांना कांहीं तरी कामाला लावावयाचें.

इमदाद हुसेन

चौथे कुटुंब इमदाद हुसेन[१] यांचें. यांच्यांत चांगले गौरवर्णीय, सुदृढ, देखणे व सुशिक्षित पुरुष आढळतात. मूळ पुरुष हाजी अबदुल शकूर हा पहिल्या जानोजीचे वेळीं राज्यांत आला व त्याला ३०० द. म. वर न्यायाधिशाची जागा देण्यांत आली. पुढें २-३ वर्षांनी तो मक्केस गेल्यामुळे, त्याचा मुलगा गुलाम हुसेन याची नियुक्ति झाली. आपासाहेबाचे पदच्युतीचे वेळी त्याला पेन्शनींत काढलें. जेन्किन्सनें त्याला पुनः कामावर बोलाविलें पण तो रुजू झाला नाही. त्याला अश्राफ हुसेन व सफदर हुसेन असे दोन मुलगे होते. अश्राफ हुसेनला न्यायाधिशाची जागा देण्यांत आली परंतु पुढें तृतीय रघूजीने राज्य सूत्रें हातीं घेतल्यावर त्याला ५०० रुपये दरमहावर छिंदवाड्याचा सुभेदार नेमले व त्याच्या इमदाद हुसेन नांवाच्या वडील मुलास न्यायाधीश केले. परंतु, इमदाद हुसेन अल्पवयी असल्यामुळे त्याचा चुलता सफदर हुसेन ते काम पाहात असे. अश्राफ हुसेनच्या मृत्यूनंतर इमदाद हुसेन छिंदवाड्याचा सुभेदार झाला व सफदर हुसेन स्वतंत्रपणे न्यायाधीशाचें काम करूं लागला. मरणापूर्वी त्याला काढून त्याचे जागी काशीराव बापू यांची नेमणूक केली व इमदाद हुसेन चांद्याचे सुभेदारांचे काम पाहूं लागला. १८५४ मध्ये इंग्रजी अंमल सुरूं झाल्यावर त्याला इंग्रज डेप्युटी कमिशनरच्या हाताखाली इ. ए. सी व्हावें लागलें. इमदाद हुसेनच्या मृत्युचे वेळी हिदायत हुसेन लहान होता, पण कुटुंब मात्र बरेच विस्तारलें होतें. यास्तव कांहीं दिवस ५०० रु. द. म. वेतन देण्यात आलें. हिदायत हुसेनला नबाब हसनअली यांची मुलगी दिली होती. हिदायत हुसेन १९०३ इ. मध्ये वारला. त्याला कमरुद्दिन व मोहीउद्दिन, असे दोन मुलगे होते. वडील मुलास त्रैमासिक ५३ रु. पेन्शन असे व दुसऱ्यास हसनअलीच्या मुलाने दत्तक घेतलें व त्याला नबाबाचें पेन्शन मिळूं लागले. हिदायत हुसेनचा धाकटा भाऊ खुर्शेद हुसेन तहसिलदार होता व त्याचे पासून वंश विस्तारून त्यांचे पैकीं एकजण श्री. मतीन अहमद हे नागपूर हायकोर्टाचे रजिस्ट्रार आहेत. या कुटुंबाचे

---

१ लोक उमदामिया म्हणून म्हणत.

विशेष लक्षण हे कीं, जसा मूळ पुरुष कायदा व इतर विद्येत निपुण होता तीच विद्येची परंपरा व सरकारी नोकरीची प्रवृत्ति कायम राहिली.

मीर अझीझ

पांचवें महत्वाचें कुटुंब मीरअझीझ यांचे होय. हल्लीची इतवारी स्टेशनची इमारत वगैरे धरून एकेकाळीं कुटुंबांत १ लक्ष ६० ह. चौरस फूट या आकाराची मालकीची जागा असे. यांचें कुटुंब वृत्त फिदा हुसेन या गृहस्थानें सुमारें ४० वर्षांपूर्वी उर्दूत[1] लिहिलें आहे. तो १९३४ साली ९० वर्षांच्या वयांत वारला. हें मूळ कुटुंब दिल्लीकडचे, सरकारी कागदांत हैदराबादचे म्हणून नमूद आहे. मूळ पुरुष मीरअझीझ उर्फ महम्मद युसुफ ह्याच्या जवळ २०० घोडे स्वार होते. त्याला द्वि० रघूजीने नौकरीस ठेविले व खर्चाकारितां आंजी व विठूर १२ ह. रुपये उत्पन्नाचीही दोन गावे जहागीर दिलीं. आपासाहेबाच्या पदच्युतिनंतर ही जहागीर जप्त करण्यांत आली फक्त या कुटुंबांत ८० घोड्यांचा रिसाला राहिला व पगार द. म. ५०० रु. ठरविण्यांत आला. तृतीय रघूजीचे वेळीं वृद्धत्वामुळे मीरअझीझला मान फरी करण्यांत आलें व सालीना २ ह. रुपये बैठे वेतन दिलें. मुलगा खैरातअली यास ५० स्वारावरचा अधिकारी नेमून त्याचा २०० रु. द. म. पगार केला. १८५३ मध्यें मीरअझीझ ९८ वर्षांचा असल्याचे नमूद आहे. कुटुंबवृत्तांत १८५७ त तो १०७ वर्षांचा होऊन वारला, असें लिहिलें आहे. मीरखैरात-अलीला बापाचें पेन्शन मिळालें व तोहि १८९९ मध्यें ८० वर्षांचा होऊन वारला व त्याची पत्नी सुमारें ६ वर्षांपूर्वी वयातीत होऊन वारली. मीर-अझीझला १२ मुलगे असल्याचे कुटुंबवृत्त म्हणते, तर सरकारी कागद ही संख्या १९ देतो व शिवाय मुली व त्यांचा विस्तार. परिणाम असा झाला कीं, यांच्याच मोहल्यांतून आम्हाला बरेच टांगेवाले दिसू लागले, अर्थात त्यावेळीं असें कां होते म्हणून उत्तर माहीत नव्हतें विशेषतः त्यांची मुजोरी त्यांच्या गतवैभवामुळे असावी. मीरअझीझच्या स्ततःच्या व भावाच्या

---

१ याची एकच छापील प्रत कुटुंबांत होती. ती नुसती वाचून दाखविली.

साधुत्वाबद्दलहि कांहीं गोष्टी आहेत. बर्डीच्या किल्यावर एका मुसलमान साधूची समाधि आहे, ती कोणाची आहे हे सांगता येत नाहीं. नवगजअली म्हणून नांव सांगण्यांत येतें. बंडाचे वेळीं ज्यांना शिक्षा झाल्या त्यांचे पैकीं कांहींना किल्यावर पुरल्याचें हिस्लॉप चरित्रांत सांपडतें.

येथे वांचक अशी शंका घेतील कीं, कर्तबगार ब्राम्हण कुटुंबांच्या मानानें मुसलमानांचा वृत्तांतच अधिक विस्तारानें देण्यांत आला. वस्तुत: मुसलमानाविषयी आणखीहि लिहिण्यासारखें आहे. ब्राम्हणांना पुष्कळच जागा हवी कारण त्यांचें कर्तृत्व तेवढेंच प्रभावी, विस्तृत व दीर्घकालीन आहे. सरकारी कागदांचा अभ्यास करीत असतां असें दिसून येते कीं, सुमारे ३५ मुसलमान मानकरी होते. यांत एकाचें नांव सर्जेराव वल्द बाजीराव भाट म्हणून आहे. ' He is a Musalman notwithstanding his peculiar name असें तेथें स्पष्ट म्हटलें आहे. याचा वडील जानोजी व द्वि० रघुजी यांचे वेळीं ५० वर्षांच्या वर शिल्लेदार होता. यावरून भोसलेकाली नौकरीची किती शाश्वती होती, हें सिद्ध होतें. हा हुशंगाबादच्या लढाईंत पडला. वरील मानकऱ्यांत ५ असे असत कीं, त्या सर्वांचे मिळून सालीना १४५३० रु. पेन्शन होई. त्यापैकीं बुनियाद हुसेनच्या वाट्याला वार्षिक ६८३८ रु. व कादरअलीच्या वाट्याला ३४१९ रु. जातात. आद्य रघूजींचे वेळीं मात्र मुसलमान तुरळक दिसतात. हा सर्व भरणा जानोजी व द्वि० रघूजींचे वेळीं झाला असून, कित्येक बंगाल, बदामी खर्डा, भोपाल व हुशंगाबाद येथे कामी आले आहेत.

नागपूरच्या सत्रंजीपुऱ्यांत एक मौलवी साहेब म्हणून वयोवृद्ध व वजनदार हकीम असत. ते १०० वर्षांचे वर होऊन वारले. त्यांची तेथें एक मशीदहि आहे. त्यांचेंपैकीं इस्रायलमिया म्हणून मालगुजार व निर्वेतन मॅजिस्ट्रेट होते. ते पाहण्यांत आले अरबांच्या मोहल्यांत फक्त एकच घर आहे तें अगदी आतून तपासण्यांत आलें होतें. तेथे जुने अवशेष आहेत. जाफरहुसेन वल्द गुलाबहुसेन म्हणून एक अरबांचा मुख्य असून तो दिवाणींत न्यायाधीश असे. सीताबर्डीच्या लढाईनंतर त्याला ५०० रु. व नंतर मुलाला २०० रु. वार्षिक पेन्शन झालें.

वरील शिवाय आणखी काहीं असे मुसलमान असत कीं, ज्यांची उत्पत्ति राजपुरुषांच्या मुसलमान रखेल्यापासून झाली असे. अशीं चार तरी कुटुंबें आहेत. ते शेवटपर्यंत मुसलमानच राहिले. पेशव्यांला मस्तानी पासून झालेल्या पुत्रपौत्रांचें उदाहरण आहेच. शिवाजीचे वेळीं तरी बाटलेल्यां हिंदूंचें परत धर्मान्तर करण्यांत आलें, पण पुढे सनातनी वृत्ति अधिक बळावली. असो. वंशजास कदाचित् वाईट वाटेल म्हणून येथें तपशील देत नाहीं. एक कुटुंब वाईकरांचे घरामागे असे. दुसरा गेंदराजा म्हणून तुळशीबागे-कडे मोठा मानवाईक असे एवढे सांगितलें म्हणजे पुरे. आता नुसती रखेल्यांची यादी देऊन हे प्रकरण पुरे करतों.

रखेलीचें नांव	कोणाची	शेवटचें वार्षिक वेतन	मृत्यु
इमामबी	द्वितीय रघूजी	१२०० रु.	१८५९
मुनीरन	,,	१८० रु.	माहीत नाहीं
पूंडा	,,	८४ रु.	,,
घाना	परसोजी	१८० रु.	,,
बीजीबाई	आपासाहेब	९०० रु.	१८६९
इमामी	,,	६०० रु.	माहीत नाही
रज्जू	,,	२४० रु.	१८५८
अश्रफ्	,,	८४ रु.	माहीत नाही
इदुबाई	तृतीय रघूजी [1]	आदितवार दरवाजावर राहात असे.	
धुमनबाई	,,	अंतोबा कलारांचे घराजवळ ,,	
अब्बासबी	,,	माहीत नाहीं.	
मेहताबबी	,,	रिसालदारांचे घरामागें; हिंदु गुरूंची शिष्या.	

प्रभु घराणीं

प्रभुज्ञातीचीं काहीं कुटुंबें आद्य रघूजीचे वेळीं आलीं. वस्तुतः खंडो बल्लाळमुळें तर रघूजीला सेनासाहेब सुभ्याचें पद मिळालें, तेव्हां त्याच्या तर्फेचीही काहीं मंडळी येणें अपरिहार्य आहे. त्यांच्यापैकीं रखमाजी गणेश,

१ राज्य गेल्याचे वेळीं महालांतील नाटकशाळा व इतर बटकी वगैरे करितां वार्षिक २० ह. रुपये वेतन मंजूर झालें होतें.

नरसिंगराव चिमाजी, शंकराजी रखमाजी, महादजीपंत, काशीराव, लक्ष्मण व दिनकर–हे त्रिवर्ग बंधू (वडील विनायकराव) ही पहिल्या शिगेची मंडळी होय. नंतर रघुनाथ गोविंद, त्र्यंबकराव व सुंदरराव बहिराजी यांस द्वि० रघूजीनें आणलें. आजच्या काळाच्या ओघांतहि श्रीमंत बाळासाहेब व त्यांचे सख्खे चुलत बंधु श्रीमंत कृष्णराव चिटणवीस वैभवाने नांदत आहेत. एवढी पूर्व चिन्हे नसतीं, तर नागपुरांत प्रभुवर्ग होता कीं नाही याचा भ्रम पडला असता. आंग्लशाहीत जो प्रभुवर्ग आला, तो केवळ पोटाकरितां आला. जुन्या मंडळीनें अनेक महत्वाची लश्करी व मुलकी कामें केलीं आहेत. मालकाच्या धोरणास अनुसरून अपकृत्यांत गुरफटलेल्या एकदोन व्यक्ती सोडल्या तर, बाकींच्या प्रभूंचें चरित्र उज्वल असल्याचें दिसून येतें.

चिटणवीस[1] घराणें

खंडो बल्लाळ यांचे भाचे रखमाजी गणेश रणदिवे हे भोसल्यांचे मूळ चिटणीस होत. ते स्वारींतही असत. ते १७७१ त वारले व नंतर त्यांचे पुत्र चिमणाजी हे वडीलांच्या पदावर अधिष्ठित झाले. ते राज्यांत पाचगावच्या लढाईपर्यंत होते व पुढे वऱ्हाडांत जाऊन बसले व आपल्या नंतर कृष्णराव माधवराव या आपल्या भाच्यास स्वतःचें पद देवाविलें. १८०३ च्या अडगांवच्या तहाचीं कलमें ठरत असतांच कृष्णरावला वऱ्हाडांत मृत्यु आला. नंतर गंगाधर माधव चिटणीस झाले. त्यांचा मृत्यु १८२० ते १८२३ च्या दरम्यान झाला असावा. या नंतर माधव गंगाधर उर्फ नानासाहेब हे चिटणवीस कुटुंबांत दत्तक आले. यांचा फोटो मोठ्या वाड्यात आहे. हे १८८५ त वारले. त्यांचे नंतर सर गंगाधर हे मालक झाले व ते२७-६-१९२९ रोजी निवर्तले त्यांचे बंधू सर शंकरराव हे १९३० साली वारले.

कृष्णराव माधवराव हे राज्यांतील प्रत्येक सल्लामसलतींत सामील असत. व अनेकदां पुण्यास व लढाईवरहि गेले आहेत. पुढें द्वितीय रघूजीची मृत्युघटका जवळ आली असतां ज्या मुत्सद्यांस त्याने राज्याचा समाचार सांगितला, त्यांत गंगाधर माधव हे प्रमुख होत. आपासाहेबांनीं इंग्रजाशी तह केला त्यावेळी हे रेसिडेन्सीत होते. याना सन्तान नव्हतें. तेव्हां दत्तक

१ चिटणवीस म्हणजे चिठ्ठीनवीस.

घेण्याचा प्रसंग आला असतां[1] तृतीय रघूजींची मतभेदामुळे थोडी नाराजीहि झाली. शेवटीं घोळकर घराण्यांतील माधवराव नावाच्या मुलाची निवड झाली. कारभार मात्र हैबतराव वैद्य पाहात. राजाला रेसिडेंटच्या आग्रहामुळें माधवरावाला ५ वर्षे कामावरून दूर करावें लागलें. तरी राजा आंतून[1] मदत करी. राज्य गेल्यावर म्युनिसिपालिटी (तेव्हांची सफाई कामिटी) झाली असतां (१८६४ इ.) ते सहकाऱ्याचा आग्रह होऊनहि केवळ सदस्य राहिले; अध्यक्ष झाले नाहींत. जानोजी बरोबर नानासाहेब १८६६ त जबलपुरास प्रदर्शनास गेले असतां वाड्यांत मोठी चोरी झाली. (जेथून चोर आंत शिरले ती जागा दाखविण्यांत येते.) नानासाहेबांनी ५ लग्नें केलीं पण बरेच दिवस सन्तति नव्हती. चौथ्या व पांचव्या पत्नी पासून १५ दिवसाच्या अंतराने सर गंगाधरराव व सर शंकरराव हीं पुत्ररत्नें झालीं. नानासाहेबांनी आपल्या आयुष्यांत १५० गावे संपादन केलीं. मॉरिस कॉलेजच्या स्थापनेचे-वेळीं यानी ३ हजार रु, ची देणगी दिली होती. ते आजानुबाहू असत. ते मरण समयीं ६५ वर्षांचे होते.

सर गंगाधर हे नागपूरचे पहिल्या दर्जाचे घरंदाज, वजनदार व समतोल बुद्धीचे पुढारी होत. बाल वक्तृत्वसभेपासून तों लेजिस्लेटिव कौन्सिलच्या अध्यक्षपदापर्यंतची कामें त्यानीं शांत व समतोल वृत्तीने केलीं आहेत. डि. कौन्सिल, म्यु. कमीटी, कॉंग्रेस, हिंदुमहासभा, कांहीहि घ्या, अध्यक्षपदाचा मान त्यांचाच असावयाचा. पुढें जरी प्रखर राजकारण सुरू झाले तरी कै. नीळकंठराव उधोजी किंवा धर्मवीर डॉ. बा. शि. मुंजे यांच्या सारख्या विरुद्ध पक्षाच्या पुढाऱ्यांतहि जर कोणाविषयीं मनांत आदर असेल, तर ते दादासाहेब चिटणवीसच होत. डॉ. मुंजे हे त्यांच्या सौजन्याच्या किती तरी गोष्टी सांगत. सर गंगाधर कलकत्त्याच्या जेष्ठ कौन्सिलांतही असत. ते २२ वर्षे सारखे म्यु. कमीटीचे अध्यक्ष होते. त्यांची वागणूक अशी गोड व वृत्ति इतकी निगर्वी होती की, ते प्रत्येकास हवेसेच वाटत त्यांचा मित्र

---

१ या अशाच अनेक कान पिचक्यांमुळें राजाचे मन खट्टू झालें व ते कारभारातून उडले. या मुळेंच मुख्यतः त्यांचा लवकर अंत झाला असें अनुमान करण्यास जागा आहे.

परिवारहि मोठा व भारदस्त असे. ते इहलोक सोडून गेले, तेव्हां सर्व आबालवृद्ध गहिंवरले व सर्व कोर्टकचेऱ्या शाळा इ. ना सुटी होती. त्यांनीं मृत्यु पत्रान्वये ४० ह. रु. नागपूर युनिव्हर्सिटीला, तेवढेच चांद्रसेनीय कायस्थ प्रभु फंडाला व इतर मिळून १३०००० रु. वाटले. मध्यंतरी भाऊभावांत वाटणी झाली. तरी मृत्युसमयी १२१ गावें होतीं. सर शंकरराव हे सरकारी नौकरींत शिरले व कमिश्नरच्या पदापर्यंत चढून पुढें निवृत्त झाल्यावर प्रान्ताचे कृषिमन्त्री झाले कै. सर गंगाधररावांचेचिरंजीव (हल्ली वय सुमारे ६४) माधवराव उर्फ बाळासाहेब हे पदवीधर असून, त्यानी सरकारी कामकाजाचा अनुभव घेतला आहे. त्यांनीं शारीरविज्ञाना करितां १ लक्ष रुपयांची उदार देणगी विश्वविद्यालयाला दिली आहे. यांचा स्वभावहि वडीलाप्रमाणें निगर्वी आहे व ते इस्टेटीच्या कामांत फार दक्ष असून त्यांतच मनोभावानें व्यग्र असतात. तरी यानीही आपल्या परीनें हिंदु-महासभा वगैरे सार्वजनिक संस्थांत भाग घेतला आहे. कोणत्याहि स्थानिक संस्थाना किंवा नैमित्तिक कार्यांना ते योग्य ती मदत करीत असतात. त्यांचे बंधु कृष्णराव हेहि इस्टेट संभाळून असून त्याना मर्दानी खेळाचा विशेष नाद आहे. त्यांच्या मातोश्री लेडी पार्वतीबाई यांनीं कित्येक स्थानिक संस्थांस व इतरत्र उदार देणग्या दिल्या आहेत व चिरंजीवही आपलें समाजातील महत्वाचें स्थान लक्षांत घेऊन सार्वजनिक कार्यास प्रोत्साहन देतात. तरी आपल्या नावाला साजेसें एखादें टिकाऊ कार्य हातीं घेतील, तर बरें होईल.

या नंतर घोळकर, दुर्वे, वेरडीकर प्रधान, ताम्हणे, दिघे यांचे विषयीहि सांगण्यासारखें आहे. ताम्हणे सोडून इतरांपैकीं कोणी मुत्सद्दी, तर कोणी तलवार बहाद्दर, कोणी कटकांत, तर कोणी नर्मदेच्या तीरावरील पेंढाऱ्यांच्या आक्रमणांत आपली क्रियाशक्ति उपयोगांत आणतांना दृष्टीस पडतो. दुर्वे कुटुंबातील लक्ष्मण काशी व व्यंकटेश काशी हे मात्र मुधोजीच्या प्रेरणेनें पेशव्याच्या खुनांच्या कारस्थानांत सामील होते त्यांना त्याबद्दल प्रायश्चितहि भोगावे लागले पण जीवानें मात्र वाचले. महीपत दिनकर गुप्ते हा सर्वांत शिरोधार्य होय. तो मुधोजीचा सल्लागार व सेनापति या दोन्ही नात्यानीं अग्रेसर दिसतो. यानेच पेशव्यांच्या कैदेत असलेल्या देवाजीपंत चोरघड्याच्या युक्तीच्या सल्यावरून पेशव्यांचा चंद्रपूरचा वेढा उठविला. प्रसंगी हा

चोरघड्यावरहि वरचढ झालेला दिसतो. त्यानें स्वप्नांतहि कधी मालकाला दुखविले नाही किंवा आपल्या निष्ठेंत अंतर पडू दिलें नाही. याची 'महीपत-गार्डनें' म्हणून एक बाग प्रसिद्ध [1] असे. गुते बखरीचा कर्ता काशीराव राजेश्वर गुते हा महिपत दिनकरचा नातु होय. [2] प्रभू मंडळींचे मोठमोठे वाडे असत. यांचेपैकी नंतरच्या काळांत एक दोन पोलीस अमलदारहि दिसतात. तात्पर्य मागे म्हटल्याप्रमाणे उपरोक्त दोन अपवाद सोडल्यास इतरांचें चारित्र्य व कार्य दोन्ही उज्वल आहेत, बुद्धीमत्तेंत तर हे लोक केव्हाही कमी नव्हते. सर्वांचे आचार विचारहि पूर्वकाळीं उच्च वर्गीय ब्राम्हणासारखेच दिसून येतात. भारत महिला विद्यालयाजवळचा दिघ्यांचा वाडा लेखकाच्या दृष्टी समोर अनेक वर्षें होता, त्या कुटुंबापैकीं एकजण लेखक व कवी असे. त्यानें गोंड राजाची बखरहि लिहिली आहे. [3]

इतर जातींतूनहि भोसले राजवटीत कांहीं लढवय्ये व शूर दिसतात. सुरतसिंग हजारी व त्याचे सात बंधू हे पराक्रमी होत. ते मूळ संगमनेरचे राहणार असून सेनापति दाभाडे यांचेकडे नौकरीस असत. त्याना जानोजीने राक्षस भुवनच्या लढाईचे वेळीं त्यांची जवामर्दी पाहून इकडे आणले व देवगड प्रांताच्या २२ महालांची जहागीर दिली. कै. डॉ. मुंजे यांच्या हल्लीच्या वाडयाची मालकीण गंगाबाई हजारे ही होती. बंगडगंजात एक हजारींची विहीरही सापडते. या अभिमानास्पद हजारी कुटुंबाचे अधिक संशोधन व्हावयास हवें.

इतर महत्वाचीं कुटुंबें

ज्याच्याबद्दल एल्फिन्स्टननें प्रशंसोद्गार काढले असा गाविल-गडच्या इंग्रजांच्या वेढ्यांत आपले प्राण पणास लावणारा बेनीसिंग जमादार याच्या कुटुंबाचाही शोध व्हावयास हवा. त्याच्या कुटुंबातील

१ पहा १८६६ चा नागपूर शहराचा नकाशा.

२ यांचे वंशजाची भेट झाली. कागदपत्र मिळाले नाहींत तरी तोंडी माहिती थोडी मिळाली.

३ आम्हास नागपुरांतील प्रभु घराण्याविषयी बरीच माहिती कै. गो. र. वैद्य (श्री केशवराव, रिटा. डी. एस्. पी. यांचे वडील) यानी ते वयातीत असताहि अनेक बैठकींत मोठ्या कळकळीनें सांगितली. हार्दिक धन्यवाद.

स्त्रियांनी जोहार केल्याचें नमूद आहे. दुसरा एक बेनीसिंग दिसतो. हा गृहस्थ ब्राम्हण असून मृत्युंजय प्रसाद या नावाचे जे ताकूचे (हुशंगाबाद जि.) परवापर्यंत जमीदार म्हणून संबोधिले जात, त्यांचा पूर्वज होय. याचा तोफखाना सकरदऱ्यावर[1] असे व त्याचे शेत, वाड्याचे अवशेष वगैरे पाहण्यांत आले. शिवाय कटकातील लढवय्ये म्हणून गोसाव्यांचा उल्लेख सांपडतो. पुण्या साताऱ्याप्रमाणे येथेही गोसावीपुरा प्रसिद्ध असे. या संबंधीच्या शोधात यांचे वाडेंही ४-५ वर्षांपूर्वी पाहण्यांत आले. पण हल्ली काळ झपाट्यानें बदलत आहे. लढवय्याप्रमाणे ते सावकारहि तसेच असत. आद्य रघूजी शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर साताऱ्यास गेले असतां किती तरी विचार विनिमय बन्सीपुरी गोसाव्याशी झालेला आहे. एकतर, दशनामी म्हणून त्यांचे पायावरहि भोसले डोके ठेवीत व दुसरें, द्रव्याचीहि किल्ली त्यांचे जवळ असे. यांचे पैकीं हंसगीर जो येथे असे, त्यानें हंसापुरी ही नागपूरची पेठ नव्याने स्थापन केली. तेथें एक त्यांचे वेळचे शिवाचें देऊळहि आहे. उदेपुरी गोसावी हा वॉरन हेस्टिंगस् गव्हर्नर असतां भोसल्यांचा कलकत्त्यास वकील म्हणून गेला होता परंतु तो जरा स्वाभिमानी व प्रामाणिक असल्यामुळें तो इंग्रजांना चालला नाहीं. उलट पं. बेनीराम व त्याचे भाऊ-बंध जे सुरत काशी पासून तों कटक पर्यंत पेरले गेले होते, ते हेस्टिंग्सुला अधिक परवडले, कारण त्यांनीं वॉरन हेस्टिंगसच्या सर्व घृणास्पद कारवायांत आपले हात बरबटले. खड्गभारती गोसाव्याचा उल्लेख मागे आलाच आहे.

भाग पांचवा

धार्मिक व साहित्यिक

एथ पावेतों ज्यांच्या आश्रयानें नागपुरांतील अथवा भोवतालचे जीवन संपन्न होणें संभवते, अशांची तोंड ओळख करून देण्यांत आली. आतां प्रत्यक्ष परमेश्वरी शक्तीचा अनुभव घेणारे, विविध भौतिक विद्यांचे उपासक,

१ सकरदऱ्यावर तोफखाना असल्याचा पुरावा १७९९ पासूनचा तर आहेच. कदाचित त्यापूर्वीहि तेथे कारखाना असेल. स्थानिक वृद्धांकडून ही गोष्ट समार्थित झाली आहे.

उद्योग धंद्याचे, व्यापाराचे किंवा कलांचे प्रवर्तक अशा ज्या व्यक्ती किंवा संस्था होऊन गेल्या व ज्यांची परंपरा आजहि कमी अधिक प्रमाणांत चालू आहे अशांच्या वर्णनाकडे वळूं. त्यामुळें आजच्या बदललेल्या परिस्थितीचे आकलन करण्यास आपणास मदत होईल असें वाटते.

वैदिक

या प्रान्तांत ज्याना वेद मान्य आहेत, अशांचीच संख्या अधिक असल्यामुळें ज्यानी पूर्व परंपरेस अनुसरून वेदपाठांचें संरक्षण केलें अशांचें वर्णन आधीं करूं. दैनंदिन व्यवहाराच्या दृष्टीनें जरी वेदपाठी ब्राम्हणांचा आज उपयोग नसला तरी गतानुगतिकत्व म्हणा, वेदाविषयीची समाजाची पूज्य भावना म्हणून म्हणा अगर कांहीं औपचारिक व्रतवैकल्यें, देवधर्म, व कुळाचार व संस्कार यावर विश्वास म्हणून म्हणा एकेकाळी समाजाला पुरोहित वर्गाविषयीं मोठा आदर असे व आजहि थोडा फार आहे.

इतर ठिकाणच्या प्रमाणे नागपुरांतही पूर्वी वैदिक व भिक्षुक असे दोनच वर्ग असत. वैदिक हे चांगले पट्टीचे दशग्रन्थी ब्राम्हण असावयाचे. सामान्य संकल्पादि सांगणारी ब्राम्हण मंडळी भिक्षुकांत मोडत असे. राज्य गेल्यावर ३०–४० वर्षांनीं जेव्हा वे. शा. दातार शास्त्री आले तेव्हां पासून सामान्य धार्मिक प्रयोग मुखोद्गत करणारी मंडळी अधिक प्रमाणांत निघूं लागली व त्या मानानें दशग्रंथी ब्राम्हणांची संख्या कमी कमी होत गेली. चौथा एक वर्ग श्रोत्रि यांचा असे. नागपुरांत एकेकाळीं चाऱ्ही शाखा मिळून पांच पन्नास गृहस्थ तरी अग्निहोत्री होते. या शिवाय राज्यभ्रष्टतेमुळें निराश्रित झालेल्या अल्पशिक्षित ब्राम्हणांचा जो वर्ग होता, त्यांच्यावर आगंतुकीची पाळी आली. तसें म्हटलें तर तोंडाने वेदसंहिता बिनचूक म्हणावयाचे परंतु सही करावयास सांगितले तर २-३ मिनिटें तरी घेतील अशी वैदिकांतहि बरीच मंडळी होती. वेदविद्येला मान नाहीं व इकडे इतर लौकिक विद्याहि नाहीं. राजाश्रय किंवा श्रीमंताच्या येथील विधिविधान व जेवणाच्या पंक्तीहि गेल्या. तेव्हां यांच्यावर केवळ आंगतुकीची पाळी आली असल्यास नवल नाहीं. अशांचा पाताळेश्वरांवर अड्डा असे. कोणासही वेळेवर ब्राम्हण लागले तर अशांना एखादा प्रमुख ब्राम्हण केवळ भोजनार्थी म्हणून घेऊन जात असे. अशा आगंतुकांत गोसावी, भाट यांचाही भरणा असे. त्यापैकीं

कांहींना पेन्शने असत पण ती फारच अल्प. हा वर्ग केवळ कोरड्या भिक्षेचा धनी. विवाहादि प्रसंगी या सर्व आगंतुकांची धाड आली म्हणजे मोठी तारंबळ उडे.

इतर ठिकाणच्या प्रमाणें येथेंहि ब्राम्हणांची वस्ती एका विशिष्ठ भागांत असे व तो म्हणजे महाल व आदितवार दरवाजा यांचे दरम्यान व त्यांतही पुनः ऋग्वेदी अधिक, कारण पूर्वकाळीं अधिकारी वर्गांत ऋग्वेद्यांचाच भरणा आधिक असे. नगर नाईक काळे यांनी इतवारी पेठ वसविल्यापासून तिकडे माध्यंदिन अधिक दिसावयास लागले, परंतु त्यांची वस्ती मात्र लेण्याच्या साथी पलीकडे असे. कण्वशाखीय बालाजीचे देवळाकडे आधिक व इतर गावीहि यांची संख्या बेताचीच असे. नार्मदी; माळवी व भगोरी हे भोसले काळापूर्वी इकडे आलेले असून त्यांच्यात जोशीपणाची वतने आधिक व त्यांची वस्तीहि नागपूर पेक्षां इतर लहान लहान गावी अधिक असे. जुन्या याद्यांत नार्मदी ब्राम्हणांच्या नावाचे मागेहि इतराप्रमाणे भट हे उपपद लावलेलें दिसून येतें. एवढेच नव्हे तर त्यांना इतराप्रमाणेच मानहि असे. पुढे शेतीवाडी व वतनामुळे त्यांचे लक्ष विद्येकडे कमी गेले म्हणून म्हणा किंवा कांहीं अंशी त्यांची ब्राम्हणी आचार पद्धतीहि कदाचित् हीन झाली म्हणून म्हणा, चतुःशाखीय ब्राम्हण त्यांचेशीं रोटी बेटी व्यवहार करीत नसत. पुढे विदर्भ व तेलंगण येथून आलेल्या ब्राम्हणांचे महत्व अधिक वाढले. रामटेक, पौनी, भंडारा, मुलताई, नाचनगाव, तळेगाव दशासर, आर्वी, आमनेर इत्यादि ठिकाणच्या ब्राम्हणांची वस्ती बरीच पुरातन दिसते नागपुरांतील ग्रामजोशांना गोंडराजांच्या वेळेपासूनच्या सनदा आहेत.

एकेकाळीं नागपुरांत चतुःशाखीय दशग्रंथी ब्राम्हण संख्येने शंभर तरी आढळत. आज दहाहि निघणे कठिण झालें आहे. माहिती करितां कांहीं जुनीं नावें देतो. सिताराम चांदे, दादाजी निचकवडे, देव, जुमडे, [१] शिगेळे

---

१ यांचे नांव जुमले असावे. पूर्वीं ९ शिपायांच्या तुकडींवर एक नाईक, अशा ५ तुकड्यांवर एक हवालदार व अशा २-३ हवालदारावर एक जुमलेदार असे. रिसालदारांच्याच घराजवळ जुमल्यांचे घर असल्यामुळेहि आमचा तर्क खरा ठरूं पाहतो, जुमलेदार या पदाचें 'दार' जाऊन नुसते 'जुमले' राहिले असावे. जुमला म्हणजे एकुण

गोसावी, अयाचित, वडाभात, दाऊ, लखोबा व पांडुरंग पुरोहित, बेदरकर, श्रौति, अपशंकर, भिडे, मराठे, आवळे, पुंडलीक, त्रिफळे, बोबडे, रोडे, आंबेकर, नंदनगिरी, कोवले, पानपत्ते, दामले, देशकर, दहासहस्र, उपाध्ये, पाठक, पत्राळे, सिताराम गुर्जर, अग्निहोत्री, इ० मंडळी प्रमुख होत. यांपैकीं बरीच नांवे तृतीय रघूजीच्या एका वहीखात्यांत सांपडतात व कांहीं पेन्शन पत्रकांतही दिसतात. त्याच प्रमाणें कांहींची नावे जुन्या हस्तलिखित पोथ्यावरही आढळतात. असल्याच पोथ्यावरून इतर गांवांच्या ब्राम्हणांचीही आणखी नावें सांपडतात. वैदिक ग्रंथांची संथा फुकट व घरोघर देण्यांत येई. पुढे रुक्मिणी मंदिरांत शाळा निघाली, पण ती टिकली नाहीं. हल्लीची वेदशाळा हा दुसरा संघटित प्रयत्न होय वेदपठणाचे पद. क्रम, जटा व घन असे चार प्रकार आहेत. आज घनपाठी. ब्राम्हण एकहि शिल्लक नाही म्हटले तरी चालेल.

श्रौतांत अलीकडच्या काळांत वे. शा. केशवशास्त्री घोंगे प्रसिद्ध असत. श्रौति हे आपासाहेबाचे वेळीं नागो त्र्यंबकनी जो यज्ञ केला त्यावेळीं पौनीवरून आले असावे, कारण हे मूळचे पौनीचे होत. बापूजी देव म्हणून तीन पिढ्यापूर्वी एक सच्छील अग्निहोत्री असे. आदितवार दरवाजावरील देवांचें कुटुंब यांचेंच होय या शिवाय आंगोळे, वैद्य, गणोबा महाराज, भटजी शास्त्री घाटे, नंतरचे बाळाशास्त्री घाटे, मल्हारभट टामणे, लांबे, दीक्षित, जामदार ही मंडळी अग्निहोत्री असत. हल्ली डी. ए. जी. पी. टी. च्या ऑफीसमध्यें असलेले श्री. बाबाजी दीक्षित व दुसरे ह. भ. प. बाबूराव हरदास हे अग्निहोत्र बाळगून आहेत. व दीक्षित तर इतके प्राचीन आचाराचे अभिमानी आहेत कीं, कानांत सुवर्ण कुंडले, पायांत चंद्रपुरी जोडा, डोक्यावर नागपुरी पागोटें व अंगांत अंगरखा अशा पोषाखांत ते वर्षानुवर्षे नौकरीवर जात असतात. जणु बदलत्या काळाकडे त्यानी पूर्णपणे पाठ फिरविली आहे. हल्लीं नागपुरी पागोट्याची कल्पना दोघांच्याच डोक्यावरलि पागोट्यावरून केली पाहिजे. कारण ५ लाख वस्तीत एक हे व दुसरे वे. शा. घाटेशास्त्री.

वरील शिवाय मन्त्रशास्त्र यांचा एक निराळा वर्ग असे. शंकरभट भदे. यानीं आपासाहेबांच्या म्हणण्यावरून द्वितीय रघुजीवर शांभरी प्रयोग केल्याचें

नमूद आहे. चिमणा बापूला मूठ मारण्याचा मागे उल्लेख आला आहे, पण तो प्रयोग करणारा खरा असल्यास बहुधा ब्राम्हण नसावा, कारण हें मूठ मारण्याचें काम इतर मान्त्रिकांचें असे. तानगा दीक्षित यांनी चिटणवीसांच्या वाड्यांतला ब्रम्हराक्षस घालविला असें त्यांच्या कुटुंब वृत्तांतांत वाचावयास मिळालें व कै. गोपाळराव [1] वैद्य या वृद्ध गृहस्थानीही आम्ही त्याना विचारले असतां त्याला पुष्टि दिली होती. बेदरकरांचे मूळ पुरुष महादेव भट हेहि मंत्रशास्त्रज्ञ होते. हें शास्त्र कितपत खरें असेल, हें वाचकांनी ठरवावें. आम्ही समाजांतील ग्रहांचे रूढ प्रवाह, येथें नमूद करीत आहोत.

ही वैदिक मंडळी जेवणांत फार पटाईत असत. त्यांचे असें म्हणणे असे कीं, आम्ही एकदां रगडून संथा केली कीं, आमचे अन्न पचून जाई. कांहीं, घरगुती व्यायाम करीत. क्वचित् भांग पीत. नानासाहेब अहेरराव तर आग्रहाच्या लाडवा गणिक दक्षिणा वाढवीत असे म्हणतात अतिशयोक्ति असेल, पण सत्यांश आहे. या खाण्याच्या गोष्टी सांगत बसलो तर विस्तार होईल. खाणारे व खाऊ घालणारे दोघेहि गेले.

संत

महाराष्ट्राची संत परंपरा व तिचें कार्य या गोष्टी वाचकांस सुपरिचित आहेत. आद्य मराठी कवि मुकुंदराज महाराज हे भंडारा जिल्ह्यांतील आंभोरे गावीं झाल्याचें कांहीं विद्वान् प्रतिपादीत असतात. आम्हाला त्या वादांत येथें शिरावयाचें नाहीं. इंदोऱ्यावरील गणोबा माहाराज व जागेश्वर मंदिराजवळील ठमकेबुवा हे मुकुंदराजांच्या परंपरेतील होत. आमच्या विभागातील संतांनीं पारमार्थिक वाङ्मय फारसें निर्माण केलें नाहीं. मुकुंदराजबुवा साधु व मुजुमदारबुवा यानी थोडी ग्रंथरचना केली आहे पण ती फारशी मौलिक नाहीं इतर संत केवळ आत्महित साधणारे, भक्तिभावाने ओथंबलेले व वैराग्यसंपन्न दिसतात.

---

१ गोपाळ रघुनाथ वैद्य यांचेच घराण्यांतून माधव गंगाधर दत्तक आले होते. नागपूरच्या जीवनातल्या यांनीं अनेक गोष्टी सांगितल्या. त्यांना इतिहासांची फार हौस होती. मृत्यु २९-८-१९४७.

बंगाजी भुरे

आद्य रघूजीचे वेळीं सुंदर बहिराजी हे जामदारखान्याचे मुख्य असत व बाबूजी भुरे या नावाचे गृहस्थ त्यांचे मुतालिक असत. पुढें नारो शंकर बखले हे जामदार झाले व कुटुंबाला बखले ऐवजी जामदार हेंच नाव चिकटलें. नारो शंकर पुढे आल्यावर भुऱ्यांचें महत्व कमी झालेलें दिसतें. भुऱ्यांचा हल्लीचा मठ व त्याच्या जवळच लागून जामदारांचा परिसर हे पाहून यांचा अन्योन्य संबंध असला पाहिजे या गोष्टीस बळकटी येते. यांचे पैकीं कोणी तरी आदाशास जाऊन राहिला व त्याच्यात एक बंगाजी नावाचा सिद्ध पुरुष झाला. सरकारी कागदांतही 'बंगाजी बुरा' म्हणून उल्लेख येतो. यांचे कांहीं चमत्कार मठाचे हल्लीचे वहिवाटदार सांगतात. असें म्हणतात कीं यानी आदासा येथील गणपतीच्या देवळांत १२ वर्षे पुरश्चरण केल्यावर त्याना मोरगावच्या गणेश योगीन्द्रांचा अनुग्रह घेण्याचा दृष्टांत झाला.[१] बंगाजीना तृतीय रघूजींचे वेळीं १९४ रु. वर्षासन मिळत असे. यांचें देहावसान इ. स. १८२९ साली झालें. गणेश योगीन्द्रांचा निर्याण काळ व यांचा निर्याण काळ ताडून पाहतां बंगाजीही पुष्कळ जगले असण्याचा संभव आहे. नाहीं तर योगीन्द्राच्या शिष्यत्वाची गोष्ट खोटी मानावी लागेल. बंगाजी नंतर तें वर्षासन पुत्र धुंडिराज यांस मिळालें. हा गृहस्थ इ. स. १८४६ मध्यें वारला व त्याचें पेन्शन मुद्गल शास्त्र्यांस मिळालें परंतु त्यानी १८६६ मध्यें एकमुस्त रक्कम उचलली व पेन्शन बंद झालें. यांचा मुलगा ब्रम्हण-स्पति गणेशदर्शनास गेला असतां पाय घसरून शुक्रवार तळ्यांत बुडाला. एकूण या तळ्याची कीर्ति जुनीच दिसते. मुद्गल महाराज १९०४ सालीं वारले. त्यांच्याच मांडीवर हल्लीचे मठ चालक श्री. धुंडीराजपंत कावळे[२] यांची मुंज झाली. बंगाजीची एक आरती वगैरे सारखे किरकोळ काव्य, या पलीकडे आम्हास पहावयास मिळालें नाहीं. त्यांचा सिद्धियोग मात्र बहुविध

१ यावरून व वरील गणोबा महाराज इ. च्या गोष्टी वरून गुरुपरंपरे-वरून येथील जनतेचा महाराष्ट्रांतील संस्कृतीचा कसा दुवा कायम होता हे सिद्ध होते. याचे अनेक पुरावे आहेत. गणेश योगीन्द्र २२८ वर्षे जगले असे म्हणतात. निर्याण शके १७०७.

२ मृत्यु १७-६-५३.

दिसतो. यांचीं अनेक उदाहरणें लेखकाच्या बाडांत नमूद आहेत, पण त्यांचा आजच्या जनतेस फारसा उपयोग नाहीं.

मृत्युंजय कोकिळ

खरें म्हटलें तर हे एक व्युत्पन्न साहित्यिक व नैय्यायिक होत. कारण शिवराम शास्त्री केळवदकर व सिताराम शास्त्री वखरे हे (द्वितीय रघूजींचा काळ) त्यांचे शिष्य होत. परंतु तपश्चर्येनें त्यांचें आंतील चैतन्य इतकें विकासित झालें होतें कीं, त्यांना समाधि लागत असे व त्यांचा आशीर्वादही फलास येत असे असें म्हणतात. वरील दोन्ही शिष्यांना असाच आशीर्वाद मिळाला होता व त्यांच्या पोटी पुढें प्रसिद्धीस पावलेल्या अनुक्रमे सिताराम शास्त्री व गजानन शास्त्री ह्या दोन व्यक्ती जन्मास आल्या. एक गंगाधर शास्त्री कोकीळ औरंगाबादेकडे असल्याचे व त्यांनी १५० पदें केल्याचें भा. इ. मं. च्या शके १८३४ च्या त्रैमासिकांत दिलें आहे. मृत्युंजय कोकीळांचें मूळ घर हल्ली पाताळेश्वर रोडवर जी गुजराथ्यांची चाळ आहे, तेथें होतें. पुढील खाणाखुणा मोहित्यांच्या वाड्याजवळ दिसतात. यांच्याच मुलीच्या वंशांतून लेखकाची एक मामी आली होती. पण ही सर्व माहिती तिच्या मृत्यूनंतरच काढण्यांत आली. यांत नागपूरच्या नीरजोल्लास नांवाच्या अल्पजीवी मासिकाचा (१८९८) उपयोग झाला.

अयाचित

जुन्या काळी सर्वांत पुढारलेलें देऊळ म्हणजे अयाचिताचें देऊळ होय. नागपुरांत ३ गोष्टी अखंड चालत. एक म्हणच पडली होती. अयाचिताची नाली, वाजंत्र्याची नळी व नागनदीची होळी. त्यांत आणखी एका पवित्र कार्यक्रमाची भर पडत असे व तो म्हणजे अयाचित देवळांतले दैनंदिन पुराण, कीर्तन, भजन व आरती. क्रमाने एकेक कमी होत गेलें. देवळांतला नगारा वाजला कीं आरती चालू झाली असे आम्ही लहानपणीं समजावे. कोण घोष होत असे ! देवळांच्या परिसराने सुमारे २ एकर जागा व्यापिली आहे. कारण एक वाडीची वाडीच मूळ पुरुषाला मिळाली. समोरील भव्य दरवाजा, कोपऱ्यांतील रथ, ३५-४० फूट उंचीचा मिश्र धातूच्या बनविलेल्या वर्तुळकार पायऱ्यांचा कांहीसा झुकलेला गरुडखांब व भोवतालचा एकूण सुमारे १०००० फूट

लांबीचा पक्का आवार हीं तेथील जुन्या वैभवाचीं पदचिन्हे होत. दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशीं रथयात्रेस आजहि लोक जमतात. यांत श्रीव्यंकटेशाच्या उत्सव मूर्ति रथांत घालून भोवतालच्या नाल्यानाल्यानें मिरवितात व ह्या प्रदक्षिणेला ४-५ तास लागतात. मोठमोठे दोर हाताने धरून पुरुष वर्ग 'गोविंदा' गोविंदा म्हणत व रथ कोलमडून पडूं नये म्हणून थोडथोड्या अंतरावर लांकडी ओंडक्यानीं चाके अडवीत रथ वाहून नेतात. पूर्वीं या दिवशीं सर्व शहर लोटत असे. शाळांना सुट्टी असे व देवळा शेजारी खुल्या जागेवर बाजार, दुकानें व आकाशपाळणे इ. क्रीडेची साधनेंहि गोळा होत. शेवटी, भोसले कुळातील राजपुरुष श्रृंगारलेल्या हत्तीवर अंबारींत बसून येत. त्याच प्रमाणे त्यापूर्वीं ९ दिवस रात्रौ वहन, भजन व रोषनाईचा थाट पहावयासहि लोक येत. आतां या गोष्टीपैकीं बहुतेक बंद पडल्या आहेत. कांहीं कांहीं कार्यक्रम होतात पण ते अगदी निर्जीव व निस्तेज भासतात. देवाचा व कुटुंबातील मंडळीचा योगक्षेम चालावा म्हणून आतां भोवताली चाळी उभारल्या आहेत व विवाह मंडळहि स्थापन झालें आहे. परिसरांत मूळ अयाचितानी जी श्रीबालाजीची वालुका मूर्ति स्थापन करून लहानगेसें देऊळ बांधले. त्यांस मागावून पुष्कळ देवळांची भर पडली. येथें करू, बालिंगे, नवघरे इत्यादीनी पुण्यकर्म तर व्हावें पण आपल्याकडे त्यांची पुढची व्यवस्था राहूं नये, म्हणून छोटी मोठी देवळें बांधून दिलेली आहेत. हल्ली कांही देवांच्या मूर्तीवर गंधफूल वाहणें मुष्किलीचे होते, तर इतर उपचारांची काय कथा !

येथील सर्वांत विलक्षण गोष्ट म्हणजे फावडे भात-(रूढशब्द-पावडे भात) कारण तो इतका होत असे कीं, त्याचा ढीग उकरावयाचा म्हणजे फावड्याचाच उपयोग करावा लागत असे. त्या दिवशीं सोवळे ओवळे जेमतेमच असावयाचे येईल त्याला प्रसाद मिळत असे. पीठस्थ कै. लक्ष्मण-बुवा यांनीं १९४४ मध्यें आम्हास ११॥ खंड्यांचा भात व त्याच मानाने पोळयांचे रोट, वरण व भाजी एकेकाळीं शिजत असल्याचे सांगितलें. त्यांच्यात व आमच्या राहत्या घरांत भिंतच आड असल्यामुळें आम्ही वर्षानुवर्ष प्रसादसेवन केले आहे. त्यांत स्वाद नसे. भावना म्हणून तो घ्यावयाचा, एवढेच. शिष्ट मंडळी या प्रसादापासून चार पावले दूरच

राहात. तें कांहीं दक्षिणामूर्ति देवस्थानांतील चमचमीत जेवण नव्हे. असा क्रम १०० वर्षे तरी चालला असावा. धान्याला किंवा स्वयंसेवकांना कधीच तोटा पडला नाहीं किंवा कधीं आम्ही ठराव, सभा, भांडणे वगैरे पाहिलें नाहींत. ठरीव मंडळी पिढ्यानुपिढया कोणत्याहि कार्यक्रमांत सेवेला यावयाची.

वाचक म्हणतील, बाहेरच्या पसाऱ्याचेंच वर्णन झालें. या मंदिराचा आत्मा कोठे आहे ? यांत सत्पुरुष कोण ? तेंच आतां पाहूं. याचे संस्थापक सदाशिव भट्ट होत. ते चंद्रपुरावरून आले. अयाचित वृत्तीनें कालक्रमणा करीत म्हणूनच त्यांना महत्व वाटलें. १८१७ त हें देऊळ होतें हें नक्की कारण, गुजाबा दादा देवदर्शन घेऊनच आपासाहेबामुळें नागपूर सोडण्याच्या तयारीने इतवारी मार्गानें रेसिडेन्टकडे गेला. सदाशिव भट्टांनी स्वतः १७९१ इ. त लिहिलेली एक पोथी आहे. त्यावेळी ३० वर्षांचे त्यांचे वय धरले, तर त्यांचा जन्म १७६०-६१ चा म्हणजे पानपतचें युद्धच येते. नंतर त्यांचे नातू दादाजी महाराज हे पुढें आले. पणतू विठोबा महाराज (ज्याच्याशी लेखक मोकळेपणानें वागला आहे) आज असते तर त्यांचे वय १०८ वर्षांचे भरले असते. या सर्व गोष्टींचा अर्थ असा कीं, हे कुटुंब पहिल्या जानोजीचे वेळी आलें असावें व शहराबाहेर[१] एकांतात तपश्चर्येच्या बुद्धीने येऊन बसले असावे. त्यांनीं जिवंत समाधि घेतल्याचें सांगतात. लहान अयाचिताच्या शाखेचा प्रारंभ सदाशिवभट्टापासूनच होतो. मोठ्या अयाचितांचे कुटुंबात आजपर्यंत फारसे इंग्रजी वगैरे कोणी शिकले नाहीं. कोणी शास्त्री पंडितहि निपजले नाहींत पीठस्थ देवाची सेवा करावयाचे व इतर कुटुंबीय याज्ञिकी करून उपजीविका करावयाचे, असा क्रम राहिला. पण, देवळाची कीर्ति फार. कोणी बाहेरगांवचा हरिदास आला कीं, त्याची पहिली हाजरी येथे व्हावयाची. येथे परीक्षेत उतरला तर समजावे कीं, त्याची फेरी यशस्वी झालीच. कै. कृष्णाबुवा हरिदास यांची धोंड्याची (अधिक मास) कीर्तने येथेंच होत. एकदां १२०० रु. बिदागींत बुवांना मिळाले. संबंध रकमेवर त्यांनीं

१ शहर म्हणजे परकोटाचे आतील भाग नाल्याच्या पलीकडेच ही परकोटाची भिंत होती.

तुळशीपत्र ठेविले व ते सर्व पैसे समोरील उंच दगडी दरवाजांच्या उपयोगास आले. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे नागपूरच्या धार्मिक जीवनांत या देवळानें अनेक पिढ्या सर्वांत अधिक भर घातली आहे. सदाशिव भटांचे पुण्य !

तेलीबुवा

जवळच तेलीबुवा म्हणून एक विदेही साधू असत. नावावरून वाटते कीं, तेली असावे. ते ऋग्वेदी ब्राम्हण असून आडनांव दाऊ असे. आपला खप चांगला व्हावा म्हणून भाविक तेलणी त्याचे डोक्यावर तेल ओतीत आणि म्हणून याला तेलीबुवा म्हणत यांचे चरित्र करताळकर बुवांच्या अप्रकाशित ओवीबद्ध ग्रंथांत आलें आहे. हे द्वितीय रघूजीच्या काळांत झाले. यांची व यांच्या एक मुसलमान शिष्याची समाधि मठांत आहे, मठांला उत्पन्न नाही.

अवधूत बुवा

यांचा मठ संतीरोडवर चौकात आहे. मूळ पुरुष आत्माराम बुवा हे जोगी मठाचे शिष्य असत म्हणून कुटुंबीयानी सांगितले. ते पूर्वी मोंगलाईत रिसालदार असत. त्यांची व उद्धव[1] चिद्घन यांची वाटेत गाठ पडली असतां उद्धव चिद्घनांनीं त्यांचेवर अनुग्रह केला. आजगावकरांच्या मते हे उद्धवचिद्घन १६८० इ. त विद्यमान असावे. आम्हालाहि असें सांगण्यांत आलें कीं, आत्माराम बुवा कोठें तरी जवळपास जंगलांत तपश्चर्या करीत असतां गोंडराजाला आढळले. राजाने श्वापद् म्हणून गोळी डागली पण ती त्याना लागली नाही किंवा लागूनहि जखम झाली नाहीं असें म्हणतात. जुन्या नकाशावरून व आमच्याहि लहानपणच्या अनुभवावरून येथें जंगल असणे अगदी संभवते. कारण हा किल्याच्या बाहेरचा वस्ती नसलेला भाग होय. नाल्या जवळूनच जुनी किल्याची भिंत गेली आहे व

१ हे मोगलाईतील वाडी स्टेशन पासून ५७ मैलावर असलेले घारुर येथे असत. (नागपुरात एक दारोडकर म्हणून हल्लीं फौजदारांचे नातू आहेत. ते जवळच फौजदारांच्या वाड्यांत राहतात. हे यांचे आडनांव घारुरकरच मुळांत असण्याचा संभव आहे.)

नालाहि शेजारी किल्याकरिता माती खंणल्यामुळेच झाला असावा. यांच्या मठांतही नेहमी पुराण प्रवचन होत असते. मठाला राजाश्रय नव्हता. यांच्यात माधवराव अवधूत हे प्रसिद्ध कीर्तनकार होऊन गेले. कोणांत कावित्वादि गुण नव्हते असें दिसते.[1]

डोकेबुवा

अवधूत बुवांच्या मठाजवळच डोकेबुवांचा मठ आहे. एकेकाळीं येथें जेव्हां काशीचे कै. वे. शा. वझे शास्त्री यांचीं प्रवचनें होत, तेव्हां हा मठ पुष्कळांच्या परिचयाचा झाला होता. एरव्ही या मठात कांहीं विशेष नाहीं. ज्यांची साधु म्हणून खरी कीर्ति होती त्या डोकेबुवांचा मठ थोड्या अंतरावर आहे. पहिल्या मठांत काकडआरतीचें वैशिष्टय, तर दुसऱ्यांत दिंडीला महत्व असे. मूळ पुरुष लक्ष्मणबुवा येथें चंद्रपुरावरून आले. पुतणे यादवबुवा यांनीं प्रथमोक्त मठ स्थापन केला. लक्ष्मणबुवा चंद्रपुरांतील प्रासिद्ध सत्पुरुष गोविंदस्वामी यांचे शिष्य होत-यांची परंपरा अशी आहे.

आदावादि गुरुं हरिंच सततं श्री रामचंद्रं मुनिं ।
योगाधीशमुकुन्दराजविदुषं श्रीमन्नृसिंहं परं ।
सच्चिन्मात्रजगत्पतिंच सहजं श्रीरंगकं केशवं ।
वन्दे शंकर विश्वनाथमनिशं गोविंदपादं भजेत् ”

तसें म्हटलें तर लक्ष्मणबुवा हरिदास होते, पण त्यांच्या साधु वृत्तीवर लुब्ध होऊन १७८७ इ. त द्वितीय रघूजीने त्यांना कुंभारी त. रामटेक हा गांव मोकासा दिला. डोकेबुवावर देवनाथांचे[2] एक पदहि आहे. यांच्या वंशांत हल्ली यादवराव व बाबूराव हे असून, बाबूरावांची सन्तति सुविद्य आहे. लक्ष्मणबुवा व त्यांचे पुतणे यादवबुवा यांचे रामाचा पाळणा आपोआप हलणे, अपघाताने मृत्यु पावलेला जिवंत होणे वगैरे सारखे कांही चमत्कार सांगतात. तरी लक्ष्मणबुवांचा अधिकार मोठा दिसतो व त्यामुळेच भोसले-

---

१ आमचे स्नेही श्री. भय्याजी या अवधूत हे ६ महिन्यापूर्वी वारले. यांनीच माहिती दिली होती.

२ जन्म १७८१; मृ. १८२१

ऱ्यांनी त्यांचा मोकासा चालू ठेवला असावा, नाहींतर, कित्येकदा भोसल्यांनी मोकासे काढून घेतल्याचीहि उदाहरणे दिसतात.

मुकुन्दराज साधु

यांच्या मठाकडे एकेकाळी त्यांचे सुपुत्र दादाजी महाराज यांच्या कीर्तनाचा आस्वाद घेण्याकरितां झुंडीच्या झुंडी लोटत. मुकुंदराज हे मन्थनचे असून सरकारी नौकरीत असत. एदलाबादच्या पृथ्वीपुरी महाराजांचा उपदेश घेतल्यावर मुकुंदराज बुवांच्या मनांत वैराग्य बाणले व त्यांनी नोकरी चाकरी व धनदौलत सोडून स्थलान्तर केले व ते भाम येथें येऊन राहिले. नंतर तेथून वेळयास येऊन पुढे नागपुरास आले. हल्लीची जागा महादजी अमृत मखलाशी[१] यांनीं दिली असून, सभामंडप तृतीय रघूजीने बांधून दिला. याशिवाय रोज राजवाड्यातून ६० मंडळींचा शिधा येत असे. 'मन ठेवियले गुरुपायीं। आतां जन्ममरणभय नाही' हे प्रसिद्ध पद महाराजांचें होय. यांनी विष्णुरस (वेदान्तपर) व गीतगोविंदाची समश्लोकी केली आहे. आम्ही दुसरें पुस्तक पाहिलें. काव्य सामान्य आहे. गुरु निजधामास गेले असे कळले असता, बुवा गुरूंच्या वास्तव्यस्थानी गेले व गुरूंचे दर्शन होईल तरच अन्नग्रहण करीन म्हणून मरणान्तिक उपोषण करीत बसले. शेवटी गुरूनी स्वप्नांत दर्शन दिले व 'तुझ्या कुळांत एक कुलदीपक निर्माण होईल' म्हणून आशीर्वाद दिला म्हणतात. हल्ली कुटुंबांत बाबाजी साधूंचे पुत्र बापुजी हे ७२ वर्षांचे असून त्यांचे अविभक्त कुटुंब नांदत आहे

गजानन तात्या साल्पेकर

हें देवस्थान मोहित्यांच्या वाड्याजवळ आहे. याला 'देवघर' असें म्हणतात. साल्पेकर हे मूळ वाघोलीचे (हिंगणघाट त.) राहणार होत.[२] हल्लीची जागा गजाननतात्यांचे गुरु पूर्णानंदस्वामी (पूर्वाश्रमीचे नृसिंह

---

१ हे नागपुरास ९६ वर्षांच्या वयांत वारले. त्यापूर्वी २० वर्षे सन्यासी होते. समाधि वाकररोडवर असून ती उपेक्षिली जात आहे. यांचा उल्लेख एल्फिन्स्टनच्या १८०४ च्या यादींत आहे.

२ मराठा दप्तरांवरून साल्पे व वाघोली ही दोन्ही नावें साताऱ्याकडची दिसतात.

शास्त्री उर्फ आपाजी मनोहर) यांज कडून मिळाली. हे तृतीय रघूजींचे पुराणिक असून ईश्वरपरायण असत. नित्यगायत्री पुरश्चरण, ज्ञानेश्वरी व गीतापाठ, सूर्य नमस्कार, जागृतेश्वर दर्शन, नंतर भोजन व नंतर अध्यापन, असा त्यांचा नित्यक्रम असे. गजाननतात्यांचे संस्कृत अध्ययन गुरु जवळच झाले. त्यांचीं संस्कृत पत्रें आहेत. ते कानूनगो असत. पुढे वैतागानें नोकरी सोडली व गुरूंच्या सेवेत व ईश्वर भजनी लागले, तों त्यांतच आयुष्य गेले. यांचेकडे ज्ञानेश्वरीची एक उत्कृष्ठ चित्रांकित हस्तलिखित प्रत आहे. ती फारच प्रेक्षणीय आहे. नकलकार स्वतःला 'श्रीमज्जाबशाहसेवक साठ्योपनामक गोपीनाथ सूनुर्नारायणः' असें म्हणतो. लेखनकाळ शके १६८५. हल्ली ह.भ.प. रामभाऊ महाराज गादीवर असून परंपरागत पुराणप्रवचनादि कार्यक्रम यथाविधि चालू असतात. नवीन पिढीने आधुनिक शिक्षण घेतलें आहे.

येथील व इतर गावांतील अनुल्लेखित साधुसंत कमी आदरणीय आहेत, असे नाही. परंतु स्थलाभावास्तव त्यांचा परामर्ष घेता येत नाहीं बुधवारीतील गोपाळबुवा ठमके, बुजुरकार, गणोबा महाराज, यमुनाबाई कोष्टीन, सुदामबुवा, मुळांडे, निकालसबुवा, विश्वंभर आबा, मुजुमदार हे इतर स्थानिक संत होत, तर मोहप्याचे तुकारामबुवा, घापेवाड्याचे कोलबाजी, पौनारचे केजाजीबुवा, (आमच्या पाहण्यांतले) मोहगांवचे केशवदास महाराज इत्यादि बाहेर गावचे संत होत. भंडाऱ्याचे देवबाबा तर आद्य रघूजींच्या वेळी होते. या शिवाय आर्वी, वर्धा, काटोल, चांदा, गिरड, कळमेश्वर, केळवद वणी, खापा इ. ठिकाणीं किती तरी संत होऊन गेले व त्यांनी आपापल्या परी जनतेस सन्मार्गास लावले.[1] हल्ली मात्र ही खाण रिकामी झाल्या सारखी दिसते.

पंडित परंपरा

मध्यप्रदेश संशोधन मंडळाने जी एक निवडक निबंधाची पुस्तिका प्रसिद्ध केली आहे, त्यांत या विषयावर लेखकाचा निबंध आला

---

१ संतांची माहिती गोळा करण्याच्या बाबतीत आमचे मित्र श्री. बाबाजी बोबडे हे कित्येक वर्षीं पासून विशेष प्रयत्न करीत आहेत हें त्यास भूषणावह होय.

असल्या कारणानें येथें विशेष लिहितां येत नाहीं. तरी ज्यांच्या हातीं तें पुस्तक पडणार नाही, त्यांचे करितां थोडी कल्पना देतों.

नागपूरची पंडित परंपरा जरी सामन्यतः वैय्याकरण केसरी **सदाशिव शास्त्री घुले** यांचे पासून म्हणजे १८१६ पासून सुरु झाल्या सारखी दिसते तरी त्याहि पूर्वी नागपूर अगदी कोरडे नव्हते. पूर्वोक्त मृत्युंजय कोकीळ त्यापूर्वीं दिसतात तसेच ज्या **वीर राघवाचार्य** व **कृष्णशास्त्री रामानुज** या दोन पंडितांत सरस कोण, हे ठरविण्याकरितां म्हणून काशीच्या पंडिता कडून सदाशिव भट्टांची योजना झाली होती, ते दोन पंडितही येथें पूर्वी पासूनच होते. हे उघड आहे आपाजी मनोहर व भिकोबा पाठक हीही स्वतंत्रच तयार झालेली मंडळी होती. देवाजी पंतांच्या वेळीं एक मैथिली पंडित येऊन गेला होता व त्यानें पुरंजन काव्य येथेंच लिहिले होते. **सीताराम शास्त्री केळवदकर** व **रामशास्त्री खरे** हेही स्वतंत्रपणेच शिकले होते. तेव्हां पंडितांची परंपरा सदाशिव भट्ट येण्या पूर्वी होती हें सिद्ध होते. एवढेच कीं, त्यांचा अधिकार, त्यांची विद्वत्ता व राजाश्रय यामुळें त्यांस विशेष महत्व चढले. सदाशिव भट्टांचे प्रावीण्य व्याकरणांत, तर सीताराम शास्त्रींचे न्यायशास्त्रांत होते.

रामशास्त्री खरे यांची बाजू विशेषतः साहित्याची होती. **रंगाचार्य** हे सदाशिव भट्टांचे पट्टशिष्य, तर **गजानन शास्त्री वखरे** हे सिताराम शास्त्रींचे शिष्य होत. या नंतर म. म. **भटजी शास्त्रीचे गुरु कृष्ण शास्त्री लंगडे** हे पुढे आले. भटजी शास्त्री पासून कै. प्रभाकर शास्त्री रोडे कै. गोविंद शास्त्री वैद्य कै. बाळा शास्त्री घाटे, कै. म. म. राव स. जै. देहाडराय, कै. म. म. केशव गोपाळ (बापुजी) ताम्हण, कै. प्रा. गोपाळराव गर्दे, कै. प्रा. जठार, कै. लक्ष्मण शास्त्री देव, कै. धुंडीराज जोशी कै. रा. ब. वाडेगावकर, कै. मार्तंडराव वाईकर, प्रभृतीनी व्याकरणाचें अध्ययन केलें. **कै. बापुजी ताम्हणांच्या** झरणींतून, विद्यमान प्रा. सोमलवार, वेदान्ततीर्थ माधवराव दाणी व श्री. ल. रा. कुळकर्णी यांना लाभ झाला. साहित्यांत कै. गोपाळजी हरदास, कै. बाळा शास्त्री घुले, कै. कृष्ण शास्त्री तेलंग ही मंडळी दोन पिढ्यापूर्वी अग्रेसर असून ते रामशास्त्री खरे, श्रीकृष्ण शास्त्री घोंगे अथवा अनंत शास्त्री काशीकर यांच्या परंपरेतील होत. पुण्यांतील थत्ते शास्त्रींच्या परपरेतील कै. म. म. **वासुदेव शास्त्री अभ्यंकर** यांनी जशी संशोधन बुद्धि

दर्शवून ग्रंथोत्पत्तीही केली, किंवा तेच कशाला इतर कितीतरी तिकडील शास्त्री मंडळींनी ग्रंथ संपादन किंवा ग्रंथनिष्पत्ति केली तसें इकडे एकानेंही केलें नाही म्हटलें तरी चालेल. म. म. घाटे शास्त्रींनी उत्तर रामचरितावर एक टीका लिहिली व ती मुद्रित झाली. कै. रा. ब. देहाडराय यांनीं कांहीं विद्यालयीन पाठ्य पुस्तकांवर उद्बोधक टीका लिहिल्या किंवा त्यांची इंग्रजी भाषांतरे केली. पण या शिवाय महत्वाचें कार्य, असें कोणीच केलें नाहीं. तरी याला एक अपवाद आहे व तो म्हणजे **गंगाधर शास्त्री मंग्रूळकर** यांचा त्यांनीं छोटी छोटी अशीं १६-१७ संस्कृत टीपा, टिप्पणी व मूळ पुस्तिका लिहिल्या आहेत व त्या अजूनही अप्रकाशित आहेत. एवढेच नव्हें तर आम्ही त्यांचे दप्तर तपासल्यानंतर याचे ग्रंथ जर नागपूर यूनिव्हर्सिटीत देवविले नसते, तर हा विद्वान् अगदींच अज्ञात राहिला असता. त्यांचे संबंधीं डॉ. करंबेळकरांनी भांडारकर ओरिएन्टल इन्स्टिटियूटच्या षण्मासिकांत[1] एक परिचायक लेखही लिहिला आहे व आम्ही संशोधन मंडळापुढेहि एक निबंध वाचला होता. गंगाधरशास्त्रींची बुद्धि चौफेर असून त्यांनी व्याकरण वेदान्त छंदःशास्त्र व नाट्य या सर्व विषयांवर रसपूर्ण ग्रंथ रचना केली आहे, नागपूरचे नुकतेच दिवंगत झालेले (दि. १३-१-१९५३) म. म. पंडित सम्राट् कृष्णशास्त्री घुले यांनी मराठीतून पुष्कळच संशोधनात्मक व समीक्षणात्मक लिखाण केले आहे. हौत्रध्वान्त दिवाकर, सापिण्ड्यभास्कर, पतितोद्धार मीमांसा हे त्यांचे संस्कृत निबन्ध होत. तसेंच **'हरहरीयम्'** नांवाचे सुंदर काव्यही त्यांनी लिहिलें आहे. ते येथील भवितव्य नांवाच्या संस्कृत साप्ताहिकांत प्रसिद्ध झाले. तरी त्यावरील त्यांचीच टीका अजून अप्रकाशित आहे. यांचा एक स्मारक ग्रंथहि १९४९ साली प्रसिद्ध झाला आहे. नागपूरचे आणखी एक पंडित म्हणजे कै. श्रीनिवास शास्त्री हरदास हे होत. त्यांचे विद्यागुरु त्यांचेच चुलते गोपाळजी हरदास होत. ते गुलाबराव महाराजांच्या शिष्य वर्गापैकी असून, चांगले विद्याव्यासंगी व रसिक असत.

या शिवाय वाठोडकर, मेहकरकर, उपाध्ये, काळे प्रभृति किती तरी प्रवचनकार येथील श्रीमन्त व सरदार यांच्या आश्रयाला असलेले दिसतात. त्याच प्रमाणें कै **गंगाधर शास्त्री देव** हे पट्टीचे धर्मशास्त्र वेत्ते व वैदिक होऊन

---

१ भाग ३३, १९४९ पृ. ३१

गेले. त्यांचे एक चिरंजीव त्र्यंबक शास्त्री हे धर्मशास्त्री व ज्योतिषी होते. हल्लीचे वंशज श्री. गंगाधर शास्त्री हे उत्तम ज्योतिषी आहेत. ते पंचांगही करीत असतात. जे पुढे क्वीन्स कॉलेजांत (काशी) जाऊन प्राध्यापक झाले, ते बापूशास्त्री देव विल्किन्सन रेसिडेंटला (१८३७) शिकवीत होते. त्यांनी पुढें ज्योतिषावर अनेक ग्रंथही लिहिले व पुष्कळच मानसन्मान मिळविला.

नागपूर प्रमाणें पौनी, रामटेक, उमरेड, अलीपूर (हिंगनघाट त.) तळेगांव दशासर, चांदा, मुलताई मंडला इ. ठिकाणीही संस्कृत विद्येचे व्यासंगी दिसतात. त्यांची माहिती स्थानिकांनी टिपून ठेविली पाहिजे.

हरिकथाकार

धर्मप्रसाराचें व सांस्कृतिक विकासाचें एक सोपें व महत्वाचें साधन म्हणून कीर्तनाची संस्था ही महाराष्ट्रीयांनी उपयोगांत आणली व ती अत्यंत परिणतावस्थेस नेली, या बद्दल कोणाचे दुमत होणार नाहीं. ललितवाङ्मय व ललितकला यांजकडे मनुष्याचा नैसर्गिक ओढा असतो. त्याचाच उपयोग करून व त्यांत कांहीं चुटके, अभंग, संतांचीं पदें व पौराणिक गोष्टी घालून तद्वारा आध्यात्मिक व सात्विक उपदेश करणे, हा या संस्थेचा हेतु आहे. कै. गोपाळजी हरदास व कै. दादाजी साधु या प्रणालीतील पहिली मूल्यवान रत्नें होत.

दादाजी साधु

मुकुंदराज साधूंचे वर्णन संतांच्या सदरांत आले आहे. त्यांना तीन पुत्र होते. पहिले बळिराम बुवा हे भगवद् भक्त असून शेवटी त्यांनी संन्यास[१] घेतला. दुसरे आत्माराम बापू व तिसरे दादाजी. दादाजींचा जन्म श्रावण वा। ८ शके १७४१ (इ. स. १८१९) रोजी घोडयाचे वेळयास झाला. त्यांचे लहानपण उनाडकींत गेले, परंतु पुढे त्यांनी नऱ्होबा दीक्षित व रामशास्त्री खरे यांचे जवळ संस्कृत साहित्याचें शिक्षण घेतले. नंतर न्याय शिकत असतां वडीलांनी त्यांचे लक्ष न्यायशास्त्रातील घटपटापासून परमार्थाकडे ओढले. आरंभी ते घरीच कीर्तन भजनादि करीत व त्याच बरोबर राजाकडे शिले-

१ यांची समाधि सकरदरा रोडला लागून असलेल्या एका गुजरांच्या वाडीत आहे.

खान्याची नौकरीही करीत असत. परंतु १८५१ त वडील वारल्यावर सर्व कुटुंबाचा भार त्यांचेवर पडला व लवकरच राज्य गेल्यामुळें व राजाश्रय बंद झाल्यामुळें ते कीर्तनार्थ बाहेरगावीहि जाऊं लागले. ते स्वतः कथा तयार करीत व त्यांच्या अनुपम कीर्तन शैलीत व वक्तृत्वांत त्यांचे प्रेमळ बंधु आत्माराम बापू आपल्या पाठान्तराची व गायन कौशल्याची भर घालीत असत. बापूंच्या गायन कौशल्यावर तेव्हांचा राजाश्रित गवई वझीरखां इतका प्रसन्न असे कीं, तो प्रत्येक कथेस येई व त्याची बसण्याची जागाही ठराविक असे. असें सांगतात कीं, दादाजी एकदां नाथषष्ठीला पैठणास गेले असतां त्यांची कीर्तनाची वरणी कांहीं केल्या लागेना. कसाबसा अर्धा तास मिळाला व दादाजींने एकदा 'मुकुंद गुरु माउली' या पदाची ललकारी छेडली मात्र, तों समाज कीर्तनोत्सुक झाला, एवढेंच नव्हे तर त्या दिवशीच्या इतर सर्व हरदासांची कीर्तने रद्द होऊन यांचेच चालू राहिले व पुढे ३ दिवस तोच क्रम चालू राहिला. त्यांनी तेथेंच नाथावरचे संबंध आख्यान रचिले व श्रोत्यांच्या मनावर आपल्या कीर्तन चातुरीची छाप बसविली. त्यांचे रुक्मिणी स्वयंवर हे आख्यान अप्रतिम होत असे आणि त्यांत कोट्या, कल्पना व अभिनय यांची भर पडल्यामुळे लोक मंत्रमुग्ध होत. स्थलाभावामुळें कथेचे नमुने देता येत नाहीत. दादाजींना अहंकाराचा लेशही नसे, असें म्हणतात. आत्माराम बापू दादाजी असतांच इहलोक सोडून गेल्यामुळे कै. आबाजी[1] डाऊ हे साथ देत. त्यांचे गायन जरी आमच्या सारख्यास आकर्षक वाटे, तरी ज्यांच्या कानांत आत्माराम बापूंचे गायन गुंजत असे, ते आबाजींना कमी गुण देत. बापूंना भूगंधर्व म्हणत दादाजींचें देहावसान १८८९ त झाले. त्यावेळीं नागपूरच्या सुबुद्ध जनतेला अतिशय दुःख झालें. यांचे चरित्र कै. रे. ना. वा. टिळक यांनी ते ख्रिस्ती होण्यापूर्वी नागपुरास असतां लिहिलें. दादाजी नंतर त्यांचे पुतणे कै. बाबाजी महाराज व त्यांचे गाण्याचे साथीदार आबाजी डाऊ यानी दादाजींच्या कीर्तनाची प्रथा चालविली. विशेषतः विठोबा जुमल्यांचे शिष्य व लहान राजवाड्यांतील इस्टेटीचे मॅनेजर कै. रा. ब. नारायणराव व्यास यांनीं बाबाजींचे मार्गदर्शनही केले परंतु पूर्वीची सर आली नाहीं, असें वृद्ध म्हणत. हल्ली बापुजी घरीच

---

१ हे वैदिक असत व स्वपोषणही त्याच वृत्तीने करीत.

कीर्तनास उभे राहतात व त्यांचे नंतर कोण दादाजींचें काव्य ऐकवील याची शंका आहे. दादाजींचे लिखाण इतर कोणास फारसे मिळाले नाहीं किंवा छापून प्रसिद्धहि झाले नाहीं. आतां तर रुचीच बदलली.

गोपाळजी हरदास

हे कीर्तने करीत परंतु ते कथाकारापेक्षां कथा रचनाकार आधिक प्रमाणात असत. यांची कौटुंबिक पीठिकाच हरिदासांची होती. यांचे वडील व चुलते नाशकाहून येथें आले व त्यांना आपासाहेब भोसल्यांची पत्नी सावित्रीबाई हिचा आश्रय मिळाला. यांची नांवें बकारामबुवा व सीताराम बुवा हीं होत. ते फार व्युत्पन्न नसत. बकारामबुवाला तीन पुत्र होते. पैकी वडील दादाजी हे उत्तम वैद्य असत. दुसऱ्या विषयी सांगण्या सारखे नाही. तिसरे गोपाळजी हे उत्तम साहित्यिकरहि असत. त्यांचे गुरु रामशास्त्री खरे हे होत व ते गोपाळजींना पट्टशिष्य मानीत. दादाजींची स्वतःची पाठशाळा असे. उत्तर वयांत ते पोटाकारितां वैद्यकीचा धंदा करीत. कै. कृष्णाबुवा व कै. व्यंकोबा हरिदास हे त्यांची कीर्तनांचे शिष्य होत. त्यांची १० आख्याने त्यांचे पुतणे कै. श्रीनिवास शास्त्री यानी १९११ त प्रसिद्ध केली पण त्यांची खरी आख्याने याहून सरस आहेत किंवा ती कै. कायरकर शास्त्री व वि. बाबूराव दक्षिणामूर्ती व इल्ली साहित्याचार्य बाळाशास्त्री हरदास यांच्या तोंडून ऐकावयास मिळाली आहेत व मिळत आहेत. बकाराम बुवांचे बंधु सिताराम बुवा यांना बापुजी, रामचंद्र व जयराम असे तीन पुत्र होते. पहिले कीर्तन करीत पुढे त्यांना वैराग्य प्राप्त झाल्यावर ते गणोबाच्या वाडीत जाऊन राहिले. रामचंद्र बुवांचे पुत्र श्रीनिवास शास्त्री हे होत.

दक्षिणामूर्ति

अखिल महाराष्ट्रास सुपरीचित असलेले साहित्याचार्य बाळाशास्त्री हरदास यांचे येथे तीन पिढ्या पासून हरिदासाची पीठिका चालू आहे. यांचे खरे आडनांव श्रीरंभट्टलवार हे मागे पडून हरदास (हरिदास) हे आडनांव सुरु झालें आहे. नागपुरांत यांचे आजोबा नानाजी महाराज येऊन उणीपुरीं ११६ वर्षे झालीं. ते मूळ चिन्नूर येथील होत. त्यांचे वडील साक्षात्कारी पुरुष असत. नानाजी दोन वर्षांचे असतांच त्यांचे वडील वारले व आई

आपली लहानगी अपत्ये घेऊन भावांच्या आश्रयाने येथें येऊन राहिली. नानाजींची एक बहिण कै. वे. शा. कृष्णशास्त्री तैलंग यांची आई होय. नानाजीला १८ वर्षांचे होईतों विद्येचा विशेष संस्कार नव्हता. एकदां गोळ्या खेळत असतां याना अयाचित बुवानें त्या दिवशी कीर्तन करावयास कोणीच नसल्यामुळे वेठीस धरलें. ह्या दिवशीं सुदाम चरित्र त्यांनीं कसें तरी सांगितले पण नानाजींचे कल्याण व्हावे म्हणून बुवांनी त्याना भय्याजी व चिखलीकर हरदास यांचे कडून कीर्तन शिकविण्याची व्यवस्था केली व पुढे अभ्यास वाढत वाढत ते चांगली कथा करूं लागले. कै. जानोजी महाराज यांनीं नानाजींचे शिष्यत्व केले. शके १८२० च्या माघ शुद्ध १३ स त्यांनी हल्लीच्या ठिकाणीं दाक्षिणामूर्तींची स्थापना केली. रामशास्त्री खरे व गोपाळजी हरदास यांचाही सहवास त्यांना घडला त्यांच्या वयाच्या ६५ व्या वर्षा पासून कीर्तनाची माळ त्यांनी आपले चिरंजीव, कै. ह. भ. प. व्यंकोबा यांचे गळयांत घातली व स्वत: ईश्वर स्मरणांत व धार्मिक अध्ययनांत काळ घालवूं लागले. नानाजी ८७ वर्षांच्या वयांत १९४२ सालीं स्वानंदवासी झाले. त्यांची शिष्य शाखा बरीच मोठी असे व आज जें या मंदिराला महत्व आहे तें त्यांच्या पुण्याईचे फळ होय.

कै. व्यंकोबा हरदासांचे गुरु कै. गोपाळजी हरदास होत, हें वर आले आहे. हे देवस्थानांत कीर्तन करीत व फिरतीवरही जात. ते शके १८४८ आषाढ वद्य ३० रोजी वारले. हे असतांच त्यांचे विद्यमान ज्येष्ठ चिरंजीव आहिताग्नि ह. भ. प. बाबूराव कीर्तन करावयास लागले व त्यांचेवर विद्येचा पर्याप्त संस्कार झाला असल्यामुळें त्यांची कीर्तनेही सरस होत. हल्ली त्यांचा भर प्रवचनावर व भागवतादि ग्रंथांच्या पारायणावर आहे. श्रावणांतील कीर्तनाचें कार्य साहित्याचार्य बाळशास्त्रीच पार पाडतात. त्यांचा भर विषय प्रतिपादनावर अधिक असतो. त्यांचे अमोघ वक्तृत्व तर सुप्रसिद्धच आहे. यामुळें महिनाभर खूब गर्दी असते व सात्विक आनंदाला बहर येतो. हिंदुधर्माचे व संस्कृतीचे पुरस्कर्ते म्हणून, ग्रंथ लेखक व समालोचक म्हणून, रामायण महाभारतादि ग्रंथांचे आस्थेवाईक व कळकळीचे समीक्षक म्हणून त्यांना वर्धिष्णु कीर्तीचा लाभ झाला आहे. त्यांचे विद्या गुरु कै. कृष्ण शास्त्री घुले व वक्तृत्व कलेचे व प्रवचन चातुर्याचे गुरु कै. वेदान्त वाचस्पति

गेले. त्यांचे एक चिरंजीव त्र्यंबक शास्त्री हे धर्मशास्त्री व ज्योतिषी होते. हल्लीचे वंशज श्री. गंगाधर शास्त्री हे उत्तम ज्योतिषी आहेत. ते पंचांगही करीत असतात. जे पुढे क्वीन्स कॉलेजांत (काशी) जाऊन प्राध्यापक झाले, ते बापूशास्त्री देव विल्किन्सन रेसिडेंटला (१८३७) शिकवीत होते. त्यांनी पुढें ज्योतिषावर अनेक ग्रंथही लिहिले व पुष्कळच मानसन्मान मिळविला.

नागपूर प्रमाणें पौनी, रामटेक, उमरेड, अलीपूर (हिंगनघाट त.) तळेगांव दशासर, चांदा, मुलताई मंडला इ. ठिकाणीही संस्कृत विद्येचे व्यासंगी दिसतात. त्यांची माहिती स्थानिकांनी टिपून ठेविली पाहिजे.

हरिकथाकार

धर्मप्रसाराचें व सांस्कृतिक विकासाचें एक सोपें व महत्वाचें साधन म्हणून कीर्तनाची संस्था ही महाराष्ट्रीयांनी उपयोगांत आणली व ती अत्यंत परिणतावस्थेस नेली, या बद्दल कोणाचे दुमत होणार नाहीं. ललितवाङ्मय व ललितकला यांजकडे मनुष्याचा नैसर्गिक ओढा असतो. त्याचाच उपयोग करून व त्यांत कांहीं चुटके, अभंग, संतांचीं पदें व पौराणिक गोष्टी घालून तद्वारा आध्यात्मिक व सात्विक उपदेश करणे, हा या संस्थेचा हेतु आहे. कै. गोपाळजी हरदास व कै. दादाजी साधु या प्रणालीतील पहिली मूल्यवान रत्नें होत.

दादाजी साधु

मुकुंदराज साधूंचे वर्णन संतांच्या सदरांत आले आहे. त्यांना तीन पुत्र होते. पहिले बळिराम बुवा हे भगवद् भक्त असून शेवटी त्यांनी संन्यास[१] घेतला. दुसरे आत्माराम बापू व तिसरे दादाजी. दादाजींचा जन्म श्रावण वा॥ ८ शके १७४१ (इ. स. १८१९) रोजी घोड्याचे वेळयास झाला. त्यांचे लहानपण उनाडकींत गेले, परंतु पुढे त्यांनी नऱ्होबा दीक्षित व रामशास्त्री खरे यांचे जवळ संस्कृत साहित्याचें शिक्षण घेतले. नंतर न्याय शिकत असतां वडीलांनी त्यांचे लक्ष न्यायशास्त्रातील घटपटापासून परमार्थाकडे ओढले. आरंभी ते घरीच कीर्तन भजनादि करीत व त्याच बरोबर राजाकडे शिले-

१ यांची समाधि सकरदरा रोडला लागून असलेल्या एका गुजरांच्या वाडीत आहे.

खान्याची नौकरीही करीत असत. परंतु १८५१ त वडील वारल्यावर सर्व कुटुंबाचा भार त्यांचेवर पडला व लवकरच राज्य गेल्यामुळें व राजाश्रय बंद झाल्यामुळें ते कीर्तनार्थ बाहेरगावीहि जाऊं लागले. ते स्वतः कथा तयार करीत व त्यांच्या अनुपम कीर्तन शैलीत व वक्तृत्वांत त्यांचे प्रेमळ बंधु आत्माराम बापू आपल्या पाठान्तराची व गायन कौशल्याची भर घालीत असत. बापूंच्या गायन कौशल्यावर तेव्हांचा राजाश्रित गवई वझीरखां इतका प्रसन्न असे कीं, तो प्रत्येक कथेस येई व त्याची बसण्याची जागाही ठराविक असे. असें सांगतात कीं, दादाजी एकदां नाथषष्ठीला पैठणास गेले असतां त्यांची कीर्तनाची वरणी कांहीं केल्या लागेना. कसाबसा अर्धा तास मिळाला व दादाजीने एकदा 'मुकुंद गुरु माउली' या पदाची ललकारी छेडली मात्र, तों समाज कीर्तनोत्सुक झाला, एवढेंच नव्हे तर त्या दिवशीच्या इतर सर्व हरदासांची कीर्तने रद्द होऊन यांचेच चालू राहिले व पुढे ३ दिवस तोच क्रम चालू राहिला. त्यांनी तेथेंच नाथावरचे संबंध आख्यान रचिले व श्रोत्यांच्या मनावर आपल्या कीर्तन चातुरीची छाप बसविली. त्यांचे रुक्मिणी स्वयंवर हे आख्यान अप्रतिम होत असे आणि त्यांत कोट्या, कल्पना व अभिनय यांची भर पडल्यामुळे लोक मंत्रमुग्ध होत. स्थलाभावामुळें कथेचे नमुने देता येत नाहीत. दादाजींना अहंकाराचा लेशही नसे, असें म्हणतात. आत्माराम बापू दादाजी असतांच इहलोक सोडून गेल्यामुळे कै. आबाजी[1] डाऊ हे साथ देत. त्यांचे गायन जरी आमच्या सारख्यास आकर्षक वाटे, तरी ज्यांच्या कानांत आत्माराम बापूंचे गायन गुंजत असे, ते आबाजींना कमी गुण देत. बापूंना भूगंधर्व म्हणत दादाजींचें देहावसान १८८९ त झाले. त्यावेळीं नागपूरच्या सुबुद्ध जनतेला अतिशय दुःख झालें. यांचे चरित्र कै. रे. ना. वा. टिळक यांनी ते खिस्ती होण्यापूर्वी नागपुरास असतां लिहिलें. दादाजी नंतर त्यांचे पुतणे कै. बाबाजी महाराज व त्यांचे गाण्याचे साथीदार आबाजी डाऊ यानी दादाजींच्या कीर्तनाची प्रथा चालविली. विशेषतः विठोबा जुमल्यांचे शिष्य व लहान राजवाड्यांतील इस्टेटीचे मॅनेजर कै. रा. ब. नारायणराव व्यास यांनीं बाबाजींचे मार्गदर्शनही केले परंतु पूर्वीची सर आली नाहीं, असें वृद्ध म्हणत. हल्ली बापुजी घरीच

---

१ हे वैदिक असत व स्वपोषणही त्याच वृत्तीने करीत.

कीर्तनास उभे राहतात व त्यांचे नंतर कोण दादाजींचें काव्य ऐकवील याची शंका आहे. दादाजींचे लिखाण इतर कोणास फारसे मिळाले नाहीं किंवा छापून प्रसिद्धहि झाले नाहीं. आतां तर रुचीच बदलली.

गोपाळजी हरदास

हे कीर्तने करीत परंतु ते कथाकारापेक्षां कथा रचनाकार आधिक प्रमाणात असत. यांची कौटुंबिक पीठिकाच हरिदासांची होती. यांचे वडील व चुलते नाशकाहून येथें आले व त्यांना आपासाहेब भोसल्यांची पत्नी सावित्रीबाई हिचा आश्रय मिळाला. यांची नांवें बकारामबुवा व सीताराम बुवा हीं होत. ते फार व्युत्पन्न नसत. बकारामबुवाला तीन पुत्र होते. पैकी वडील दादाजी हे उत्तम वैद्य असत. दुसऱ्या विषयी सांगण्या सारखे नाही. तिसरे गोपाळजी हे उत्तम साहित्यिकरहि असत. त्यांचे गुरु रामशास्त्री खरे हे होत व ते गोपाळजींना पट्टशिष्य मानीत. दादाजींची स्वतःची पाठशाळा असे. उत्तर वयांत ते पोटाकरितां वैद्यकीचा धंदा करीत. कै. कृष्णाबुवा व कै. व्यंकोबा हरिदास हे त्यांची कीर्तनाचे शिष्य होत. त्यांची १० आख्याने त्यांचे पुतणे कै. श्रीनिवास शास्त्री यानी १९११ त प्रसिद्ध केली पण त्यांची खरी आख्याने याहून सरस आहेत किंवा ती कै. कायरकर शास्त्री व वि. बाबूराव दक्षिणामूर्ती व इल्ली साहित्याचार्य बाळाशास्त्री हरदास यांच्या तोंडून ऐकावयास मिळाली आहेत व मिळत आहेत. बकाराम बुवांचे बंधु सिताराम बुवा यांना बापुजी, रामचंद्र व जयराम असे तीन पुत्र होते. पहिले कीर्तन करीत पुढे त्यांना वैराग्य प्राप्त झाल्यावर ते गणोबाच्या वाडीत जाऊन राहिले. रामचंद्र बुवांचे पुत्र श्रीनिवास शास्त्री हे होत.

दक्षिणामूर्ति

अखिल महाराष्ट्रास सुपरीचित असलेले साहित्याचार्य बाळाशास्त्री हरदास यांचे येथे तीन पिढ्या पासून हरिदासाची पीठिका चालू आहे. यांचे खरे आडनांव श्रीरंभट्टलवार हे मागे पडून हरदास (हरिदास) हे आडनांव सुरु झालें आहे. नागपुरांत यांचे आजोबा नानाजी महाराज येऊन उणीपुरीं ११६ वर्षे झालीं. ते मूळ चिन्नूर येथील होत. त्यांचे वडील साक्षात्कारी पुरुष असत. नानाजी दोन वर्षांचे असतांच त्यांचे वडील वारले व आई

आपली लहानगी अपत्ये घेऊन भावांच्या आश्रयाने येथें येऊन राहिली. नानाजींची एक बहिण कै. वे. शा. कृष्णशास्त्री तैलंग यांची आई होय. नानाजीला १८ वर्षांचे होईतों विद्येचा विशेष संस्कार नव्हता. एकदां गोळया खेळत असतां याना अयाचित बुवांनें त्या दिवशी कीर्तन करावयास कोणीच नसल्यामुळे वेठीस धरलें. ह्या दिवशीं सुदाम चरित्र त्यांनीं कसें तरी सांगितले पण नानाजींचे कल्याण व्हावे म्हणून बुवांनी त्याना भय्याजी व चिखलीकर हरदास यांचे कडून कीर्तन शिकविण्याची व्यवस्था केली व पुढे अभ्यास वाढत वाढत ते चांगली कथा करूं लागले. कै. जानोजी महाराज यांनीं नानाजींचे शिष्यत्व केले. शके १८२० च्या माघ शुद्ध १३ स त्यांनी हल्लींच्या ठिकाणीं दाक्षिणामूर्तीची स्थापना केली. रामशास्त्री खरे व गोपाळजी हरदास यांचाही सहवास त्यांना घडला त्यांच्या वयाच्या ६५ व्या वर्षी पासून कीर्तनाची माळ त्यांनी आपले चिरंजीव, कै. ह. भ. प. व्यंकोबा यांचे गळयांत घातली व स्वतः ईश्वर स्मरणांत व धार्मिक अध्ययनांत काळ घालवूं लागले. नानाजी ८७ वर्षांच्या वयांत १९४२ सालीं स्वानंदवासी झाले. त्यांची शिष्य शाखा बरीच मोठी असे व आज जें या मंदिराला महत्व आहे तें त्यांच्या पुण्याईचे फळ होय.

कै. व्यंकोबा हरदासांचे गुरु कै. गोपाळजी हरदास होत, हें वर आले आहे. हे देवस्थानांत कीर्तन करीत व फिरतीवरही जात. ते शके १८४८ आषाढ वद्य ३० रोजी वारले. हे असतांच त्यांचे विद्यमान ज्येष्ठ चिरंजीव आहिताग्नि ह. भ. प. बाबूराव कीर्तन करावयास लागले व त्यांचेवर विद्येचा पर्याप्त संस्कार झाला असल्यामुळें त्यांची कीर्तनेही सरस होत. हल्ली त्यांचा भर प्रवचनावर व भागवतादि ग्रंथांच्या पारायणावर आहे. श्रावणांतील कीर्तनाचें कार्य साहित्याचार्य बाळशास्त्रीच पार पाडतात. त्यांचा भर विषय प्रतिपादनावर अधिक असतो. त्यांचे अमोघ वक्तृत्व तर सुप्रसिद्धच आहे. यामुळें महिनाभर खूब गर्दी असते व सात्विक आनंदाला बहर येतो. हिंदुधर्माचे व संस्कृतीचे पुरस्कर्ते म्हणून, ग्रंथ लेखक व समालोचक म्हणून, रामायण महाभारतादि ग्रंथांचे आस्थेवाईक व कळकळीचे समीक्षक म्हणून त्यांना वर्धिष्णु कीर्तीचा लाभ झाला आहे. त्यांचे विद्या गुरु कै. कृष्ण शास्त्री घुले व वक्तृत्व कलेचे व प्रवचन चातुर्याचे गुरु कै. वेदान्त वाचस्पति

भाऊ शास्त्री वझे हे होत. तसेच राजकीय क्षेत्रातील मार्गदर्शक, प्रोत्साहक व स्फूर्तिदाते कै. डॉ. मुंजे, कै. डॉ. हे डगेवार व स्वातंत्र्यवीर डॉ. सावरकर हे होत. त्यांना सरकारचाही पाहुणचार घडला आहे. महाराष्ट्रातील आदरणीय विद्वान् 'अप्रबुद्ध' यांचीहि स्फूर्ति त्यांना लाभत आली आहे. लेखणी नियोजित मर्यादेच्या बाहेर जाऊ पाहते, म्हणून येथेंच थांबलेले बरें. तरी पुनः एवढे म्हणावेसेंच वाटते कीं, त्यांचे ३४-३५ वर्षांचे वय लक्षांत घेतां, १०-१५ वर्षांपासून जो त्यांचा उत्कर्ष होत आहे, हें पाहून आमच्या सारख्या वयस्क मंडळीस त्यांचा अभिमान व कौतुक वाटते.

इतर कथाकार

नागपुरांतील आद्य कीर्तनकार लक्ष्मणबुवा डोके हे होत. त्यांच्या नंतर कै. माधवराव अवधूत यांचे गुरु भैय्याजी हरदास यांचा क्रम लागतो. यांचे वृत्त फारसे कोणास सांगता आलें नाही. त्यांचे कीर्तन सोपे, साधे व भक्तिभावपूर्ण असे. ते गंगाजमनाचे कोपऱ्यावर बालाजींचे देवळाजवळ राहात. कै. माधवरावा प्रमाणे कै. लहानबा पाठकहि याच प्रणालीचे होत. माधवरावांच्या नंतर त्यांच्या घराण्यांत कोणी झाले नाहीं, परंतु पाठकांची पीठिका तीन पिढ्या झाल्या तरी अविच्छिन्न चालू आहे. माधवराव अवधूत मोठे उदार व खर्चिक असत व अल्पशिक्षित बहुजन समाजाकडून त्यांना प्राप्तीहि चांगली असे, आमच्या लहानपणचे वयोवृद्ध लोकप्रिय हरदास लहानबा पाठक यांच्या कीर्तनाचे स्मरण झाले की आजही आम्हाला आनंदाच्या उकळ्या फुटतात. हे कुटुंब कमीतकमी २०० वर्षांचे जुने दिसते. कै. करताळकर बुवाही हरहुन्नरी व्यक्ती असून आम्ही त्यांची कीर्तने ऐकत असतां ते बरेच प्रौढ होते. त्यांची करताल वादनाची शैली आम्हाला स्मरते. ती निःसंशय आकर्षक होती. त्यांनी १११ अध्यायांत ओवीबद्ध एक 'संत चरित्र मालिका' लिहिली असून ती अप्रकाशित आहे. त्यावरून तत्कालीन समाजावर बराच प्रकाश पडतो. नागपूरस्थांना कांहीं काळ मधून मधून ज्यानी मोहित केले अशी व्यक्ति म्हणजे मोहगावचे भक्त केशवदास महाराज हे होत. त्यांच्या देवनाथ, दयाळनाथ यांच्या पद्धतीची पदे परंपरेने गाणारे एक गृहस्थ आजही भिक्षा वृत्तीने योगक्षेम चालवीत असतात. अलीकडच्या काळातलिच पण २७-११-१९५२ रोजीं निवर्तलेले ह. भ. प. दादा शास्त्री कायरकर हे

कै. कृष्णा बुवांचे शिष्य होत. त्यांचे, तसेंच कै. कृष्णराव भीष्म व विद्यमान ह. भ. प. दाजी शास्त्री चांदेकर यांचा आम्हास नियोजित कालखंडाच्या मानाने पाहतां नुसता उल्लेखच करणे प्राप्त आहे. त्यांचे मूल्यमापन पुढील पिढी करील. कै. कायरकरांच्या कीर्तन शैलीचे लोकमान्य टिळक व कै. पं. मदनमोहन मालवीय यांनी देखील कौतुक केले होते. लेखकाचे तर ते सन्मान्य मित्रच असत तरी एवढें मात्र खरें कीं हे तिन्ही हरदास प्रचालित राष्ट्रीय जागृतीला अनुसरून आपल्या कथांची मांडणी करीत आले य त्यामुळें ते लोकप्रिय झाले, नागपुरांतील हल्लीचे उदयोन्मुख हरदास ह. भ. प. विठ्ठलबुवा देवरस हे होत. विद्यमान श्री. बालाजी वझलवार याच वृत्तीनें असतात. या नंतर कै. कृष्णा बुवांचे थोडें वर्णन करून हे प्रकरण पुरे करू. वस्तुतः कृष्णाबुवा काय किंवा इतर आधुनिक हरिदास काय यांचे वर्णन करण्याचें कारण असें कीं, ज्या काळखंडाचे आम्ही वर्णन करीत आहोंत त्याचे पडसाद या सर्व वर्ण्य व्यक्तींच्या कथातून दिसतात. त्या नंतरच्या काळांत बरेच स्थित्यन्तर तर झाले आहे. यापुढे कदाचित् स्थानिक पद्धतीचा नमूनाही ऐकावयासही मिळणार नाहीं असें वाटतें.

कृष्णाबुवा पातुरकर

कै. कृष्णाबुवा पातुरकर यांच्या कीर्तन सुधेचा ज्यानी आस्वाद घेतला अशांच्या पुढे आम्ही त्यांच्या कीर्तन शैलीचे काढलेलें शब्द चित्र केव्हांही फिकेच पडेल. ही झाली सामान्य श्रोत्यांची गोष्ट. परंतु त्यांच्या वेळी असाही एक विद्वद्वर्ग असें की, त्यांना त्यांची तेवढी महती वाटत नसे व ते कीर्तनास जाण्याचीही टाळाटाळ करीत. परंतु ते देखील एकदां का कीर्तनात बसेल कीं, त्यांनाही आमचे कृष्णाबुवा माना डोलवावयास लावीत. त्यांच्या कीर्तन नैपुण्याप्रमाणें त्यांचे व्यक्तित्वही आबाल वृद्धास मोहित करीत असे.

कृष्णाबुवांचे वडील एके काळीं पेशव्यांच्या आश्रयाने ब्रह्मवर्तास असत, परंतु पुढे देऊळगांवांस प्रथम येऊन नंतर पातुरास (अकोला) स्थायिक झाले. कृष्णाबुवानीं आपले प्राथमिक पाठ वडीलांपासून घेतले. वडीलांचे नांव रावजीबुवा हे होतें. ते ९० वर्षांचे होऊन वारले. त्याना मुलाच्या कीर्तनांत कोठे चूक दिसली कीं, ते चार चौघां समोर पुढें सरसावून

'कृष्णा, हें कायरे' असें म्हणून कधीं कधीं स्वतःच कीर्तन करावयास उभे राहात. तरी चिरंजीवांची पितृभक्ति असी असें कीं, हें ते मुकाट्यानें सहन करीत. एवढेंच नव्हें तर वडील बुवांच्या कीर्तनांत येऊन बसले असतां त्यांना थुंकी आलीं तर किर्तनाचा रस भंग होऊ नये म्हणून बुवा वडीलाना कीर्तनातून थुंकावयास उठू न देतां, आपल्या रेशमी स्वच्छ उपरण्यांत बेडका झेलीत. कृष्णाबुवांचा जन्मकाळ इ. स. १८६८ हा येतो. नावा प्रमाणेंच बुवा सावळे असत, परंतु अंगबांधा ठेवणदार व मूर्ति जरा गुटगुटीत व ठेंगणीं असल्यामुळे त्यांना साधा पोशाखही खुलून दिसत असे. त्यांच्यांत वस्तुतः नटवेपणा नव्हता, पण तो भासत मात्र असे. साधा मलमलीचा अंगरखा, रेशीम काठी धोतर (हें त्यावेळीं सामान्य माणूसहि वापरीत असे), रेशमी उपरणें, शिरावर साधी पुणेरी पगडी, कानांत टपोऱ्या मोत्यांची भिकबाळी, बोटांत एकदोन सोन्याच्या अंगठ्या, एवढी त्यांची वेशभूषा असे. ब्रम्ह-निरूपणानंतर साथीदाराचें सुरेल गायन चालू असता, कोणीतरी भक्ताने स्वयंस्फूर्तीने बुवांना फुलांचे पेचक युक्त हार गजेरे व बाजूबंद चढविले कीं बुवांची निसर्गोल्लसित शामसुंदर मूर्ति तेव्हांच्या हंड्या झुंबरांच्या आल्हादकारक कोवळ्या प्रकाशांत अधिकच आकर्षक दिसे. कीर्तनारंभींच एकदां नमनाची चार पदें म्हटली कीं, बुवांच्या कीर्तनांत रंगदेवता जणुं हात जोडून उभी राही व कथेच्या पूर्वरंगानंतर श्रीज्ञानेश्वराच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे कथा-भाग करितां श्रोत्यांना 'श्रवणींचि होती जिभा' अशी स्थिति होत असे. विशेषतः बुवांचें अधिक मासांतील गोपीचंदाख्यान व त्यांतहि पुनः 'जू जू रे जू जू' ह्या पालुपदाची लयमाधुरी तितक्याच प्रमाणबद्ध सारंगीच्या संवादी साथींत श्रोत्यांची चित्तवृत्ति तल्लीन करीत असे. त्यांत पुनः बुवांचा प्रासंगिक विनोद व समयज्ञता, मोरोपंती आर्यांचीं प्रासानुप्रास व श्लेषपूर्ण यमकें यांची साखरपेरणी संस्कृत सुभाषितांतील बोध व विनोद यांची साभिनय भर पडली कीं, रंगदेवतेने उच्चांक गाठलाच म्हणून समजा. बायकांची कोण रीघ ! जागे करितां भांडणें होत, पण बुवा आपल्या विनोद-पूर्ण चातुर्याने व प्रेमळ अन्तःकरणानें त्या सर्वांना संभाळीत. बुवांच्या गाण्यांत विशेष ताना नसत, परंतु त्यांच्या म्हणण्यांतच असा ठसका असे कीं, बुवा एखादी लघुस्वन घाटित ठुंबरी तर म्हणत नाहीत, असा भास उत्पन्न होत असे.

प्रसंगीं लोकाग्रहास्तव, बुवा २ ते ३ कीर्तनें एकाच दिवशीं करीत पण मागे 'साथ' असो व नसो, बुवांचा आवाज बसल्यामुळें वा इतर कारणास्तव कथेचा कधीं रसभंग झालेला आठवत नाही. सामान्य श्रोत्यांच्याच नव्हे तर, कै. लो. टिळक, कै. नाम. गोखले, कै. श्रीमन्त दादा साहेब खापर्डे, कै. म. म. बापूजी ताम्हण यांच्या सारख्या उच्च दर्जाच्या श्रोत्यांच्या तोंडूनहि बुवांच्या कथे विषयीं स्वयंस्फूर्त प्रशंसोद्‌गार निघाले आहेत. गोपिचंद आख्यानांतील मैनावतीचा पुत्र वियोगरूपी करुण प्रसंग एकदां आला कीं, बुवा कित्येक भाविक श्रोत्यांच्या डोळयांना आपल्या रसवन्तीच्या प्रभावानें पाणी आणीत. बिदागीच्या वेळीं श्रोत्यांची, विशेषतः स्त्रियांची कृतज्ञता अशी उफाळून येई कीं बुवांच्या भाग्याचे चीज करावेसे वाटे. धान्याची व उंची वस्त्रांची, पितळी ताटल्यांची व रुपयांची कोण रास बुवापुढे पडावयाची ! कांहीं भगिनी तर कोणाला समजूं नये म्हणून घोंडफळांत मोतीं किंवा आंगठ्याहि घालून देत. केवढा अन्तःकरणाचा ओलावा हा !

बुवांच्या कीर्तनपटुत्वा प्रमाणें त्यांचे शीलहि समृद्ध असे. एकदा त्यांनी अयाचित मंदिरांतील (आपल्या धोंड्याच्या कथेच्या त्या कथा याच देवळांत नेमानें होत.) १२ शे रुपये बिदागीवर तुळशीपत्र अर्पण केल्याचें व ती सर्व रक्कम देवळाच्या दगडी दरवाजा करिता दिल्याचें मागें सांगितलें आहे. पातुरास श्रीं रामाचे मन्दिर बांधले तसेंच तें आपल्या राहत्या ठिकाणीं नागपुरांत काळु पुऱ्यांतहि उभारले. इतका पैसा बुवाना मिळाला पण बुवांनी तो दानधर्मांत खर्च केला. बुवाच्या मुलाच्या लग्नाकरितां कै. गंगाधर राव चिटणवीस, रा. सा. कप्तानासारखी मंडळी उमरावतीस गेली होती. या शिवाय सामान्य लोक किती तरी आपल्याच घरचे कार्य म्हणून या आनंदोत्सवांत सामील झाले होते. बुवा १९१२ साली वारले. त्यांचे चिरंजीव कै. रामभाऊ यानी वडीलाची प्रथा कांहीं वर्षे चालविली. वडीलांचे मानानें त्यांची आवृत्ति लहान व सरसपणांतहि कमीच. दुर्दैवानें ते अकाली वारले. त्यांचे धाकटे बंधु वे शा. नारायण शास्त्री यांनी कांहीं वर्षे नागपूरच्या वेदशाळेंत अध्यापनाचे कार्य केले. हल्ली ते मलकापूर येथील हायस्कुलांत संस्कृतचे शिक्षक आहेत. त्यांना इंग्रजी भाषेचाहि संस्कार झाला आहे.

प्रस्तुत लेखकाचें असें स्पष्ट मत आहे कीं, नागपुरांत कृष्णाबुवांच्या पूर्वी व नंतरहि आजतागायत अनेक कीर्तनकार झाले परंतु नारदाच्या गादीचा बोज न गमावतां किंवा अध्यात्माच्या भूमिकेला किंचित्हि दोलायित न करतां त्यांच्यासारखा श्रोत्यांच्या मनाची पकड घेणारा हरिदास आजपावेतो आढळला नाही. येथें किंवा इतरत्र त्यांच्या पेक्षा अधिक विद्वान् कीर्तनकार असतील, बहुश्रुत असतील, गायकींत सरसहि असतील परंतु कृष्णा बुवाच्या बाबतींतला अनन्वय अलंकार जो आमच्या मनांत ठाण मांडून बसला आहे, तो कांहीं केल्या विचलित होत नाहीं. कदाचित् त्यांच्या उत्कर्षांचेवेळीं आमचे मन कोवळे असेल म्हणूनहि असें झालें असेल, पण असें झालें आहे, हें खास !

सार्वजनिक उपासनास्थानें

धार्मिक जीवनांत उपासना स्थानांना महत्व आहे. हिंदूंतील साधुसंतांचे वर्णन करीत असतां त्यांच्या मन्दिरांचेहि उल्लेख ओघाने आले आहेत. या शीर्षकांत वैयक्तिक विवेचन फारसे आढळणार नाही नागपुरांत मराठे येण्या-पूर्वी गोंड राजे हे मुसलमान झाले होते, परंतु त्यानीं मुसलमानांना विशेष उत्तेजन दिलेले दिसत नाही. किंबहुना त्यांचा सर्व कारभार पाहतां असें निश्चित् अनुमान निघते कीं, हिंदूनाच त्यांचे कडून प्रत्येक क्षेत्रांत उत्तेजन मिळत असे मराठ्यांच्या काळांत अर्थात् हिंदुमंदिरे वाढली व त्यानंतर जैन मन्दिरांचीहि भर पडली. ब्रिटिश रेसिडेन्ट येथें १८०४ मध्यें स्थायिक झाल्यापासून ख्रिस्तीमंदिरांना सुरवांत झाली व पुढे त्यांचीहि संख्या यथोचित वाढली.

हिन्दु मंदिरें

जुन्या मंदिराची माहिती विनायकराव औरंगाबादकरांच्या लंडन येथील इंडिआ ऑफिसच्या लायब्ररीतलि यादीवर आधारलेली आहे. तिचें छायाचित्र ५ वर्षांपूर्वी मागाविले होते. सर रिचर्ड जेन्किन्स आपल्या १८२६ च्या वृतांत म्हणतो कीं, भोसले राज्यांत एकूण ४४३ मंदिरे होती व त्यापैकीं १५ मंदिरांचा खर्च (११ हजार रुपये) राजा चालावित असें. बांधणी विषयीं तो म्हणतो कीं "गढामंडला, छत्तीसगड व चांदा येथील देवळांच्या मानाने नागपुरातील

नवीन देवळे कमी दर्जाची आहेत. तथापि तीं जुन्या देवळांच्या मानाने बरी आहेत." ज्या नवीन देवळांचा जेन्किन्स उल्लेख करतो ती बहुधा द्वितीय रघूजीच्या काळांत ती राजपुरुषांनी बांधलेली देवळे असावीत. त्यावेळीं मराठाराज्य होऊन ५० एक वर्षे झाली होती. १७७५ पासून सामान्यतः राज्याला शान्ततादि लाभली होती. त्या मानानें झालेली मन्दिररचना कमी नाही. १८७० च्या गॅझेट मध्यें १८६५–६६ पर्यंत हकीकत आली आहे त्यांत असे निश्चित विधान केले आहे कीं, " महत्वाची अशी एकहि मशीद नाही, परंतु हिंदु मंदिरे अनेक असून त्यांपैकी काहीत मराठा स्थापत्य उत्कृष्ठ रीतीने दृग्गोचर होते" जेन्किन्सच्या वेळीहि केळीबाग, तुळशीबाग, बेलबाग, संगम, सकरदरा व तेलंगखेडी येथील भव्य व सुंदर मंदिरे व आद्य रघूजीची छत्री अस्तित्वात होती परंतु तिकडे त्याचे लक्ष्य कां आकर्षित झाले नाही, हें समजत नाही. औरंगाबादकरांच्या यादीत खुद्द नागपुरात ९८ मंदिरे व चबूतरे असल्याचें लिहलें आहे.[२] तृतीय रघूजीचे कारकीर्दीत राजाश्रित देवळांची संख्या १५ वरून २४ पर्यंत गेली व खर्चहि २२ ह. पर्यंत गेला. यापैकीं अयोध्या, काशी व प्रयाग येथील देवळावर ९ ते १० हजार रुपये, रामटेकवर ८ ह. रुपये व बाकीचा इतर देवळावर खर्च होई. पारडी व सोनेगाव येथील देवळे व सर्वांत उत्कृष्ट असे रुक्मिणी मंदिर, हीं तृतीय रघूजीच्या वेळची म्हणजे जेन्किन्स येथून निघून गेल्यावर किंवा औरंगाबादकरांच्या यादी नंतरची होत. बाकीची म्हणजे उपरोक्त द्वितीय रघूजीच्या वेळची मन्दिरें, महालावरील नागेश्वराचें मंदिर, व सर्वांत जुनें बुधवारीतील नागेश्वराचें मंदिर ही जुनी देवळें होत. इंदोऱ्याकडील राजाचें देऊळ मात्र आद्य रघूजीच्या वेळचे दिसते. स्थलाभावास्तव या विषयाचा अधिक विस्तार करता येत नाहीं.

---

१ चांदा येथील देवळांत कांहीं गोंडांच्या वेळची तर कांहीं त्याहि पूर्वींची असण्याचा संभव आहे. यांचे संशोधन करावयास हवें पोलीस ठाण्याजवळ व्यंकोजी भोसल्यांनी बांधलेले एक देऊळ आहे. त्याला नानासाहेबांचे देऊळ म्हणतात. व्यंकोजीना नानासाहेब म्हणत. पैकी २ हल्लीं हीं संख्या १ हजाराच्या वर जाईल.

राज्य गेल्यावर जी राजवाड्यांतील जड जवाहिराची कलकत्यास विक्री झाली त्या रकमेतील ३ लक्षांचे सरकारी रोखे घेण्यांत आले व त्यांच्या १४६५६ रु. च्या व्याजातून रामटेक, काशी, प्रयाग, अयोध्या, सोनेगाव व पारडी येथील देवळांचा खर्च चालतो. त्यावर देखरेख करणारी कमीटी १८६५ साली स्थापन झाली. तिचे अध्यक्ष जानोजी राजे होते. त्यानंतर त्याच घराण्यातील मुख्य पुरुष अध्यक्ष असतो व चिटणवीस घराण्यातील प्रमुख हा कार्यवाह असतो. ही व्यवस्था कशीबशी चालते, पण राजांच्या खाजगीतली जी उपरोक्त अनेक स्थानिक सुंदर मंदिरे आहेत, त्याची वाट काय ? राजकुलाकडून परिस्थितिमुळे त्यांची आबाळ होत आहे. त्याचीहि कांहीं संघटित व्यवस्था व्हावयास पाहिजे. नाहीतर निष्कारण हिंदुधर्मांच्या अनुयायावर लांछन येईल. या दृष्टीने पाहूं जाता, हिंदुसमाज पापाचा धनी होत आहे, असें म्हणावे लागते. सांप्रत जीर्णोद्धार ही वस्तु तो विसरला आहे. अजूनहि हा समाज स्वतःला सुसंस्कृत म्हणवीत असतां, दंभाने नवीन नवीन देवळे निर्माण करीत आहे याचा खेद होतो. अर्थात् हें नवनिर्मितींचें प्रमाण अत्यल्प आहे हें मान्य, तरी हा प्रश्न साकल्यानें व गंभीरपणे विचारात घ्यावयास हवा.

जैनमंदिरें

ही मंदिरे १०० वर्षांच्या वर नाहीत. यांची संख्या १३ असून ती सुस्थितीत आहेत. वसईत (इतवारीतील एक मंदिर) एक पाठशाळा असून दरवर्षीं जैनांचा थाटानें रथहि निघतो. एक आदितवार दरवाजा व दुसरे जुन्या शुक्रवारीतील सोडून बाकीची सर्व देवळे आदितवारी पेठेत आहेत.

मशिदी

कोणी हिंदु उठला कीं, घे दगड व लाव त्याला शेंदूर व कर आपला बडेजाव, ही हीन मनोवृत्ति हिंदु समाजात दिसून येते. त्यामुळें देवळांची संख्या भरमसाट वाढूं लागते. अशी प्रवृत्ती मुसलमानांत नसल्या कारणाने त्यांच्या मशीदींची संख्या मोजकी आहे. तरी कांहींच्या भोवताली उत्पन्नाकरितां दुकाने काढली आहेत. तर काहींत घरे दारेहि झाली आहेत. अशा रीतीने मशीदींत प्रार्थना करणारांस शांतता लाभत नाही. फक्त मशीदी समोर वाद्य

वाजविली म्हणजे मात्र त्यांची कालवाकालव होते. पंचवीस वर्षांपूर्वी तर दंगेच होत. तो प्रसंग नागपूरपुरता बंद झाल्या सारखा दिसतो. तरी अझूनहि कांही भित्रे हिंदु मशीदी समोर वाद्य बंद करतांना दिसतात. हिंदु मंदिरांच्या मानाने मशीदी जास्त टापटिपीच्या आहेत. यांची संख्या तिसाहून अधिक नसावी. यांजपैकीं जुन्याकाळीं कोणतीच मशीद सडकेवर नव्हती. उदाहरणार्थ जव्हेरी पुऱ्यातील दोन मशीदी, किल्याकडील काळीकरांच्या वाड्या जवळील, भालदार पुऱ्यांतील पत्थर फोडच्या आखाड्या जवळील, व बर्डी वरील, टेंपल बाजारा मागील व गुजरांच्या वाड्याकडील मशीद, या सर्व मशीदी आमरस्त्यावर केव्हांच नव्हत्या उलट मागाहूनच्या सर्व मशीदी सडकेवर आल्या आहेत आणि त्यामुळें कलहास एकेकाळी कारण झालें व याचा पहिला उल्लेख १८८८ मध्यें सापडतो. त्यापूर्वी रामनवमी व मोहरम एकाचवेळी आल्याचे दिग्दर्शित आहे परंतु स्वतः राजानेच मोहरमांत भाग घेतल्याचे नमूद असल्या कारणानें भांडणाचें कारण उद्भवल्याचें दिसत नाही.

ख्रिस्ती मंदिरें

या मंदिरांपैकीं सर्वांत जुने मंदिर बर्डीवरील टेंपल बाजारांतील होय. याला कलकत्ता सरकार कडून देणगी आल्याचे नमूद आहे. १८४० च्या सिव्हिल लाईन मधील मंदिराविषयी सांगावयाचे म्हणजे हल्ली मूळ मंदिराचा जीर्णोद्धार झाला आहे. जुन्या मंदिरास मराठा राज्यांतील लाकूड फाटा लागला होता. या शिवाय रोमन कॅथलिक चर्च शेजारचे प्रेसिबिटेरिअन चर्च, क्रिकेटच्या क्रीडांगणाच्या नैऋत्येस असलेले स्कॉटिशचर्च (१८६९ त बांधले) राजाबाक्षर रोडवरील फ्रेंचचर्च (हा राजाचा जुना कंगाल खाना होय) व इंपयार्डचे मंदिर, अशी हीं ख्रिस्ती मन्दिरे होत. व्यवहारकुशल ख्रिस्ती स्कॉटिश मिशनने आपले मेओ हॉस्पिटल जवळील तेलीपुऱ्यातील चर्च मालासुद्धा विकून टाकले[१] ख्रिस्ती मिशन्स व त्यांची मंदिरें या संबंधी एकच गोष्ट

---

१ हे कमिश्नर फ्रेजर याच्या यत्नाने१८९५ साली उभारले होते. सरकारी अधिकारी असून तो आपल्या स्कॉटलंडातील विनंति पत्रांत म्हणतो. "The church in the city will be a testimony for christ among the temples of Hinduism. It will facilitate aggressive mission work".

ध्यानांत ठेवावयाची आहे व ती ही कीं, ख्रिस्ती सरकारचे व भोसल्यांचे राज्य असता यांनी भरमसाट जमिनी आपल्या ताब्यांत घेतल्या. परिणाम असा झाला कीं, येथील जनतेच्या संख्येतून परधर्मांत डोक्यावर लोक तर गेलेच, पण महत्वाच्या जागाहि त्यांच्या ताब्यांत गेल्या. इकडे काँग्रेस सरकारचे नाही तरी समाज वाद्यांचे लक्ष्य जावयास हवे. अशाच गोष्ट टेलिग्राफ ऑफीस जवळील कब्रस्थानाची आहे.[१] बर्डीच्या टेकडी खालील कबरस्थान जसें हटविलें तसेच हें कबरस्थान हटविण्यासारखे आहे. त्याच प्रमाणें नगराच्या सोयी करितां ख्रिस्ती मिशननीहि भूदान यज्ञ करावयास हवा. त्यांच्या व आमच्या ध्येयानिष्ठेतहि महदंतर आहे, तेव्हां ते आज तरी आमचे नाहीत. तेव्हां आम्हाला त्याची सोय पाहतां येत नाही. आज पावेतो झालें ते पुरें झालें.

पारशी मन्दिर

शुक्रवार तलावावर पारशांची एकच अग्यारी आहे, ती बहुधा १८७७ च्या नंतरची असावी कारण १८६६ मध्यें नागपुरांत फक्त १० पारशी दिसतात. त्यांत एक घड्याळजी असे. तृतीय रघूजीच्याहि वेळीं कांहीं पार्शी असत.

भाग ६ वा—कलात्मक व बौद्धिक जीवन

मौखिक गायन

नागपुरांत गाणें म्हटलें की, लेखकाच्या डोळ्यासमोर पुसट कां होईना, पण कै. बापूजी जोशांची सावळी, साधी, पण बांधेदार मूर्ति उभी राहते.

१ तें चिकार भरलें असून हल्ली तें उपयोगांत नाहीं. तेथें मुख्यतः युरोपियन अधिकाऱ्यांच्या कबरी आहेत. हल्ली टायगर गॅप ग्राऊंडवर ख्रिस्त्यांचे कबरस्थान असून तेथील सर्वांत जुनी कबर थामस कीस असिस्टन्ट सर्जन ४८ रेजिमेंट मद्रास नेटिव इन्फन्ट्री याची आहे त्यावर २५-३-१८२५ ही तारीख आहे.

बापूजी हे बाबाजी घुले[1] यांचे शिष्य होत. दुसरे शिष्य इतवारीतील प्रसिद्ध वैद्य जगन्नाथजी यांचे मातामह, कै. शिवल्याजी वस्ताद व तिसरे कै. बापुजी बेदरकर, हे होत. स्वतः बाबाजी घुले हे **अनंतशास्त्री**[2] काशीकर यांचे शिष्य होत. असें सांगतात कीं, अनंतशास्त्री काशीस संस्कृत शिकावयास गेले, परंतु गायन घेऊन आले. कै. गडीघाटे व कै. विठोबा जुमळे हेहि घुल्यांचे शिष्य असत. कै. बाबाजी घुल्यांचा काळ म्हणजे विद्यमान रघुजी महाराजांचे वडील जानोजी महाराज यांचा काळ होय. जानोजींच्या पदरीं एक वझीरखां नावाचा हस्सूखां, हद्दूखां[3] यांच्या परंपरेतला बडोदे दरबारांतून आलेला गवई होता. कै. दादाजी साधु यांचे बंधु आत्माराम बापू हेहि उत्तम गायक होते. यांचे विषयीं यापूर्वी सांगितलें आहे. बापूजी जोशींचा संबंध या दोघांशीहि आला असला पाहिजे. निदान हद्दूखाचा पुत्र रहिमतखां यांचेशी तर आलाच होता. बापूजी विषयीं अधिक सांगण्यापूर्वी नागपुरांतील गायन परंपरा अनंत शास्त्रींच्याहि मागे नेता येते कीं काय, हें पाहिले पाहिजे.

राजदरबारांत कोणीतरी गवयी हवा. अनंतशास्त्री हे दरबारचे गवई नव्हते. त्यांचा उल्लेख राज्याच्या शास्त्री मंडळींत सांपडतो. बाबाजी घुले खुली बैठक करीत नसत. त्यांच्या घराण्याच्या परंपरेला ते शोभण्यासारखें नव्हतें. ते आपलें ज्ञान केवळ गंगालहरी वगैरे सारख्या प्रसंगीं दाखवीत. परंतु खासगी रीतीने विद्यादान करावयास अशी मंडळी केव्हांहि तत्पर असे. जानोजींच्या दरबारांतील वझीरखां यांच्यापूर्वी एक मंजूखां म्हणून गवई असे. या मंजूखां विषयीं नावापलीकडे माहिती मिळाली नाही. तथापि तृतीय रघूजीला गाण्याचा नाद होता हें उघड आहे. निदान दरबारांत गाण्याचा कार्यक्रम होत असे, या विषयीं संशय नाहीं किंबहुना तो " गाणे बजावणे या सारख्या हलक्या व्यवसायांत दंग असल्याचा " व त्यामुळें राज्याकडे त्याचें दुर्लक्ष झाल्याचा कै. या. मा. काळे व आणखी एक स्थानिक अभ्यासू

१ प्रसिद्ध म. म. कृष्णशास्त्री घुले यांचे चुलते; जन्म १८३५ अंदाजे; मृत्यु १८९२ इ.

२ तृतीय रघूजींच्या वहीखात्यांत यांच्या नांवाचा उल्लेख आहे.

३ दौलतराव शिंद्याच्या दरबारातील बडे महम्मदखां यांचे शिष्य.

त्याचेवर आरोप करतात. गाणें व राज्यकारभाराकडे दुर्लक्ष्य, यांत जो कार्य कारणभाव दाखविला आहे, तेवढा मात्र आम्हास संमत नाही. कारण त्या राजाच्या पूर्वी याहिपेक्षां थाटमाट होत असल्याचें वर्णन तेव्हांच्या कागदपत्रांत सांपडते. परंतु त्यामुळें शासन बिघडल्याचें दिसत नाही. तृतीय रघूजीनें एकदां कन्हान नदीवर वाघोडा येथे मोठा उत्सव केला होता व त्याप्रसंगी रेसिडेंट वगैरे सारख्या गोऱ्या पाहुण्यांना बोलाविले होते. तेव्हांच्या प्रासंगिक पोवाड्यांत "वाजे सारंगी सतार। लागे पखवाजाचा ताल। भले गवई गाणार। सुरताल धरून" असें वर्णन आहे. आणखी दुसरा उल्लेख रेसिडेन्सीच्या दप्तरांत सांपडतो. तेथें राज्याचीं सूत्रें हातीं घेतल्यावर रघूजीनें बंगलोर वरुन तंबोऱ्याच्या तारा मागाविल्याचे दोन उल्लेख आम्हांस पहावयास मिळाले. उलट जेन्किन्सच्या रिपोर्टांत मात्र राजाच्या गानव्यसनाविषयीं कांहीं लिहिलेलें दिसत नाहीं. निदान राजा जेंव्हा वयांत आला, तेव्हा तरी त्याला गायनाचा छंद नसावा पण ह्या मुद्याविषयी येथें अधिक लिहिणे अप्रस्तुत होईल उपरोक्त वाघोड्याच्या उल्लेखापूर्वी १७९९ मध्यें एक उल्लेख सांपडतो. कोलब्रूक यावेळीं नागपुरांत होता. तो म्हणतो, "द्वितिय रघूजी दरबारांत बसला असतां त्याचे भोवतीं जे मंडळींचें वेटोळें असे, तें राजकीय विषयांची चर्चा करण्यापेक्षां अहोरात्र चालणाऱ्या गायननर्तनांतच दंग असे." शुक्रवार तळ्यांत मासे पकडत असतां देखील होडीवर गवयांचे गाणे चालू असे, याचे कोलब्रूकला आश्चर्य वाटते, पण एतद्देशीय राजांची जी जलविहाराची पद्धति होती, तिला अनुसरून वरील सर्व गोष्टी होत असल्यामुळें त्यांत आश्चर्य वाटल्यासारखें असें काही नाहीं. वाघोड्याचाहि असाच एक जलविहार होता. या प्रसंगीं काय किंवा चिमणा बापूला मूठ मारण्यापूर्वी तो एका नाचावरून आला होता म्हणून जो उल्लेख आहे, त्याही प्रसंगी काय, कोणी प्रसिद्ध गवई किंवा नर्तकी यांचे नांव सांगण्यात येत नाहीं. यामुळें गायनपरंपरेतील वैयक्तिक दर्शन होत नाहीं व शेवटीं अनंत शास्त्रींच्या पलीकडे मागे जाणें अशक्य होऊन बसते. तात्पर्य, अनंत शास्त्री पासून बाबाजी घुले व त्यांचे पासून बापूजी जोशी एवढीच साखळी लागते.

बापुजींची[1] गाण्याची बैठक म्हटली कीं, रसिकांच्या झुंडी लोटत. त्यावेळीं टिकिट लावून गाणे करण्याची पद्धत नव्हती. किंबहुना मनोरंजनाचे सर्वच कार्यक्रम फुकट असत, फक्त अडचण काय ती प्रवेशास असे, कारण या सर्व बैठकी खासगी ठिकाणीं होत. बापुजींच्या गाण्याच्या बैठकीचें शुल्क केवळ २५ रु. असे. कै. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर नागपुरास आले म्हणजे बापुजींचे ते फार कौतुक करीत. एवढेंच नव्हे तर, त्या दोघांच्या कधीं कधीं जोड बैठकीहि होत.[2] बापुजींचे गायन इतरांसारखे एक कल्ली नसे. ते धृपद, ख्याल, टप्पा, ठुंबरी सर्व म्हणत. कै. विष्णुपंत छत्रे[3] यांचे बापूजी विषयींचे उद्गार ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत. ते म्हणतात, "मी पुष्कळ चांगले चांगले गवई ऐकले, परंतु बापूजी जोशी सारखा मधुर व सुरेल आवाजीचा गवई क्वचितच मला दिसला." कै. बाळाजी दीक्षित (विद्यमान संगीतज्ञ श्री बाळासाहेब बक्षी यांचे मामा) हे बापूजींना गाण्याची साथ देत, कै. नारायणराव जोशी (विद्य. नानाजी, पेटीतज्ञ, यांचे वडील) हे पेटी वाजवीत व कै. दिवाकर बुवा पेंडलवार हे तबला वाजवीत प्लेगांत बापूजी सुद्धां सर्व मंडळच्या मंडळ वर गेले. जणूं काय स्वर्गस्थ गंधर्वादि देवदेवतांना त्यांचे गाणेंच ऐकावयाची बुद्धि झाली! त्यांचा बैठकीच्या वेळचा पोषाख म्हणजे एक मलमलीचा सदरा; एरव्ही ते उघडेच हिंडत. त्यांना पैशाचा लोभ नसे. त्यांचे खजीनदार म्हणजे श्री. नागोराव बोबडे व त्यांची तिजोरी म्हणजे वळचण. दोन रुपये राहिले म्हणजे बापूजींना दुसऱ्या बैठकीची इच्छा उत्पन्न होई. नाही तर मन शान्त व प्रसन्न या वृत्तीमुळेंच त्यांना धनार्जनाकरितां बाहेरगावीं फारसें जावेसें वाटत नसे. त्यांनीं जर पुण्या मुंबईकडच्या लोकांचे तन्त्र उपयोगात आणले असतें, तर विपुल पैसा मिळविला असता. दीक्षितां पैकीं कै. नरहरपंत दीक्षितहि गवई

---

१ बापूजी विषयीं बरीचशी माहिती त्यांचे विद्यमान शिष्य (हल्ली वय ८२) श्री नारायण गुरु बोबडे यांनी सांगितली आहे.

२ तज्ञाकरितां बाळकृष्णबुवा कोण हे सांगण्याची जरूरी नाहीं. ते हिंदुस्थानी संगीताचे महाराष्ट्रातील प्रणेते वासुदेवराव जोशी यांचे शिष्य होत व वासुदेवराव हे तानसेनच्या परंपरेतील हस्सूखां यांचे शिष्य होत.

३ महाराष्ट्रातील आद्य सर्कसवाले.

असत. पण बेताचे. बापूजींच्या दोन पुत्रांपैकीं वडीलाचे नांव, रामभाऊ व धाकट्याचे भय्याजी, असें होते. धाकटा खरोखरीच होतकरू निघाला होता. तो ग्वालेरवरून गायनविद्येंत प्रवीण होऊन आला होता, परंतु त्याला लवकरच काळानें ओढून नेले. रामभाऊनी आधीं नाटक कंपन्यांत वगैरे कामे केली, पण पुढे ते नागपुरास आपल्या घरीच असत.[1] घरी मेहनत खूब घेत, पण त्यांचा बाहेर विशेष प्रकाश पडला नाही.

भोंवतीं दृष्टिक्षेप करतां आणखी काही गवयी दिसतात. कै. विठोबा जुमळे यांचा टप्पा प्रसिद्ध असे. गृहस्थ धंद्याने वैदिक, पण त्याचे जवळ गायनाचा बहुमोल ठेवा असे. यांचेच शिष्य आबाजी डाऊ हेहि वैदिकच प्रा. सावळापूरकरांचे घराचे शेजारी एक गणपतीचे देऊळ आहे. तेथें नागो ठुंबरीवाला म्हणून एक एकाकी व निरुपद्रवी गृहस्थ पडला असे. त्याच्या ठुंबरी म्हणण्याच्या कसबावरून त्याला ते नावच चिकटले. कै. शिवल्याजी वस्तादाचे शिष्य नानाजी गिट्टी उर्फ राजहंस म्हणून एक सुखवस्तु गृहस्थ असत. त्यांनी चार चौघांत कधींच गाणें म्हटले नाहीं, पण गायनाचे ते शौकी व तज्ज्ञ असत आणि घरीच ताना छेडीत असत. पवनीस रावसाहेब आकान्त हे नामवन्त जुन्या थाटाचे सुखवस्तु गवयी होऊन गेले[2] नागपुरात कै. बापुजी बेदरकर यांनी प्रथमच (१९१६) संगीताचे विद्यालय काढून केवळ गायनावरील प्रेमाकरितां पद्धतशीर शिक्षण देण्याचा उपक्रम केला,[3]

मध्यम गायकी

भजनी मंडळीत खड्गसिंग व पुत्र जैरामसिंग या जोडीचें भजन फारच चिताकर्षक असे. कै. श्रीमंत बाळासाहेब काळीकर[4] यांचाहि दर शुक्रवारच्या भजनाकरितां गाणारांचा ठराविक संच असे. कै. विनायकराव षडांगुळे वकील

१ घर वेदशाळेजवळ असे. पुढें तें गेले. वंशज हल्ली कोठे आहेत, हें माहीत नाही.

२ प्रसिद्ध कॉंग्रेस भक्त श्री. तात्याजी वझलवार यांचे मामा.

३ भोसले राजांच्या लहान पातीत डेप्युटी मॅनेजर असत.

४ विद्यमान श्रीमन्त काळीकर बंधूंचे वडील. यांनी कांहीं दिवस सरकारी नौकरी केली. मुन्सफ असत. लवकरच निवृत्त झाले.

हे यांचे कवि असत. या मंडळींनी सार्वजनिक रीत्या नाटकेंहि करून पाहिली. एक काळ असा होता कीं, जेव्हां नागपुरास नाटक कंपन्या पहिल्याने येऊं लागल्या (१८८२ ते १९००) तेव्हां आपण कमी तर नाहींच पण उलट गाण्याच्या भरंवशावर धंदेवाइकांपेक्षां अधिक सरस रीतीनें नाटके वठवून दाखवूं, या ईर्षेने ही मंडळी नाट्यकलेकडे वळली. कै.नारायणराव संगीत हे यांचे पैकींच नाटकांत काम करणारे एक गवयी होत. त्यावेळी कै. श्रीधरपंत पारख्यापासून तो पंढरीनाथ शास्त्री घाटे (कै. म. म. भटजी शास्त्रींचे ज्येष्ठ चिरंजीव) यांच्या पावेतो बरीच सुशिक्षित मंडळी नाटकांत लक्ष्य घालूं लागली होती. हल्ली जसा जो तो सिनेमाचें बोलतो, तसेंच त्यावेळीं नागपुरांत व इतरत्रहि नाटकाच्या बाबतींत होऊं लागले होते.

पेटी

नागपुरांत पेटी वादनांत विद्यमान श्री गोविंदराव विलायची यांचा हात धरणारा कोणी नाही श्री. गुणवंतराव हे त्यानंतरचे. या दोघांहि पूर्वी कै. शामराव बूट वकील, आकोला, हे अग्रेसर होते. हे वाद्यच मुळीं नवीन, तेव्हां त्यांच्या पूर्वीचे लोक सांपडणें शक्य नाहीं.

तंतुवाद्यें व कथ्यक

वेश्यांचे मागे सारंगीचे बजवय्ये असत, पण त्यांची मोजदाद कोण ठेवणार ? तरी कांहीं बजवय्ये केवळ हरिदासांची साथ करीत. पुढे नाटकांत याना भाव आला. नागपुरांत नागोराव वस्ताद म्हणून तीन पिढ्यां निर-निराळ्या नामांकित हरिदासांची साथ करणाऱ्या एका ९० वर्षांच्या इसमाची लेखकाने गाठ घेतली. तो वृद्ध तर होताच पण तितकाच दारिद्र्यामुळें विपन्ना-वस्थेंतहि होता. तरी त्याची आपल्या विद्येवर एवढी भक्ति कीं, त्याहि स्थितींत तो आपले कसब दाखवावयास तयार होता. पण त्यावेळी रेडिओ नव्हता. तबला हें वाद्य तसें कठिण आहे. कै. वासुदेवराव अयाचित हे या वाद्याचे तज्ज्ञ असत. ते कै. पेंडलवार याना समकालीन होत. ही मंडळी आज वयाने १०० च्या वर असती. यांचे नंतर कै. बळीरामपंत पंडे यांचे

नांव सर्वतो मुखी झालें होते.[१] तंतुवाद्यां पैकीं सतारींत विद्य. माधवराव अपराजित वकील रामटेक यांची पूर्ववयात तयारी चांगली असे. त्यापूर्वी एक केळीबागेवर ब्रम्हचारी बुवा असत. या वाद्याचा आम्ही येथें विशेष शौक पाहिला नाहीं. मृदंग वादनांत स्थानिक कोणी ऐकिवात नाहीं. सरोद, जलतरंग बीन यांचे बजवय्ये इकडे आले म्हणजे त्यांचे कौतुक होई पण स्थानिक कोणी नाही. कथ्थक नावाचे पुरुष नर्तक एकेकाळीं नागपुरांत वारंवार येत व ते नाचत असतां बैठकी वरील बत्ताशेहि फुटत नसत म्हणून कथा ऐकल्या, पण प्रत्यक्ष पाहण्यांत झाले नाहीं. नर्तकी मात्र अनेक पाहण्यांत आल्या. त्यांचा एक वेटाळच असे व शिवाय बाहेरगावावरूनहि येत. त्यांच्या खासगी बैठकींत हजर राहण्याची आमची लायकी नव्हती. त्यांना श्रीमन्तांचा आश्रय असे. लग्न प्रसंगी नर्तकीचा नाच असणे मोठेपणाचे लक्षण मानले जाई. पण त्यावेळी त्यांच्या गायन नर्तनाकडे कोण लक्ष देणार ? खरी रंगत खासगी बैठकीत येई. श्रोते हौशी असावे लागत !

शाहिरी गायन

नागपुरांत शाहिरी परंपरा खंडित झाल्यासारखी दिसते. कांहीं वर्षांपूर्वी प्रसिद्ध शाहीर श्री. खाडिलकर नागपुरास आले असतां त्यांनी या अंगाला अप्रत्यक्षपणे चालना दिली. श्री. बिंदुमाधव पुराणिक व श्री. सदाशिवराव हे आधुनिक पोवाड्यांचे रचनाकार होत. श्री. आयेरकर गुरुजी या प्रान्ताचे मुळात नसले, तरी आतां येथे स्थायिक झाले आहेत व त्यांच्या स्वरचित पोवाड्यांचे जलसे होतात. अडाणी तुंबडीवाले[२] बहुधा जुनेच पोवाडे म्हणतात. त्यांच्या म्हणण्यात एक आप्पासाहेबाचा पोवाडा असतो. तो कै. नीळकंठराव भवाळकर यांनी लिहून ठेविला होता व तो श्री. शे. गो. चट्टे यांनी नागपुरांतील हल्ली बंद पडलेल्या वागीश्वरी मासिकाच्या जानेवारी व फेब्रुवारी १९३४ च्या अंकात प्रसिद्ध केला आहे. तेथें परिचायक टीपा दिल्या असल्या

१ श्रीमन्त काळीकरांकडे मल्हारबा म्हणून त्यांचे एक कामदार उत्तम तबलची असून मोठमोठ्याची ते साथ करूं शकतात. आतां वृद्ध झाले आहेत.

२ नागपुरांत पूर्वी बुधवारीकडे एक स्वतंत्र तुंबडीपुरा असे, असे तुंबडीवाले पुण्याकडेहि होते व आहेत.

तर बरे झाले असते. बहुधा तुंबडीवाले नवीन कवने करतांना दिसत नाहींत. पण मागील वर्षी (१९५२) आम्ही स्वराज्य मिळाल्याच्या प्रसंगावर रचलेला पोवाडा तुंबडीवाल्याच्या तोंडून ऐकला. तो फारच बहारीचा होता. त्यांत मराठी, हिंदी व इंग्रजी या तीन्ही भाषांचे सुंदर मीलन व लकबी होत्या. पूर्वी कलगी तुऱ्याच्या गाण्याचे फड भरत. हल्ली हें दृश्य कोठें दृष्टीस पडत नाही ॲकवर्थ व शालीग्राम यांनी मिळून १८९१ मध्यें एक पोवाड्यांचे पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. त्यांत सुलतान व बापू मराठा, या दोन शाहीरांचे दोन पोवाडे असून एकाचा विषय चिमणाबापू व दुसऱ्याचा आपासाहेब भोसले हा आहे. तिसरा पोवाडा, खर्ड्यांच्या लढाईपूर्वी झालेल्या भोसले–पेशवे भेटीवर असून तो श्री. य. न. केळकर यांनी प्रसिद्ध केलेल्या पोवाडयांच्या दुसऱ्या भागात आला आहे. या पोवाडयाचा शाहीर निंबाजी नावाचा गृहस्थ आहे. चौथा पोवाडा शिवनाथराय याने केला असून तोहि या संग्रहांत आहे त्यात तृतीय रघूजीने कन्हान नदी वरील वाघोडा या गांवी जो थाट केला होता त्याचें रसभरित वर्णन आलें आहे.[1] तसेंच त्यांनीं १८३९ मध्यें जी काशी यात्रा केली त्यावर एक पोवाडा आहे. आम्हाला आणखी कांही पोवाडे मिळाले. त्यापैकीं कांहीं भाग वर उल्लेखिलेल्या शालिग्राम यांच्या पुस्तकांतील आपासाहेबावरील पोवाड्यांत आला आहे. आणखी एक भाग चंद्रपूरच्या मधुवन मासिकांत (जानेवारी, १९५२) आमचे कडून प्रसिद्ध झाला आहे. परसोजी भोसल्यांचा अकल्पित रीतीनें झालेला मृत्यु हा त्याचा विषय आहे. दुसरा पोवाडा धर्माजी भोसल्यावर आहे. तो प्रसिद्ध व्हावयाचा आहे. पोवाडयांचा कवि, काळ, त्यांत उल्लेखिलेल्या व्यक्ति, स्थाने व प्रसंग, शब्द व विधाने यांची चर्चा करणें उद्बोधक ठरेल परंतु हें सर्व करण्यास आपल्यास येथें सवड नाही.

सांप्रदायिक भजने वगैरे

गवयी थाटात भजने म्हणण्याचा जो प्रकार असतो, त्याचे वर्णन वर आलें आहे. श्रीमन्त काळीकर व कांहीं अंशी खंडूसिंग यांची भजने ही

---

१ वि. ज्ञानविस्तार वर्ष ११ अं. ११-१२ पृ. २५६ कवीचें नांव नाहीं. त्याचा गुरु गणू भोसला,

त्याची उदाहरणे होत. पखवाज (मृदंग) किंवा ढोलके व अर्थात् टाळ यांच्या साथीवर म्हणण्यांत येणाऱ्या भजनाची जात थोडी निराळी पडते. या प्रकारांत कै. नानासाहेब अहेरराव यांचे कडील भजन मंडळ फार प्रसिद्ध असे त्यांची दिंडी जागृतेश्वराच्या देवळांत जाऊन पाचपावलीच्या रस्त्याने महालावरून परत येत असे. डोकेबुवा कडील दिंडीहि अशीच प्रसिद्ध असे. यांत त्यांत सामील होणारांची संख्या बरीच असून वाटेंत मध्यें मध्यें थांबून प्रेक्षकांच्या थव्यां समोर उघड्यावर उच्च स्वरांत निवडक पदे म्हणण्याची चाल असे. कधीं कधीं गोल करून आपल्या इष्ट देवतेचे जोरजोरानें वारंवार नामोच्चारण करून मोठमोठ्या झांजांच्या साथीत तल्लीनपणानें ठेक्यावर नाचण्याचाहि प्रकार असे. कै. जानोजी महाराज हे आपल्या वडीलांचे म्हणजे नानासाहेब अहेरराव यांच्या भजन पद्धतीचे वारसदार होत व विद्यमान रघूजी महाराज यांचेहि भजन मंडळ पुष्कळांस माहीत असेल. यांत आत्म-प्रसादापेक्षां खाद्य प्रसादावरच पुष्कळांचे लक्ष असे. तथापि झोपमोड करणाऱ्या उत्तर हिंदुस्थानी भजन पद्धतीपेक्षां आमची पद्धति पुष्कळ बरी.

घरोघर होणाऱ्या भजने व पंचपद्या ह्या वरील प्रकारांतच मोडतात. हल्ली धार्मिक भावना कमी झाल्यामुळे यांचे प्रमाण कमी कमी होत आहे. सात्विक वारकरी भजने चालू आहेत. यांत महाराष्ट्र संस्कृतीची एकात्मता दिसून येते अभ्यास केल्यास भजनातील पुष्कळ पदांचे किंवा अभंगाचेहि साम्य दिसून येईल.

पूर्वी दंढार म्हणून एक प्रकार असे. हेहि एक सामुदायिक मनरंजनाचे साधन असे. हल्ली या पद्धतीचें उच्च स्थान लोपलें आहे. किंबहुना तमाशाकडे प्रवृत्ति अधिक दिसून येते. कांहीं वर्षांपूर्वी त्याला राजकीय हिडीस स्वरूप आले होते. यांत लावणी हा पद्य प्रकार अधिक लोकप्रिय आहे. आमचे मित्र कै. श्री. रा. बोबडे यांना लावणीतील हृद्यता पटल्यामुळें त्यांनी कांहीं उत्कृष्ट लावण्या केल्या आहेत परंतु हा उच्च दर्जा किति थोडे लोक गाठू शकतात? हें जरी मोडलें तरी पूर्वीं डफावर मनोज्ञ लावण्या म्हणत. तेव्हांच्या रस-निर्मितीत व आतांच्या रसनिर्मितींत बराच फरक पडला आहे.

नागपुरांत गोंधळीपुरा व भाटपुरा असे दोन पुरेच असत. गोंधळीपुरा तर आजहि आहे, पण मराठ्यांच्या ऐश्वर्यकाळीं जें गोंधळयांचे स्थान होते,

त्याचा आतां मागमूसहि दिसत नाहीं. फक्त दसऱ्याच्या नवरात्रांत कांहीं वृद्ध गोंधळी आपलीं जीर्ण पागोटीं डोक्याला गुंडाळून आपल्या संबळावर भिक्षा पदरात पडेल एवढ्या वेतानें थाप मारून भीत भीत गातांना दिसतात. नाहीं तर अगदी अलीकडच्या काळापर्यंत कै. हरबाजी गोंधळी सारखे लोक राष्ट्रिय जागृति निर्माण करण्याच्या दृष्टीनें पल्लेदार पोवाडे म्हणून आपले कसब दाखवीत. राजेरजवाडे गेले व त्याचे बरोबर भाटहि लोपले. कवित्व तर केव्हांच लोपलें. आतां एखाद्या श्रीमन्ताकडे जुन्या थाटाची जीर्णवस्त्रें अंगावर चढवून ललकारी मारणारा भाट भेटला तर नशीब ! पूर्वीं किती तरी भाटांना वर्षासने असल्याचा दाखला सरकारी कागदांत पहावयास मिळतो. गोंडराजाच्या इस्टेटीतहि तीं दिसून येतात.

शिक्षण व शिक्षण संस्था

व्यावहारिक व सांस्कृतिक शिक्षण देण्याची आधुनिक पद्धति सुरूं होण्यापूर्वीं शिक्षण खाजगी रीतीने देण्यांत येई. लोक दर विद्यार्थ्यामागे पंतोजीस २ ते ३ रु. दरमहा देत. पण त्यापेक्षां शिक्षक एखाद्या संपन्न गृहस्थाकडे फुकट राहून व त्याचेच पंक्तीला जेऊन त्याच्या व त्याच्या गावच्या मुलास फुकट शिक्षण देण्याची प्रथा अधिक प्रमाणांत अमलांत असे. शिक्षणाकरितां फी किंवा इनाम नसे. गावांतील शास्त्री किंवा पुरोहित विद्यार्थ्यांपासून कांहीं एक न घेतां विद्यादान करी किंबहुना निःशुल्क शिक्षण देणें, हें तो आपले पवित्र कर्तव्य समजत असे व आजहि तसेंच आहे. व्यावहारिक शिक्षण सोनार, शिंपी, किंवा कृष्णपक्षी या जातीचे लोक मुख्यत्वे करून देत. तृतीय रघूजीनें ज्या सुमारास राज्यसूत्रें हातीं घेतली, त्यावेळीं नागपुरांत म्हणजे सुमारें १२५ वर्षांपूर्वीं ४६ सार्वजनिक पाठशाळा अस्तित्वांत होत्या त्यांतून व इतर शाळांतून सवेतन निर्वेतन मिळून १०२ शिक्षक काम करीत होते. राज्य गेल्यावर नवीन शिक्षण पद्धतीचा उदय होण्याकरितां ८ वर्षें लागलीं म्हणजे १८६१ साल उजाडावे लागलें तरी परिस्थितींत फारसा फरक पडला नाहीं ४६ सार्वजनिक शाळांपैकीं ४० मराठी म्हणजे मोडींतून शिक्षण देणाऱ्या, २ फारशीच्या, ३ बाळबोधींतून शिकविणाऱ्या व १ फारशींच्या

माध्यमातून मराठी व हिंदुस्थानिचें शिक्षण देणारी शाळा होती. या शाळांतून अनुक्रमें ६२४, २२, ३९ व ५१ विद्यार्थी होते. एकूण संख्या ७३६. खासगी रीतीनें शिक्षण देणारे ५६ शिक्षक असून ते निःशुल्क ३२३ विद्यार्थ्यांना शिकवीत (कदाचित आज यांतून ३०० बाद करावे लागतील) व अशा दोन्ही प्रकारच्या विद्यार्थ्यांची मिळून १०५९ संख्या होते निर्वेतन पाठशाळांतून शिकणाऱ्या ३२३ विद्यार्थ्यांत वेदशास्त्र शिकणारांची संख्या १५९ होती त्यांचे खालोखाल म्हणजे १२६ फारशी शिकणारे होते व अरबीचे ३३ असून फक्त ५ विद्यार्थी तेलगूचे होते. मराठी–हिंदुस्थानी शाळा रेसिडेन्सीतलि एका कारकुनाच्या देखरेखीखाली असून तींत बायबलच्या नव्या व जुन्या करारांची त्या भाषेतील भाषांतरे शिकवीत. सार्वजनिक पाठशाळांतील शिक्षकाला सामान्यता महिन्याकाठीं ३॥ वेतन पडत असे.[1]

प्रांतांत सरकारी रीत्या आधुनिक शिक्षणाला सुरुवात प्रथम सागर जबलपूरकडे झाली. सागरातील आधुनिक विद्याप्रसाराची कथा मोठी मौजेची आहे यावरून तेथील प्रसिद्ध सुभेदार प्रभृति कुटुंबांत लोकहिताची केवढी तळमळ होती हें सिद्ध होते. किंबहुना हिंदुस्थानांत सर्वत्रच विद्येची विलक्षण तळमळ होती, हें शैक्षणिक इतिहास पाहता दिसून येते. फक्त सुरुवातीचा मान काय तो मिशनऱ्याना मिळतो एवढेंच. नागपुरांत मेजर हायस्लॉपने युरोपिअना करितां एक शाळा १८४० त सुरूं केली व १८४६ त फ्रीचर्च मिशननें इतराकरितां उघडली. या दुसऱ्या शाळेकरितां मराठी व हिंदी क्रमिक पुस्तकें श्रीरामपूरच्या रेव्ह. केरीने पुरविलीं. कलकत्यास सुरुवातीला (१८१२ इ.) मराठी शिकविण्याकरितां याच प्रान्तातून पं. वैजनाथ शर्मा यास नेले होते. ब्रिटिश आमदनींत १८८१ च्या २ नोव्हेंबरला हा प्रान्त, अस्तित्वांत आला. लवकरच जेव्हां शिक्षण खाते सुरू झालें तेव्हां नवीन शिक्षण देण्याकरितां एकहि चांगला शिक्षक येथे नव्हता, असे टेंपल म्हणतो. तो असेंहि म्हणतो कीं ' Hindusthanees have always beaten Marathas in the race for power, influence & fortune.' (पहा रिपोर्ट) पण हें खरें दिसत नाहीं,

---

१ पहा जेन्किन्सचा रिपोर्ट

प्रथम महालावर गोल बंगल्यांत ' ट्रेनिंग स्कूल ' निघालें. तेथें पुरुष शाखेवर एक युरोपिअन गृहस्थ व स्त्रीशाखेवर एक युरोपिअनबाई होती. पुढे मुंबई कडून सुशिक्षित मंडळी आली[१] (१८६३ इ. त). त्यांच्यात राष्ट्रीयत्व पूर्णपणें जागृत होते. यांच्याच खटपटीनें मुख्यतः १८६९ मध्यें नीलसिटीस्कूल नांवाचे शहरातील प्रसिद्ध हायस्कूल स्थापन झालें. प्रथम विद्यार्थी मुंबईच्या मॅट्रिकला जात. कै. सर बिपिनकृष्ण बोस १८७४ त नागपूरला आले व दोनच वर्षांनीं त्यांनीं सिटी स्कूलची सूत्रें कार्यवाह या नात्याने आपल्या हातांत घेतलीं. सिटिस्कूलांत नार्मल स्कूल व मिशनस्कूलचेहि बाहेरगांवचे विद्यार्थी राहात. प्रसंगीं शिक्षक मुलांना स्वैपाकहि करून घालीत. एन्ट्रसमध्यें (हल्लीची मॅट्रिक) २०-२२ वर्षे वयाची नागपुरी पागोटे डोकीला घालणारी मुले असत. पुष्कळदां त्या मुलांनाहि मुलें झालेलीं असत. विद्यार्थ्यांत बाहेरगांवची मुलें शान्त व अभ्यासू असत. नागपुरचा विद्यार्थी वर्ग जरा उनाड असे. आपापसांत मारामाऱ्या करणें बीभत्स शब्दांनी शाळेच्या भिंती चितारणे, वर्गातील बाके मोडणे वगैरे प्रकार चालत. तथापि सिटस्कुलांत एकापेक्षां एक मुख्याध्यापक आले व विद्यार्थीहि तसेच निपजले. कै. बाबूराव दादा किनखेडे हे या प्रान्तातील पाहिले एम्. ए. होत. त्यांच्या यशाबद्दल कै. नानासाहेब चिटणवीस यांनी त्यांची हत्तीवरून मिरवणूक काढून गांवभर साखर वाटली होती.[१] कै. बापुरावांमुळें इतरांनाहि स्फुरण चढलें व कै. अच्युत सिताराम साठे, घारपुरे बंधू सारखे आय. सी. एस्. व एफ्. आर. सी. एस्. सर कृष्णाजी कुकडे, डॉ गद्रे, कै, रा ब. ना. दा. वाडेगांवकर यांच्या सारखी मंडळी पुढे आली. मुख्याध्यापकांत कै वामनराव कोल्हटकर, कै. ह. म. पंडित, कै. वा. दा ओक, कै बा. वि. आवळे,

---

१ पहिले एतद्देशीय मुख्याध्यापक कै. बळवंत विनायक गोखले हे होत यांना संस्कृत, इंग्लिश, पर्शिअन, लॅटिन, उर्दू, हिंदी, सिंधी गुजराथी इ. भाषा येत. यांनी मध्यप्रदेशवृत्त या नावाचे मासिक वृत्तपत्र चालविले होते. डाकखर्चासह २। रु. पडत. याचे १८८६ पासूनचे अंक लेखका जवळ आहेत, गोखले यांचा मृत्यु नागपुरांत १०-५-१८८७ रोजी झाला. ते मरण समयी केवळ ४५ वर्षांचे होते.

१ पुण्यांत १८६२ साली जेव्हां कै. वामन आबाजी मोडक बी. ए. झाले तेव्हां बी. ए. कसा असतो हे पाहण्यासाठीं त्यांचेकडे पुष्कळ लोक आले होते.

कै. केशवराव जोशी कै. मोरो केशव दामले हे त्यांच्या ठायीं वसत असलेल्या अनेक गुणांमुळें विशेष आदरणीय होत. प्रारंभी पुष्कळ वर्षे मॅट्रिकची फी द. म. ||. असे व त्यावेळीं जेवणास ३ रु. द. म. खर्च येई. सर्व शाळांतून ड्रिल शिकविणारे दोन मुसलमान बंधू असत त्यापैकीं, श्री. निआजअल्ली हे कै वाडेगांवकर[१] यांचे वस्ताद असत. हे वस्ताद नुकतेच वारले.

खासगी प्राथमिक शाळेंत १८७० पावेतों स्लेटपाट्या आल्या नव्हत्या. त्यापूर्वीं मुलांना लाकडी पाटीवर विटाळीनें धुळाक्षरे काढावयास लावीत. पुष्कळदां एकाच ठिकाणीं सर्व वर्ग भरत आणि मग कोण गोंधळ. शिक्षक स्वतः किंवा इतर मुलाकरवीं शाळेंत न येणाऱ्या मुलांची उचलबांगडी करून आणीत असत. शिक्षांचे इतके अमानुष प्रकार असत कीं, लहान मुले शाळेंत जावयास भीत. विद्यार्थ्यांच्याहि कारवाया त्या मानानेंच उग्र असत व प्रसंगी मुलांचे आईबाप हे पंतोजींशी सामना देत कोलदांडा, घोडी, पाण्यांत मुद्दाम भिजवून ठेवलेल्या छड्यानी किंवा रुळानी मारणे वगैरे शिक्षेचे प्रकार, तर विद्यार्थीहि काचकुरीच्या बियाचा उपयोग करून त्यापासून उत्पन्न होणाऱ्या विलक्षण खाजेमुळे शिक्षकाला सळो की पळो करून सोडीत. परंतु शिक्षकांचा जसा राग तसा लोभहि विद्यार्थ्यांवर तेवढाच असे व शिक्षक मुलांना घरोघर जाऊन अंथरुणातून उठवीत, असाहि प्रकार पहावयास मिळे. (वैदिक, शास्त्रीय किंवा वैद्यकांच्या शिक्षणात या प्रकारांचा मागमूसहि नसे.) या गावठी शिक्षकाला एवढें करून वेतन काय तर मागे सांगितल्याप्रमाणे महिन्याकाठीं ३-४ रुपये. सुखवस्तू पालक शिक्षकांचा योग क्षेम चालवीत म्हणून बरे. नाहीं तर सणावारी मिळणाऱ्या फस्की पैशानें कितीसा निभाव लागणार ?

रे. हिस्लापच्या पत्नीनें प्रथम १८४९ मध्यें मुलींची शाळा काढली तींत तृतीय रघूजीची पट्टराणी अन्नपूर्णाबाई हिच्या दोन बहिणी प्रविष्ठ झाल्या, परंतु मिशनरींच्या हेतूचा संशय आला म्हणून त्याना लवकरच काढून घेण्यांत आलें. आरंभीं ही शाळा शुक्रवार तळ्यावर होती. पुढें ती किल्यांत गेली (१८८२) व तेथून ती भंडार दरवाजावर गेली (१८८५) व ५ वर्षां-पूर्वीं म्हणजे १८४८ सालीं ती शाळा जागेसुद्धां कै. दामोदरपंत मुळे यांनीं

१ मृत्यु १९-२-१९५० मरण समयीं ७९ वर्षांचे होते.

२०६०० रु. त विकत घेतली. हल्ली शहरांत मिशनची एकहि स्त्री शिक्षणाची संस्था नाहीं. त्यांनी बुधवारी, बर्डी इ. ठिकाणीं काढलेल्या कन्याशाळा तर केव्हांच बंद पडल्या. आमच्या घरापर्यंत मिशनरी घुसत चालले, हें पाहून कै. काशीनाथ रावजी गोखले वकील, यांचे हृदय द्रवलें व त्यांनी पुढाकार घेऊन प्रथम रुक्मिणी मंदिरांत शाळा काढली परंतु ती या शतकाच्या आरंभीच बंद पडली. पुढें कै. ओगले, कै. अण्णासाहेब खोत, कै. नारायणराव पंढरपूरकर, डॉ. ल. वा. परांजपे, श्री. दामूअण्णा देशमुख व लेखक या मंडळींनीं पुढाकार घेऊन हल्लीची श्रीमती दादीबाई देशमुख हिंदुमुलींची शाळा १९१५ त स्थापन केली व सुमारें दोन तपें सरकारी सहाय्य नसतां, ती शाळा पुढे आणली मुंबईचे प्रसिद्ध शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ. गोपाळराव देशमुख, त्यांचे बंधु बॅ. गोविंदराव देशमुख व श्री. दामूअण्णा देशमुख यांचे जर आम्हा मंडळीना ५ हजार रु. ची देणगीच्या रूपाने व इतर सहाय्य मिळाले नसते, तर आम्हाला जी शाळेची प्रगति करण्याचें भाग्य लाभले, ते लाभले नसते. स्वतः लेखक त्या शाळेचा सतत १५-१६ वर्षें कार्यवाह राहिला. या शाळेच्या प्रगतींत महाल अमॅचूर क्लबचे मुख्य संचालक श्री. पुरुषोत्तमराव गोडबोले व त्यांचे सहकारी यांच्या नाट्य प्रयोगांच्या रुपानें केलेल्या सहाय्याला महत्वाचें स्थान आहे.

महाविद्यालयीन शिक्षण

कॉलेजच्या (महाविद्यालय) शिक्षणाचाहि इतिहास असाच उद्बोधक आहे. डॉ. डफ हा खिस्ती मिशनरी १८२९ पासून कलकत्यास असे. धर्म-प्रसाराचें मुख्य साधन म्हणून त्याने नागपूरला महाविद्यालय काढावयाचें ठरविलें. हल्लीच्या शुक्रवार तळ्यावरील लेकव्ह्यूच्या जागीं कॉलेजसाठीं इमारत बांधण्यांत आली. ती १८५६ ते १८६० या चार वर्षांत पूर्ण झाली. त्यावर कलकत्याच्या इंजिनिअरची देखरेख होती. रे. हिस्लप या प्रान्तात १८४५ सालीं आला व त्याचें मिशनघर हल्लीच्या स्टेशन समोर टेकडीवर होते. यानें व रे. डफनें मिळून निधि एकत्रित केला. त्यापैकीं अर्धी रक्कम स्थानिक धनिकांनी दिली. २२ हजार रुपये इमारतीला खर्च आला परंतु बायबलच्या उपदेशाप्रमाणें इमारत खडकावर न उभारता कच्च्या मातीवर

उभारण्यांत आली व १८८५ मध्येंच तींत मोठमोठ्या भेगा पडल्या.[1] तेव्हां १८८७ त हल्लीचे हिस्लप कॉलेज बांधण्यांत आलें. यावेळीं आनंदसिंग नावाच्या हिंदी खिस्ती गृहस्थानें एकेक दगड तपासून घेऊन प्रत्येक थर काळजी पूर्वक बांधल्याचा उल्लेख आहे. १८८६ त कलकत्ता विद्यापीठाचें येथे केन्द्र झालें व १८८७ त बी. ए. करितां पहिली तुकडी बसली. तींत ४ बी. ए. चे, ९ एफ्. एचे व ३४ एन्ट्रन्सचे विद्यार्थी होते. रे. कूपर हे कॉलेजचे पहिले प्राचार्य होत. येथें बहुधा इंग्रजीवर भाळलेले विद्यार्थी जात.

मॉरिस कॉलेज (हल्लीचे नागपूर महाविद्यालय) १८८५ त स्थापन झालें. मिशनने त्याच्या स्थापनेस विरोध केला परंतु तो यशस्वी झाला नाही. हें कॉलेज प्रथम तुळशीबागे जवळ भोसल्यांच्या बरसाती बंगल्यांत भरत असे. लवकरच म. म. केशवराव ताम्हण प्राचार्य झाले. इतर प्राध्यापक बंगाली होते. पुढें कॉलेज सिटीस्कूलच्या इमारतीत गेले. कै. सर बोस याहि संस्थेचे कार्यवाह होते. १९०७ सालीं हे विद्यालय अलाहाबाद विद्यापीठाच्या कक्षेंत आलें. युरोपिअन प्राचार्य जोन्स यांची म. म. ताम्हणाचे जागी नियुक्ति झाली व आणखी एक युरोपिअन प्राध्यापक नेमण्यांत आला. १९०७ ते १९०९ हा काळ राष्ट्रीय चळवळीचा होता. लो. टिळकांना शिक्षा झाली होती. कॉलेज तोंपावेतों स्वतंत्र होते. जादा सरकारी नेमणूक घ्यावयाचेहि ठरलें तेव्हां विद्यार्थ्यांत क्षोभ उत्पन्न झाला व जोन्स साहेबाला मार खावा लागला. पुढें हें कॉलेज हल्लीच्या जागी गेलें वगैरे वाचकांस माहीत आहे. पूर्वी कायद्याचा वर्गहि सिटीस्कूलांतच असे. हल्लीच्या युगांतील श्री. बिंझाणी कॉलेज (स्थापना १९३०) व मोहता विज्ञान महाविद्यालय सर्वांस सुपरिचित आहेत. बिंझाणी कॉलेजचे मूळ संस्थापक आमचे मित्र श्री. ज. मा. कायन्दे बी. ए. हे होत. हल्लीचे प्राचार्य श्री. श्री. ल. पांढरीपांडे या सुयोग्य व शीलवान् पुरुषाच्या निरीक्षणाखालीं त्या संस्थेचा उत्कर्ष होत आहे. संस्थेचे अध्यक्ष न्या. मंगळमूर्ति व कार्यवाह श्री. रा. वि. काळीकर यांचेहि हार्दिक सहकार्य संस्थेस लाभत आहे.

---

१ शेजारी राजानें 'नेटिव कारागिरांकडून जी इमारत उभारली ती मात्र अझून आहे. प्रा. को. ऑ. बँकेची मूळ इमारत हीच होय.

ब्रिटिशांच्या अव्वल आमदनीच्या पूर्वी पासूनच रुक्मिणी मंदिरांत वेदशाळा असे. पुण्या मुंबई कडून जी मंडळी आली तिने या संस्थेची जोपासना केली व कै. बापुजी बोधनकर प्रभृतीच्या श्रमाने तिला इमारतीचा अमृत सिद्धियोग लाभला. आज तें संस्कृत महाविद्यालयच आहे.

प्रथम प्रथम हा प्रान्त शिक्षणांत मागासलेला वाटे परंतु हल्ली स्थानिक प्रयत्नांस खूब बहर आला आहे, तरी मुंबईकडून येथे आलेल्या आद्यप्रवर्तकांचे आपण ऋणी असले पाहिजे.

इतर बौद्धिक साधनें

(१) हस्तलिखितें–पुण्यास जसें पेशव्यांकडून दरवर्षी विद्वानांस पर्वतीखाली रमण्यांत दक्षिणा वाटून विद्येला उत्तेजन देण्यात येई, तशी येथे संस्था नव्हती. तरी त्याची लहानशी आवृत्ति असे. तृतीय रघूजी रोज शुक्रवार तळयावर ब्राम्हणांना दक्षिणा देई. धुलेशास्त्री किंवा सिताराम शास्त्री केळवदकरांसारख्या विद्वानास मोकासे दिले गेले. त्याच प्रमाणे राजवाड्यांत व श्रीमंतांकडे खासगी पुराणिक असत. त्याच प्रमाणे धार्मिक ग्रंथ लिहिणारास उत्तेजन देण्यांत येई. कांहीं हस्तालिखित धार्मिक ग्रंथ राजाच्या कोठींत आहेत. ते पाहता, नकलकारांनीहि आपल्या कौशल्याची कमाल केली आहे असें दिसून येते. दोन बोटांच्या चिमटींत मावतील इतक्या पातळ कागदावर बारीक अक्षरांत एखाद्या पुराणाचें पर्वचें पर्व लिहिलेलें आढळेल. राजा व्यतिरिक्त इतर श्रीमंतांनी या गोष्टीस फारसे उत्तेजन दिलेलें दिसत नाही. श्रीमंत काळीकरांकडे पौनीस एक महाभारताची व दुसरी रामायणाची अशा दोन पोथ्या ठळक अक्षरांत लिहिलेल्या व चांगल्या वस्त्रांत नेमस्तपणें गुंडाळून ठेवलेल्या आढळतात त्या शुद्धच असतील असें वाटत नाहीं. वाचक तर विरळाच. त्याचप्रमाणे भोसल्यांच्या ताब्यांत जेवढी देवळें होतीं, तेथेहि एक दोन पोथ्या ठेवण्यांत येत. पंडितांपैकी, धुलेशास्त्रीकडील ग्रंथसमूह कै. रंगाचार्यांकडे मुख्यतः आला व तेथून तो पुढे कोठे गेला हे सांगता येत नाही. कोठींतील पोथ्या अप्रबुद्ध ब्राम्हणांच्या ताब्यांत राहिल्या व त्यांतील महत्वाचे ग्रंथ कोठेतरी गेले. देवांच्या कडच्या कांहीं पोथ्या वेदशाळेंत गेल्या. कांहीं पोथ्या वर्णीकर वैद्यांकडे आढळल्या, पण त्या आम्हास महत्वाच्या वाटल्या नाहींत.

यवतमाळचे डॉ. अणे यांनी कांहीं वर्षांपूर्वीं नागपुरातील वैदिक घराण्यातील ब कोठींच्या कांहीं पोथ्यांची यादी केली होती, ती संग्रही आहे. वाईकरांकडील व इतरांकडील बऱ्याच पोथ्या मध्यप्रदेश संशोधन मंडळाच्या ताब्यांत आहेत, पण त्यांची पूर्ण तपासणी अजून होणे आहे. जागेच्या अभावामुळें इकडे कोणास लक्ष्य द्यावेसे वाटत नाहीं. लेखकानें येथील गंगाधर शास्त्री मंग्रूळकर यांचा संग्रह तपासून त्यातील त्यांनीं केलेलीं विविध विषयावरील अमुद्रित पुस्तकें विद्यापीठांत प्रविष्ट होण्याची व्यवस्था केली. पौनी येथील संग्रह पाहून त्यांतील इतिहासोपयोगी भाग जेवढा उपलब्ध झाला तेवढा लेखकानें आणला व बाकीचा तसाच आहे. भिवापूर येथेंहि कांहीं पोथ्या आहेत. उमरेडच्या पोथ्या पाहण्याचें जुळलें नाहीं. तसेंच इतवारींत एक अग्निहोत्री संग्रह आहे.

आधुनिक युगांत बर्डीवरील दीक्षित वाचनालय व शहरातील राष्ट्रीय वाचनालय ह्या जुन्या संस्था होत. दुसऱ्याचें "नेटिव जनरल लायब्ररी" हे पूर्वीं नाव असे. तिची स्थापना १८८२ साली झाली व दीक्षित वाचनालयाची १८९५ त औपचारिक रीत्या जरी स्थापना झाली असली तरी तें बीज रूपाने १८६९ पासून अस्तित्वांत होतें. इतवारीतील रामकृष्णपुरी वाचनालय १९०७ सालीं अस्तित्वांत आलें. १९१५ त मुंबईच्या ग्रंथालयाच्या धर्तीवर ज्या टालाटुले यांच्या गाडीखान्यांत आम्ही श्री, दादीबाई देशमुख कन्या शाळेचे वर्ग भरवीत असूं, तेथेंच एक ग्रंथालयहि चालूं केलें. यांत मुख्यतः कै. शं. ज. खोत व लेखक हे होते परंतु तो प्रयत्न अल्पजीवी ठरला. मुलींची शाळा ते मात्र तेथेंच कायम झाली व अंशतः ग्रंथालयहि त्या शाळेलाच देण्यांत आलें. दीक्षित वाचनालय ही संस्था सर्वांत यशस्वी झाली आहे. छापखान्याचा व वृत्त पत्रांचाहि थोडा इतिहास आहे. याला आरंभ जानोजी महाराजांचे वेळे पासून होतो. त्यांचा एक विश्वासू स्नेही लक्ष्मण कामाठी यानें प्रथम शिळा प्रेस सुरूं केला. त्यानंतर हरिपंत दाते यांचा छापखाना उपाध्यांच्या वाड्यांत असे. या नंतर आल्बर्ट प्रेस, यादवेन्द्र प्रेस, दत्तविलास व व्हिक्टोरिया असे छापखाने झाले. मध्यप्रदेश वृत्त म्हणून एक हिंदी, उरिआ व मराठी या ३ भाषांत सरकारी छापखान्यांत छापलेलें पत्र निघत असे. त्यांचे १८८५-१८८७ चे अंक संशोधन मंडळांत आहेत. प्रथम खंडव्याचा सुबोध सिंधूत व १८७० पासून वर्धा मुक्कामी छापलेली

कायद्याची प्रतिवृत्ते निघत. मध्यप्रदेश वृत्तानंतर नागपूर वऱ्हाड टाईम्स हें इंग्रजी व मराठी या दोन भाषांत बेलीच्या छापखान्यांत छापून प्रसिद्ध होत. असे. मराठी भाग गोपाळराव एडिटर (यांचे खरें आडनाव रंगनाथ) याचे-कडे असे. न्यू इंग्लिश हायस्कूलचे आद्यसंस्थापक श्रीधरपंत पारखी यानी १८९२-९३ मध्ये टीकाकार नांवाचे पत्र काढले होते त्यांत कै. अच्युत सिताराम साठे यांनी सरकारी नौकरी पत्करल्यामुळें व्यंग्य चित्र काढून टीका केली होती. कै. विनायकराव षडंगुळे यांनी १८९२ मध्यें काढलेलें नीर-जोल्लास मासिक दोनेक वर्षें टिकलें. १९०७ साली कै. माधवराव पाध्ये वकील यांनी देशसेवक काढला व नागपूर समाचार पत्र बंद पडलें. पुढील प्रयत्नांचा इतिहास डोळयांसमोर आहे. पुण्याची सार्वजनिक सभा १८७१ त स्थापन झाली. त्या धर्तीवर शहरांतील तीव्र बुद्धीचे व राष्ट्रीय वृत्तीचे तरुण वकील कै. कृष्णराव देशपांडे एम्. ए. बी. एल्. (कै. श्री. रा. बोबडे वकील यांचे सासरे) यांनी १८८६ मध्यें लोकसभा नावाची संस्था काढली. या सभे मार्फत पुण्याच्या वसंत व्याख्यान माले सारखी व्याख्याने होत. त्यांत कै रा. ब. नारायणराव केळकर, कै. रा. ब. वामनराव कोल्हटकर प्रभृति भाग घेत. त्यावेळीं राजकीय विषयांपेक्षां सामाजिक सुधारणेवर अधिक भर असे. नंतर एक वक्तृत्व सभा निघाली. तींत लेखकासारखे भाग घेत. पुढें आम्हीच म्हणजे श्रीमंत काळीकर, डॉ. भोजराज कै. खोत व श्री. पंचवटीकर या मंडळीनीं १९१२ सालीं ती सभा पुनरुज्जीवित केली व तींत प्रि. पांढरीपांडे व श्री. रा. वि. काळी ही मंडळी इनामे पटकवीत, नाट्य संस्थे संबंधी मधून मधून मागे उल्लेख आले आहेत. आरंभी जेव्हां येथें किर्लोस्कर, शाहू नगरवासी वगैरे सारख्या मंडळया यावयास सुरुवात झाली, तेव्हां मोठ्या मोठ्यांस नाटकाचे वेड लागले. वर्ध्याचे डॉ. मारोतराव, बाळाजी बेलखोडे, वंजारी, नारायणराव संगीत, बापटे, ही मंडळी कै. श्रीमंत बाळासाहेब काळीकर यांच्या नेतृत्वाखाली अहमहमिकेने पुढे आली. षडंगुळे यांनी नलदमयंति हें नाटक लिहिले व ते त्यांच्या मित्रांनी वठवूनहि दाखविले ते इतरहि प्रचलित नाटके करीत. या नंतर दुसरा संच कै. पंढरीनाथ शास्त्री घाटे यांचा. त्यांनी नाटके लिहीत जावी, तालमी करीत जाव्या, व मधून मधून प्रयोगहि करीत जावे. त्या नंतर कांही ध्येयनिष्ठ मंडळी पुढे आली. त्यांत

डॉ. ल. बा. परांजपे, कै. नारायणराव वैद्य, श्री. पुरुषोत्तमराव गोडबोले, कै. गोडबोले शिंपी, श्री. नरहरि बापट, पुरुषोत्तमराव बापट, श्री. दांडेकर शिंपी, त्रिंबकराव दीक्षित, धोंडोपंत गोंधळेकर ही मंडळी भाग घेऊं लागले परंतु त्यांनी आपले सर्व श्रम सत्कार्यी लाविले. लेखक व दामूपंत देशमुख हे हिंदुमुलींच्या शाळेचे कार्यवाह म्हणून त्यांत सामील असत. शाळेला त्यांनी केवढी मदत केली हें मागें आलेंच आहे. असेंच भरीव कार्य १९१७ सालीं बर्डीवर स्थापन झालेली सहकारी संस्था करीत आहे. नाटकाप्रमाणें लोकांना सर्कसी काढण्याचेहि अवसान चढलें, पण याचा पसारा बराच मोठा, तो पोरांसोरांना थोडाच झेपणार ? मुलें नुसत्या शारीरिक कसरती व सायकलींचे खेळ व कांहीं चेष्टायुक्त अंगविक्षेप करून दाखवीत, परंतु हत्ती घोडे कोठून आणणार ? तो भार विद्यमान रघुजी महाराज यानी उचलला व चार दिवस गंमत केली. निष्पन्न कांहींच नाही, पण खर्चांत मात्र आले. अर्थात् हा प्रकार करमणुकींत मोडतो. यांत नाटका इतकीहि बौद्धिक भूमिकेची आवश्यकता नाही. ओघाला आलें म्हणून लिहिलें.

अनुकरण म्हणूनच दुसराहि एक प्रकार इतर ठिकाणच्या प्रमाणें नागपूरच्या जीवनांत या शतकाच्या आधीपासूनच प्रविष्ट झाला व तो म्हणजे गणपत्युत्सव व मेळे. यांत कोणी अघाडी मारली हे सांगतां येत नाही, परंतु बर्डीचे सोनी वकील कवि म्हणून व पटवर्धन बंधू जुळवाजुळव करणारे म्हणून पुढे आले, तर शहरांत गणपतराव पोफळी, सायकलवाले, वगैरे पुढे आले. त्यांतल्यात्यांत प्रचालित राजकीय जागृतीचा भाग त्यांत असल्यामुळे त्याचे आरंभी मनापासून स्वागत झाले परंतु पुढे ही संस्था मुरलीधर मुळे, नारायण पेंटर, भास्कर नाटी, एक मुसलमान रंगारी अशांच्या हातांत जाऊ लागली व तिचे गंभीर स्वरूप लोपूं लागले. आमचे मित्र व कवि कै. अण्णाजी बोबडे यांनाहि तरुण वयांत यांत भाग घ्यावासा वाटला, तरी त्यांतहि त्यांच्या व्यक्तित्वाचा बौद्धिक अंशच कामी आला. ते मेळ्यांना पदे करून देत. या निमित्तानेच त्यांची काव्यप्रतिभा प्रथम अंकुरित झाली. ब्रिटिश पूर्वकाळीं व त्याच्या प्रारंभी गणपत्युत्सवाला सार्वजनिक स्वरूप नव्हते. मोठमोठ्यांच्या घरीं त्या निमित्तानें वेदघोष, कीर्तन प्रवचन किंवा फार तर थोडी आरास व्हावयाची गणपतीचे ध्यानहि शास्त्रोक्त असे. यांत

राजू चितारी, खणपट्या वस्ताद व कृष्णा कुंभार[1] यांचे मूर्ति निर्मितींत कौशल्य दिसून येई. कांहीं ब्राम्हण मंडळी स्वतःच गणपतीची मूर्ति बनविण्यांत धन्यता मानीत. राजाचा गणपति तेवढा थाटाचा असावयाचा. पुढे नाटकें आली व गणपतींतहि नटवेपणा आला. तरी पारंपरिक कुटुंबे आपापल्या पुरते भक्तियुक्त अन्तःकरणाने गणेशोत्सव करीत.

पुढें अधिक शान्तता व सुबत्ता लाभूं लागली व्यापाऱ्यांच्या जवळ पैसा झाला व त्यांनी आपले अवडंबर दाखविण्याला सुरुवात् केली. मंगळवारींतील रामण्णा गांडली या क्षेत्रांत पुढे सरसावले. रावसाहेब कतानानाहि आपली श्रीमंती व भक्तीचा डौल दाखवावासा वाटला, मग जयीसाव[1] कोष्टी तरी मागे कां रहावा ! जयराम[2] तेल्यालाहि वाटलें कीं, मी कांही कमी नाही. हे होत असतां कै. लो. टिळकांची या उत्सवाचा लोक जागृतिकडे उपयोग करण्याची मोहीम उद्‌भवली. बर्डीवरील सोनी व पटवर्धन बंधू पुढें सरसावले, तर शहरातील सायकलवाले भय्याजी पोफळी व इतरहि उत्साही मंडळी व विद्यार्थीमंडळे पुढे आलीं. जाळीच्या खोदकामाचें कौशल्य चितारी दाखवू लागले तर त्यांचेच अनुकरण विद्यार्थीहि करूं लागले. ताबूतां करितां जाळी खोदणारे होतेच. प्रथम सुशिक्षितांनी मेळे काढले व प्रासंगिक काव्यहि निर्माण झालें. प्रचलित राजकीय व सामाजिक विषयांची व्यंग्य चित्रें पद्यांत गोवलीं गेलीं. पण आसुरी संपत्तीच्या मानवाने कोणत्या सत्कल्पनेचें खोबरें केलें नाहीं ? मांगल्य व बुद्धि यांचा वंक्रतुड याने, भक्तांनी पाठ फिरविल्यावर, आपलें आधीच वांकडे असलेले तोंड अधिक वाकडे केलें व मुरलीधर मुळे, प्रभृतीकडे मेळ्यांचे नेतृत्व गेलें. प्रसिद्ध वक्त्यांची वक्तृत्व व उपदेशपूर्ण

१ हे ८० ते १०० वर्षा पूर्वीचे मातीच्या मूर्ती करणारे धंदेवाईक कारागीर होत. कृष्णा कुंभारानें तर नानासाहेब अहेरराव व रामण्णा गांडली यांची हुबेहूब मातीची चित्रें केली होती. इतर प्रेक्षणीय चित्रांचाहि त्याचा संच असे. १८०९ मधील आणखी एका कारागिराचा उल्लेख सांपडतो. तो म्हणजे राजाकडील हिऱ्याचे रामपंचायतन करणारा मोतीराम, गौड ब्राम्हण याला पिंपळखुटे त. उमरेड हा गाव इनाम होता. (आधार-लंडन लायब्ररी)

१ ही मंगळवारींत राहणारा सावकार होय. २ इतवारीतील व्यापारी.

भाषणे, सदभिरुचीला पोषक अशी चर्चा यांचा लोप होऊन तमाशा सुरू झाला. घरंदाज धनिक वर्ग तर नाहीसाच होत चालला आहे. हुल्लडबाजी व छानशौकी यांत ज्यांची रति आहे असे लोक पुढे आले व त्यांनी आपल्या कल्पने प्रमाणें गणपतीलाच चित्रविचित्र सोंगे घेण्याची सक्ती केली. बिचाऱ्या गणेशाला आपलें ध्यान, परिवार, वाहन व वर्ण यांचे दरवर्षी पालटणारे रूप धारण करावे लागत आहे. मोहरमा पासून हिंदूंनी परावृत्त व्हावे म्हणून गणपतींत वाघ होण्याकडे दुर्लक्ष्य केले तर वाघाची सोंगे छातीवरच बसली. रघूजी महाराजांनी आपल्या चालतीच्या काळांत एक 'आखडपख्या' (भाद्रपद-कृष्णपक्ष) चांगला ६ फूट उंचीचा व तीन चार हात रुंदीचा खणपट्या वस्तादकडून गणपति करविला व त्याची आकर्षक छबीन्यात स्थापना केली. त्याच्यावर मोलाचे साज चढविले. नर्तकीहि नाचू लागल्या. सुंदर आरास, दिव्यांचा झगझगाट व शिपाई प्याद्यांचे कडक इस्तरीचे खाकी कपडे, हातांतील बंदूका वगैरे इतमामावर भाळून 'तमासबीन' प्रेक्षक जाऊ लागले. पण तें ऐश्वर्य लोपलें व एक दिवस सतत ५० वर्षे एकाच ठिकाणीं मोदक खात बसलेल्या त्या विशाल मूर्तीसहि पाऊल फुटले व जवळच जलसमाधी घेणें भाग पडले.

गावांत आतांहि मुलें क्लब वगैरे सारखी संघटना करून पैसे गोळा करतात, मूर्ति आणतात व नकला, नाटकें, जमल्यास मेळा, काव्य गायन क्वाचित परिसंवाद व लाजेकाजेस्तव एखाद दुसरें सामान्य व्याख्यान कार्यक्रमांत ठेवतात. परंतु पुष्कळदां थिल्लरपणाच्या पार्श्व संगीतात किंवा चहा-चिवडा व सिगारेट यांच्या यज्ञ कुंडातच पैशाची आहुती टाकतात. लोकमान्य गेले व लोक जागृतीचे स्पृहणीय कार्यहि गेलें. लोकांनाच जेथें अवदसा आठवते, तेथें सार्वजनिक वृत्त पत्रीय टीकेचे शस्त्र बोथट ठरल्यास आश्चर्य काय? समाजाच्या धारणे करितां वैयक्तिक मोक्षाची पद्धति टाकाऊ आहे म्हणून त्यावर टीकेची झोड उठली व राष्ट्रीयत्व स्थानापन्न होऊं लागलें. त्यागावर आधारलेल्या राष्ट्रीय चळवळीचे रूपांतर भोगांत झाले, स्वातंत्र्य झाल्यापासून मतमतांतरे, वैयक्तिक हर्षामर्ष, अधिकार प्राप्तीची लालसा व स्पर्धा व भौतिक सुखाची पाठशिवणी सुरू झाल्यामुळें

गणेशोत्सवासारख्या उत्सवांचे धार्मिक स्वरूपहि गेलें व राष्ट्रीयत्वहि अंतरले शद्बांचे पिष्टपेषण व बहिर्मुख झालेल्या वृत्ती तेवढ्या फोफावल्या आहेत.

भाग ७ वा

सामाजिक जीवन

मल्लविद्या

सहजगत्या नागपूरच्या लोकांना असें वाटत आले आहे कीं, आपल्यांत कांही रग असून ती आपण प्रसंग विशेषीं दाखवूं शकतो. याची उदाहरणें अगदीं आपल्या डोळ्या समोर घडलीं आहेत. १९२७ चा हिंदुमुसलमान दंगा, कर्नलबागचे आपपासांतील वैमनस्य, १९४२ सालची राजकीय दंगल किंवा १९४८ चा जातीय प्रकोप, ही त्यांची प्रत्यंतरें होत. या गोष्टी समाजाच्या खालच्या पातळीतून उद्भूत झाल्या, म्हणून जरी क्षणभर सोडून दिल्या तरी सुरत कांग्रेसच्या वेळची राष्ट्रीय पक्षाची विजिगीषा किंवा तत्पूर्वीचा टाऊन हालच्या आंतील व बाहेरील संक्षोभ लक्षांत घेतां, सुशिक्षितांतहि उपरोक्त वृत्तीचे पडसाद पडलेले आढळतात

याचे मूळ कोठें तरी शोधिले पाहिजे, कारण तें नागपूरचे आज पावेंतों वैशिष्ट्य मानले गेलें आहे. गोंडाच्या तिरंदाजीत त्याचें बीज पाहूं गेल्यास, ती ऐतिहासिक चूक होईल. अर्थात त्याचें मूळ मराठ्यांच्या तळपत्या तलवारींत, सुतीक्ष्ण भाल्यांत किंवा तत्पोषक व्यायाम पद्धतींत अथवा लष्करी शिक्षण प्रणालींत शोधावे लागते. तें करीत असतां विक्राळ वाघाच्या जबड्यांतून शाहूचे प्राण वाचाविणारा आद्य रघूजी डोळ्या समोर दिसूं लागतो. तसेच त्याचे कर्नाटकांतील पराक्रम मनश्चक्षू पुढे उभे राहतात. रघूजीच काय, त्याचा मुलगा जानोजी हाहि बंगालच्या मोहिमेवर गेलेला आहे. जानोजीच्या दैनंदिनी संबंधी तर असें वाचावयास मिळतें कीं, तो उजाडण्यापूर्वीं ४ घटका आधीं उठून शरीरशुद्धि झाल्यावर कुस्ती वगैरे करीत असे. मुधोजीला तर लष्करी शिक्षण मिळाल्याचा स्पष्ट

उल्लेख आहे. १७९९ मध्यें मेहदीबागकडे कुस्त्यांचे फड होत असल्याचे कोलब्रूकहि लिहितो. द्वितीय रघूजीच्या दिनचर्येवरूनहि हीच गोष्ट सिद्ध होते. चिमणाबापूमध्यें अचाट शारीरिक सामर्थ्य असल्याचा समज तर होताच, पण १८९२ चें नागपूरचे नीरजोल्लास मासिक व पोवाडे, हेहि तीच साक्ष देतात. गोंडराजे व अहेरराव यांच्या आपसांतील बलपरीक्षेच्या कथा, गणपति दांडग्याचा[१] दांडगेपणा इत्यादि गोष्टी वृद्धांच्या कानावरून गेल्या आहेत. तृतीय रघूजीच्या कुस्त्यांच्या शौकाबद्दल तर त्याला रेसिडेन्टने ठपकाच दिला आहे.

व्यायामाचा नाद राजांना एवढा, तर सरदारांचा किति असला पाहिजे? आणि सरदारांचा जर हा जोम, तर त्यांचे अनुयायी, आश्रित व शिपाई हे किती जोरदार असतील ? कारण, निदान कुस्तीचा शौक तरी केवळ वैयक्तिक स्वरूपाचा असूं शकत नाहीं ? पुनः "यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्त देवेतरोजनः" हें आहेच. वाचकानें नागपुरातील कोणत्याहि सरदार मानकऱ्याचे नांव घ्यावे आणि आम्हाला बहुतेक बिनचूक सांगता येईल कीं, त्याचेकडे तालीम ही होतीच. मोठमोठे लोक स्वतःची तालीम सोडून दुसरीकडे कसे जातील ? तें मोठ्यांच्या कौटुंबिक जीवनाचे तें एक अंगच असे. जेवढें देवघराचें महत्व, तेवढेंच लाल मातीच्या आखाड्यानें पूर्वी महत्व असें, किंबहुना कांकणभर अधिकच. तो एक प्रकारें सांघिक व्यायाम होय. महालाकडे किल्याचा आखाडा, अहेररावचा आखाडा, राजे लक्ष्मणरावचा आखाडा व यशवंतराव गुजरांचा आखाडा हे मोठ्यांचे आखाडे, तर शिंदे वस्ताद, गनी वस्ताद, शिवराम गुरूंचा व दंगूमिया या वस्तादांचे आखाडे हे सार्वजनिक आखाडे होत. जागेश्वर मंदिराजवळील तनसुख वस्तादचा आखाडा, मस्कासाथीतला लखमाचा आखाडा, बुधवारीतील निंबाळकर व बागल या रिसालदारांचे आखाडे, हे निदान दीडदीडशे वर्षांचे जुने आखाडे होत. १८९९ च्या नागपूरच्या लुटीत कांहीं वस्तादांना सरकारनें धारेवर धरले

१ हा गृहस्थ सिटीस्कूलचें सुपरिन्टेन्डेन्ट जेथें राहतात तेथें राहात असे. लेखकाने याच्या वृद्ध मुलीची व कै. आत्माराम भगवंत घाडगे वकील यांची या बाबतींत गाठ घेतली होती. त्याची तलवार लहान वाड्यांत आहे.

होते व कांहींना पुंड म्हणून काळे फेटे दिले होते. तेव्हा पासून जुन्या वस्तादांना वाईट वाटले व त्यांनी वस्तादगिरीकडे दुर्लक्ष केलें. या नंतर स्वदेशी चळवळीच्या काळांत सरकारची आखाड्यांवर, विशेषतः गदगाफरी, दांडपट्टा इ. मर्दानी खेळ खेळणाऱ्या सुशिक्षित तरुणांच्या संघावर, वक्रदृष्टि फिरली. यामुळे सुशिक्षितांचे कांहीं दिवस मनस्तापांत गेले. पुढे १९१५ ते १९१८ या काळांत नागपूर व्यायामशाळा, काह्नते-गोखले व्यायामशाळा व भारत आखाडा या सुशिक्षितांच्या संघटना अस्तित्वांत आल्या. तेथें मर्दानी खेळांवर जोर देण्यांत आला व दत्तोपंत मारुळकर, अण्णा सोहनी यांच्या सारखे शिक्षक यवतमाळ किंवा उमरावती येथील मतप्राणाली व कसब, हे दोन्ही घेऊन तेथें आले. त्यापूर्वी नागपूरांत या कलेंत वस्ताद लक्ष्मणसिंग व वख्तावरसिंग ही मंडळी प्रमुख होती. ओडीसाच्या संघर्षात खांडाइतांचा उल्लेख सापडतो. त्या पैकींहि कांहीं येथें आले असावे, कारण येथेंहि कांहीं खांडे, व त्यांवर सुवर्णाक्षरांनी खोदलेली नावे आमच्या पाहण्यांत आली आहेत. वरील वस्तादांचे डॉ. ल. वा. परांजपे, सर कृष्णाजी कुकडे व थोडे मागाहूनचे बॅ. गोविंदराव देशमुख वगैरे मंडळी शिष्य वर्गापैकीं होय. १८९० मध्यें आवळे हेडमास्तरांच्या स्मरणार्थ सिटीस्कूलमध्येंहि आखाडा काढण्यांत आला.

जानोजी महाराजांना कुस्ती पेक्षा दांडपट्टा, बिनोट[२] इ. चा विशेष शौक असे. कै. राजे लक्ष्मणराव हे स्वतःच्या आखाड्यातच तयार झाले होते. त्यांना तीन तीन पहिलवानांचा 'दम' करून देण्याची पात्रता असे म्हणतात. त्यांनी दोन पहिलवान दोन खांद्यावर व एक मानेवर, असे तीन पहिलवान घेऊन उभे राहिल्याचे चित्र कित्येकांनी म्युनिसिपालिटीच्या कोपऱ्यावरील विड्याच्या दुकानांत पाहिले असेल. त्या राजे लक्ष्मणरावाच्या आखाड्यांतील माती खोदण्याचे पावडेच तेथील पहिलवानांच्या शक्तीची साक्ष देते. सामान्य मनुष्य कोणी तसले ५ फावडे मारील तर आम्ही धन्य

१ उदाहरणार्थ जामदारांकडे असा एक खांडा आहे. दोन्ही बाजूनी धार असणारे पट्ट्या सारखें शस्त्र.

२ बिनोटः— निःशस्त्र स्थितींत सशस्त्र आक्रमकापासून आत्मरक्षण करण्याची कला. पहा व्यायाम कोश.

समजूं कांही मोठ्या लोकांना भरधाव घोड्यावरची लांबची रपेट मारण्याचा शौक असे ही गोष्ट तर आम्ही आपल्या समवयस्कांत पाहिली आहे, तर जुन्या लोकांचे सोडूनच द्या. आजच्या पिढीस या शौकाची कल्पना हल्लीच्या मोटारीच्या युगांत आम्ही कशी द्यावी ? फार तर झाशीची राणी हा चित्रपट पाहा म्हणून सांगू.

नागपूरांत सार्वजनिक आखाड्यांची संख्या एके काळीं १०० सहज भरत असे आता शहर पांच पट तरी वाढले. उलट आखाड्याची संख्या मात्र ६ झाली. प्रत्येक आखाड्यांतून कमीत कमी ५० मंडळी धरल्यास, पूर्वी कुस्तीचा शौक करणारे ५ हजार तरुण निघणें कांहीं मोठी गोष्ट नव्हती. या शिवाय शास्त्री, पंडित, वैदिक, प्रातिष्ठित ब्राम्हण व व्यापारी यांना घरींच मुद्गल, जोडी व करेले फेरणें, दंड बैठका काढणें, नमस्कार घालणे वगैरेचा नित्य नाद असे.

आखाड्यांत हिंदु मुसलमान, श्रीमंत गरीब हा भेद नसे. तेथें समानता व्यासपीठा पुरती नसून ती आचरणांत असे. तरी मुसलमानांचे त्यांच्या वेटाळांत स्वतंत्र आखाडे असत व त्यांचा बोलबालाहि असे. राजाकडेच पोषावि पहिलवान पुष्कळदां मुसलमान असत. आप्पासाहेब भोसल्याच्या वेळीं नागपुरास आलेला एक सिद्दी पहिलवान होता. व तो श्रीमंत तात्यासाहेब गुजर यांचेकडे असे. तो १२८ वर्षांचा होऊन वारला. याचा समकालीन एक त्रिफळे भटजी म्हणून शक्तिमान पुरुष होता. त्याचे विषयीं कै. यादवराव जामदारांनी गोष्ट सांगितली, ती अशी. एकदां बाहेर गांवावरून एक पंजाबी पहिलवान कुस्ती लढण्याकरितां तृतीय रघुजीच्या वेळीं आला. त्याच्याशीं लढण्याची कोणीच हिंम्मत करीना तेव्हां राज्याची अब्रू न जावी म्हणून भटजीला पकडून आणले. भटजी सार्वजनिक ठिकाणीं लाल मातींत कुस्ती करण्यास तयार नव्हता. तेव्हां वाड्यातच कुस्ती झाली. भटजींने धोतराचाच काचा मारला. कारण लंगोट बांधणे त्याच्या वृत्तीमुळे त्याला शिष्ट पणाचे वाटलें नाहीं. भटजींनी पहिलवानाला खाली आणून पेटी कसली, तों पहिलवानाची जीभ बाहेर येऊ लागली. पहिलवानाने शरण चिठ्ठी दिली. राजा खूष झाला व भटजीच्या अंगावर त्यानें गोफ

फेकला. तो त्यानें पराजित पहिलवानाच्या गळ्यांत घातला व हातावर थोडीशी दाक्षिणा घेऊन चालता झाला. याला म्हणतात शील व शील रक्षण !

त्रिफळे भटजी नंतर ज्याचें नांव ७०-८० वर्षांपूर्वी सर्वतोमुखीं झालें होतें, असे गृहस्थ म्हणजे शिवराम गुरु हे होत. यांचे गुरु जानबा वस्ताद, म्हणून असत. गुरु कधीं मैदानांत कुस्ती खेळले नाहीत. होय, नव्हे, स्वतःची तालीम. यांचा पोटाचा धंदा भिक्षुकीचा असे. प्रसिद्ध दद्दा पहिलवान[1] हा गुरुंचा पट्टशिष्यांपैकीं एक महत्वाचा शिष्य होय. कै. गोविंदराव इंदूरकर[2] (सुंदर पुरुष) हेहि गुरूंच्या प्रिय शिष्यांपैकीं एक होत. त्यांचे विद्यागुरु, मात्र निळोपंत नाना असत व स्वतः निळोपंत हे उत्तम मल्लहि असत. भंडाऱ्याचे प्रसिद्ध वयस्क वकील श्री. विनायकराव कोलते व त्यांच्याच वयाचे ह. भ. प. दाजी शास्त्री चांदेकर हे गुरूंच्या अंगावर लढत घेणारांपैकीं होत. गुरुंच्या आवारांत अड्डुलवार नांवाचे एक समर्थ भक्त राहत असत. तेहि गुरुंचेच शिष्य होत. कै. पंढरीनाथ शास्त्री, दाऱ्हव्याचे कै. माधवराव डाऊ, वर्ध्यांचे वकील मोरेश्वरराव कोलते, कै. खडाखडी, कै. बापु आपाजी इत्यादि मंडळी तेव्हांची प्रसिद्ध अशी कुस्तीची शौकी मंडळी होय. गुरुजींत मल्लविद्ये-व्यतिरिक्त इतरहि मोठे मोहक गुण असत, ते मोठे चतुरस्त्र, विनोदी, प्रसंगावधानी, उत्साहि व निर्लोभी गृहस्थ असत.

त्यावेळची इतर पाईलवान मंडळी म्हणजे उल्लीशा बुरड, महाजन शिंपी, मौलाबक्ष, शेखअहमद, दादासाहेब अहेरराव, बनाशा इत्यादि होत. दद्दा पहिलवान, अमीरामिया व ईश्वरसिंग यांना उत्तम रीतीनें पाहिलेल्यापैकीं बॅ. देशमुख व ह. भ. प. दाजीशास्त्री हे होत. अलीगडचा दयाराम पहिलवान (कामठी) यानें कलकत्यास गुंगा व टाटा नगरास गामाचा पठ्ठा कमरुद्दिन

---

१ मुसलमान-रंगारी, तेव्हांचा तो सर्वांत उंच माणूस समजला जाई. मृत्यु १९०८.

२ श्री कृष्णराव इंदूरकर, निवृत्त डी. डी. एस्. पी. नागपूर यांचे वडिल कै. गोविंदराव हे प्रॉसिक्युटिंग सबइन्स्पेक्टर असत.

यांचेशी लढून यश मिळविले. नागपूर प्रमाणें इतराहि या प्रांतातील महत्वाच्या गावी आखाडे असत. पण त्या सर्वांत नागपूरचे नांव नेहमीच पुढें राहिलें. पहिलवानाचा खुराक, त्याची मालिश वगैरे गोष्टींची कल्पनाहि हल्लीच्या मंडळीस नाहीं व स्थलमर्यादेमुळें त्याविषयी सांगताहि येत नाहीं. कुस्ती ही एक कलाच नसून, ती एक संघटनेचे साधनहि आहे. राष्ट्रीय धन म्हणून तर मल्लांचे महत्व आहेच. नागपूरच्या हिंदुमुसलमानांच्या तेढीची समस्या यशस्वी रीतीनें सोडविणारे आमचे धोंडबाजी वस्ताद, उदारामजी पहिलवान व मयारामजी पहिलवान हेच होत. त्यांचा शिष्य वर्ग म्हणजे जिवास जीव देणारा वर्ग असतो या संघटनेचे तेज कायम टिकविण्यांत विद्यमान रघूजी महाराज यांना बरेच श्रेय आहे, त्यांनी त्या पायीं बरेंच धनहि वेंचले, आणि त्याचा अप्रत्यक्ष उपयोग कै. डॉ. मुंजे, बॅ. गोविंदराव देशमुख प्रभृती तेव्हांच्या पुढाऱ्यांस झाला. पहिलवानाना मार्गदर्शक मात्र केव्हांहि हवेत, नाहीं तर त्यांचा दुरुपयोगहि होण्याची तेवढीच भीति असते. या दृष्टीनें संत तुकडोजी महाराज नामदार दीनदयाल गुप्त व श्री. गोपाळराव पाठक हे अभिनंदनास पात्र आहेत.

नागपुरांत जेठीची[1] कुस्ती एके काळीं प्रसिद्ध असे. याची माहिती फक्त कै. यादवराव जामदारच सांगू शकले व त्याचे प्रत्यंतर कोलब्रुकच्या दैनंदिनीत व व्यायाम कोशांतहि मिळाले. कोलब्रुक म्हणतो 'A few matches were wrestled by men of inferior note. The Jetties (Boxers in Raja's Service.) natives of Carnat above ghats who wrestled box with leshis (i.e. Brajra muth or thunder first.) did not exhibit on this occasion." हे जेठी अण्णासाहेब उपाध्यांच्या वाड्याजवळ असत. ते पुढे बडोद्यास गेले. तसेच मोहरमांत हातांत वाघनखे घालून किंवा हरणाची शिंगे धरून नाचण्याचा प्रकार आहे. याला माडूची कुस्ती म्हणतात. विठ्ठलराव वाघनखे नांवाचे मंगळवारीत एक गृहस्थ असत.

---

१ या विषयावर व्यायाम कोशांत पुरेशी माहिती दिली आहे. कुस्ती, जपानी जूजुत्सू व युरोपिअन बॉक्सिग यांचे यांत मिश्रण आहे.

हल्लींचे श्री. लालूभाऊ गाडगीळ वकील, श्री. अण्णासाहेब सोहनी, श्री, दत्तोपंत मारुळकर, श्री. चिंतामणराव दौंड व आमचे परममित्र कै. अण्णासाहेब खोत यांना विशेषतः मर्दानी खेळांचे पुनरुज्जीवन करण्याचे श्रेय आहे. आतां राजघराणे व सरदार यांची जबाबदारी संपली. नागपुरांत मल्लखांबाला महत्व नसे. सगळा भर कुस्तीवर–३० वर्षां पूर्वी अनंतराम गुरु व नारायण गुरु यांनी वेतावरील मलखांब वगैरे दाखऊन तरुणांचे मलखांबाकडे लक्ष्य वेधले, पण त्या कलेने येथें मूळ धरलें नाही. ज्यांत वेळ व द्रव्य यांचा विपुल खर्च होतो असे. क्रिकेट इ. पाश्चात्य खेळ आहेत, पण शरीरांत रग किंवा पीळ हवा असेल किंवा कांहीं प्रसंग विशेषी आक्रमक वृत्ति दाखविण्याची आवश्यकता भासली तर कुस्ती हे एक परंपरागत महत्वाचें साधन आपल्यांत आहे.

धर्मशाळा, पाणी व पाणवठे

हल्ली धर्म शाळांना फारसें महत्व उरलें नाही. याचे मुख्य कारण हें की, जाति निर्बंध पूर्वींच्या मानानें बरेच शिथिल झाले आहेत. आतां हॉटेलांतून हवें तें व हवें तेव्हां खाण्यास प्रत्यवाय नाही. पुन्हां वाहतुकीची साधनेहि पूर्वी पेक्षां वेगाची झाल्यामुळें परगांवच्या लोकांना एका गाडीने किंवा मोटारीने येऊन लगेच दुसऱ्या सोयीच्या गाडी मोटारीनें परतणें पुष्कळ अंशीं शक्य झालें आहे. पूर्वीं सुबत्ताहि इतकी होती कीं कोणी पाहुणा आल्यास सलत नसे. ज्याला सोयच नसे तो मात्र धर्मशाळेंत उतरून स्वैपाकपाणी करून आपल्या कामाला रुजू होई. एके काळीं खंडोबाचे देऊळ, रुक्मिणी मन्दिर, बगडगंजातील सराय, एंप्रेसमिल जवळील राजाराम दीक्षित सराय, बर्डीवरील बुटी सराय, व संगमावरील केवलराम पांडची सराय इत्यादि धर्मशाळा असत. त्या सर्व धर्मशाळा आता बंद पडल्या. नाहीं तर पूर्वीं धर्मशाळा बांधण्यांत पुण्य समजले जाई. उत्तर हिन्दुस्थानांत अजूनहि मोठमोठ्या धर्मशाळा चालू आहेत. येथे १९१५ मध्ये अस्तित्वांत आलेली जम्नादासची सराय चालू आहे. वाईकरांचे मूळपुरुष बापुजी वाईकर हे राज्य असतां येथें आलें, तेव्हा खंडोबाचे

देवळांत उतरले होते रुक्मिणी मंदिरांत मात्र बहुधा काशीकडचे किंवा पुण्या वाईकडचे प्रतिष्ठित वैदिक उतरत.

पूर्वी नागपुरांत अनेक तळीं असत. पिण्याच्या पाण्याची नागपुरला नेहमीच टंचाई भासत राहिली. एकेकाळीं लोक शुक्रवार तळ्याचे पाणी पीत तेथून हकीम बुनियाद हुसेन यांच्या वाड्यांत नेलेला जुन्या पद्धतीचा नळ असे व तो पुढे इतवारीतील मीठगंजाच्या टाक्या पर्यंत गेलेला दिसतो. जुन्या नळांनी खापरांचे नळ म्हणत. परंतु मराठ्यांच्याच आमदनींत शुक्रवार तळ्याचे पाणी अपुरे वाटू लागले व पुढें पुढें त्यांत घाणहि होऊं लागली: तरी तळयावर जाऊन, पाय धुवून व चूळ भरून गणपतीच्या दर्शनास मंडळी जात. भुरे कुटुंबांतील एकाचा मृत्यु अशाच निमित्तानें झालेल्यांचा उल्लेख पृ० ४ वर आला आहे. शुक्रवार तळ्यानंतर अंबाझरी तळें व फुटाळें तळें ही दोन तळीं अव्वल भोसले शाहीत अस्तित्वांत आलीं व तेथून शहरांत महाल्याकडे अनेक घरीं काळूपुऱ्यापर्यंत पाणी पुरविल्याचे पुरावे मिळाले व अजूनहिं त्या पद्धतीचे २-३ अवशेष कायम आहेत. तरी सामान्य माणसांची गरज शहरांतील गोड पाण्याच्या खास विहिरी भागवीत असत. रुक्मिणी मंदिरातील विहीर, टाळप्याची विहीर हळद्यांची विहीर या त्या खास विहिरी होत. इतवारींत मात्र अडचण होती. तरी तेथेहि कांहीं विहिरी पिण्याच्या पाण्याकरिता प्रसिद्ध असत. एकेकाळीं नागपुरांत १५०० विहिरी होत्या. या शिवाय शहरा जवळच्या वाड्यांत व बागांत अनेक मोठमोठ्या बावल्या व विहिरी होत्या. त्यामुळें एकंदर वापरण्यांच्या पाण्याची केव्हांहि टंचाई नसे. या शिवाय लेंडी तलाव, (हल्लीच्या सेन्ट्रल रोडचे उद्यान) इतवारीच्या अखेर उत्तरेच्या बाजूला असलेले दुसरें लेंडी तलाव, नायकांचे तळें, शुक्रवार तळें, बर्डीवरील संगम, फार काय नागनदी व अयाचित नाला येथेंहि कांहीं लोक स्नाने करीत, पोहत किंवा कपडे धूत. नागपुरांत १८७३ मध्यें नळ सुरू झाले व जिकडे तिकडे प्रसन्नता वाटली नळ २४ तास चालत व नागनदी व नाले यांतून मोकळेपणानें सांडपाणी वाहात असे व घाणीचे नांव नसे. वस्ती वाढत चालली जलाशयहि वाढत चालले व शेवटीं कन्हान योजनाहि आली परंतु पाण्याची टंचाई मात्र फार भासते, हें सर्वांस माहीत आहे. गटरमुळें तर आणखी अडचणींत भर पडली. पुण्याला पेशवाईत जसे पेठे पेठेंतून हौद असत व

खडकवासल्याच्या तळयावरून नहराने पाणी खेळाविले होते, तशी योजना नागपुरास सिद्धीला गेली नाहीं, तरी हौद नव्हतेच असें नाहीं. उदाहरणार्थ, गोलबंगल्यांत हौद होते. घाटग्यांचे टाकें होतें. मीठगंजाचेंहि पण होतें.

गोरक्षण

जिला ' गोरक्षण ' म्हणतात ती संस्था १८८७ मध्यें म्हणजे ब्रिटिश आमदनींत स्थापन करण्यांत आली. भोसले शाहींत ती निघण्याचें कारण नव्हते, इंग्रज शिपायांना गोमांस हवे होते आणि म्हणून जिकडे तिकडे ब्रिटिश आमदनींत कसाई खाने निघाले व गोहत्या होऊं लागली. भोसले राज्यांत गोवधास बंदी असे. जेन्किन्स म्हणतो; "It is the killing of bief in His Highness's teritories which is generally forbidden under several penalties"[1] कै. रा. ब. नारायणस्वामी नायडू, कै. गोपाळराव भिडे इ. गोरक्षण संस्थेचे मूळ उत्पादक होत. गोरक्षणाचे निःसीम भक्त शेठ शिवनारायण राठी हे पुष्कळांस आठवत असतील. संस्थेचे विशेष तपशील येथे देता येत नसले, तरी एवढी गोष्ट मात्र खरी कीं, संस्था स्थापन होऊन ६६ वर्षे झालीं. तथापि गोमांस भक्षक डेन्मार्क इ. जे युरोपातील देश आहेत, त्यांचे मानाने आपण गाईला देवता समजत असूनहि इतर बाबी-प्रमाणें गोसंवर्धनाच्या बाबींतहि आपण निकृष्ट स्थितींत आहोत. आपण पाश्चात्य शिक्षण घेतलें, पण पाश्चात्य कर्तृत्व मात्र घेतलें नाहीं पारतंत्र्यामुळेहि प्रगति खुंटली असेल पण आतां तरी सावरलें पाहिजे. गाईला गंधफुल वाहून किंवा प्रदक्षिणा घालून कांहीं साधणार नाही.

व्यापार व उद्योगधंदे

भोसलेशाहींत वस्त्रोत्पादन कोष्टी व महार करीत. मोमीन मागाहून आलेले दिसतात. महारांना मठे म्हणत. सिरस पेठेवर त्यांची ४०० घरें होती चोलेपागोटे, दुपट्टे हात रुमाल, भैरव नावाचे रखरखीत कापड, दोरवा

१ पहा जेन्किन्सने क्लोजला लिहिलेलें पत्र क्र. १६ दि. ४-१२-१८०९ नागपूर रेसिडेन्सी रेकॉर्ड भाग २.

(चौखनी, शिल्लेखानी बंगाली असे प्रकार असत) गाशाचे पुरम[१] नांवाचे कापड, हे प्रकार महार करीत तर रेशीमकाठी धोतरजोडया, खण व बचकन्या, पितांबर, पैठण्या हा माल नागपूर उमरेड, ब्रम्हपुरी चांदा पौनी इत्यादि ठिकाणीं होई. 'The articles of Comomon clothing of pearants are made in almost every district' असें जेकिन्स म्हणतो. दुसऱ्या मराठा युद्धा नंतर (१८०३) महाराष्ट्रांत दुष्काळ पडला, तेव्हां द्वितीय रघूजींचें वेळीं पैठण, बऱ्हाणपूर, जैनाबाद येथून पुष्कळ कोष्टी कुटुंबे इकडे आलीं. पूर्वी नागपूरवरून १४ लक्ष रुपयांचे कापड पुण्यास जात असे. पेशवा बिठूरला गेल्यावर हें प्रमाण १½ लक्षावर आले. साखर, किराणा, उंची रेशमी कापड, किनखाब, मस्त्रू इ. माल उत्तरेतून येई. उत्तरेंतील व्यापार गोसाव्यांच्या स्वाधीन असे व ते कटक पर्यंत मालाची ने आण करीत. धान्याचा व्यापार छत्तीसगड पासून उमरावतीपर्यंत चाले व मीठ वऱ्हाडात जरी १० ठिकाणीं तुरळक होत असले तरी चिन्नूर मार्गानें विजयागडवरून व पुणे मार्गानें कोंकणातूनहि येई. त्यावेळीं नागपुरांत ५० लक्षांच्या हुंड्या निघत. जुन्या सावकारी पेढ्यापैकीं तिमाजी नाईक काळे व व्यंकाजी पिदडी यांच्या पेढ्या प्रमुख होत. तसेच रतनपाल, स्वरुपचंद, सुलतानमल व गोपाळदास या मारवाडयांचाहि १८१३ त औरंगाबादकरच्या लिखाणांत उल्लेख सांपडतो. (आधार इंडिआ ऑफीस लायब्ररी) तसेच नाथूनाईक, अमृत नाईक, गंगू नाईक असे मोठमोठे मिठाचे वंजारे होते. बाजारगावच्या उदम्यांजवळ दोन दोन हजार बैल असत. आपणापैकीं कांहींच्या कानावर असलेले धारसकर, तुळसकर, अग्याराम मारवाडी हे मागाहूनचे सावकार होत. रेलवे आली (१८६६) एंप्रेस मिल झाली (१८७७) बांडेड वेअर हाऊस (बांडीहौस) झाले आणि व्यापाराला नवीनच वळण मिळाले. तरी हिंगनघाट मिल बरीच जुनी. हिंगनघाटच्या कापसाचा उल्लेख १८१३ त सापडतो. नागपुरांत रुई व कापसाचाहि व्यापार मोठ्या प्रमाणांत होई.

---

१ पुरमशेट्टी हे आडनांव पुरम कापडाचा व्यापार करण्यामुळें पडलें असावें.

स्वदेशी मिल, (१८८८) व आईस फॅक्टरी हे स्थानिक आधुनिक प्रयत्न होत. आईस फॅक्टरी १९०५ त जळाली व स्वदेशी मिल १९१२ साली एंप्रेस मिलकडे गेली. वीज कंपनी १९०९ त झाली. कोष्टीवस्त्र भांडार नागपूर पायोनिअर इन्शुरन्स, खापरखेडा वीट कारखाना, काळ्यांची सी. पी. इंजिनिअरिंग, अमृत क्षेत्र डेअरी यांची कशी बोळवण झाली, हें प्रौढांस माहीत आहे. हल्लीं जे कारखाने दिसतात, त्यांचे नेतृत्व स्थानिक मंडळीकडे नाही. फक्त मध्यप्रदेश को-ऑ. बँक तेवढी अपवाद आहे, पण तिजवर सरकारी नियंत्रण असल्यामुळें आमच्या निर्भेळ योग्यायोग्यतेचा तेवढा प्रश्न उद्भवत नाही.

फत्तरफोडच्या आखाडयाकडे औरंगाबादवरून आणलेले मोठमोठे मुसलमान कारागीर असत. आधुनिक काळांत ते लोपले. बाणांचे कारखानेहि काळाच्या उदरांत गडप झाले. सकरदऱ्यावर तोफा ढाळीत, त्यांचेहि प्रयोजन नाहींसे झालें. आतशबाजी दारिद्र्यामुळे लोपली व त्याचे कारागीरहि गेले भोवतालचे विस्तीर्ण बागबगीचे व वाडया शहर विस्तारामुळें उध्वस्त झाल्या. आतां जरा लांबून भाजीपाला येतो. पूर्वीची वाहने गेली, व ते बनाविणारहि गेले. रुचि बदलली व क्रयशक्तिहि कमी झाली. त्यामुळें कोष्टयांची कला लोपली. उत्पादनाच्या साधनांतहि रूपान्तर झाल्यामुळें जुने बरेच व्यापार व धंदे बसले. हल्लीं नवीन मनु व नवीन सुधारणा, समाज घटनाहि नवीन व सामाजिक जीवन समस्याहि नवीन आहेत.

भाग ८ वा

(ब) सामाजिक जीवन–राहणी व चालीरीति

दिनचर्या

पूर्वीच्या व हल्लीच्या दिनचर्येंत जमीनअस्मानचें अंतर पडलें आहे, हें सांगावयास नको. तरी कांहीं कुटुंबांत जुनी घाटणी थोडी फार पहावयास मिळते. मुलांप्रमाणे मुलींचेंहि शिक्षण वाढीस लागल्यामुळे प्रत्येक सामान्य स्थितीच्या सुशिक्षित कुटुंबांत घरगुती कामाची ओढाताण झाली आहे. उसन्न

पुरत नसूनहि स्त्रीपुरुषांची स्वतः कष्ट करण्याची संवय तुटत चालली आहे. पूर्वी घरांतल्या जीवनाप्रमाणें बाहेरचें जीवनहि शान्त असें. आतां संप, निदर्शनें, भडक व क्षुब्ध अशा सभा, भिन्न भिन्न प्रलोभनें शीघ्रगामी व प्रसंगीं प्राण घेऊ वाहनें, आरडाओरड, गर्दी व घाई यामुळे दैनंदिनींत स्वस्थता म्हणून राहिली नाही.

पूर्वीच्या मानाने सकाळचे उद्योग अगदीच निराळे झाले आहेत. पूर्वी उजाडण्याचे आधीं लोक उठून आपापल्यापरी उद्योगाला लागत, तर आज सुशिक्षित मनुष्य पुष्कळदां अंथरुणांत लोळत असलेला दिसतो. पूर्वी सूर्योदयापूर्वी जात्यावरची देवाची गाणीं; सडा संमार्जनांच्या वेळच्या वृद्ध स्त्रियांच्या भूपाळया, पुरुषांची प्रातःस्नाने, संध्यापूजा, अर्घ्यप्रदान किंवा प्रातःस्मरण, या गोष्टी पहावयास मिळत, तर आज त्या ऐवजी स्त्रियांच्या क्षेत्रांत चहाचा स्टोव्ह, कपबशांचा खणखणाट व पुरुषांच्या क्षेत्रांत सकाळची दाढीघोट व नंतरचे वृत्तपत्र वाचन, या अशा सकाळच्या चिंतनशील वृत्तींचा विक्षेप करणाऱ्या गोष्टी नजरेस पडतात. १८९० पावेतों या भागांत चहा ही गोष्ट ठाऊक नसे. हल्ली घराच्या आंत किंवा बाहेर पावलोपावली चहा व फराळाचीं दुकाने थाटलेलीं दिसतात. धुळाक्षरें काढावयास बाहेर पडणारी अर्भकें, शुचिर्भूत होऊन शास्त्रपठनार्थ जाणारे सुशील ब्राम्हण युवक, फडांवर उमेदवारी करितां जाणारे तरुण, स्नानोत्तर देवदर्शनार्थ जाणारी वडील मंडळी, घोड्यावर रपेट करणारे सरदार दरकदार, आखाड्यांतून लढत घेऊन डौलाने परत येणारे भरघोस पठ्ठे, यांचे ऐवजीं मिल व कारखान्यांत जाणाऱ्या मजूरांची धावपळ दृष्टीस पडते. फराळांच्या दुकानांत सकाळी कोण गर्दी ! पूर्वी सोवळें ओवळें, जात पात, घरंदाजीपणा, बौद्धिक पातळींतील तरतमभाव यामुळे फराळाचें दुकानांत जाणें दुश्चिन्ह समजलें जाई. किंबहुना दुकानेच नसत. असलीच तर एखाद दुसरी दृष्टीआड दडून बसलेली ब्राम्हणाची खाणावळ अस्तित्वांत असे. गरीब विद्यार्थ्यांना मधुकरी मिळे किंवा त्यांचे वार असत.

आदितवार दरवाजावर एकजण सोवळें नेसून चिवडा विकत असे. महालावर मुन्नालाल हलवाई फार प्रसिद्ध असे. त्याचा पेढा तर त्याच्याहूनहि प्रसिद्ध. त्याच्याहि पूर्वी त्याच्या पूर्वजाचे किंवा कोणाचे तरी दुकान प्रसिद्ध

असलें पाहिजे. कारण द्वितीय रघूजींच्या[1] वेळीं वखरे शास्त्रींच्या शिष्यांनी महालावर मिठाईची उधारी केल्यांचा उल्लेख सापडतो. इतवारींत मिठाईची दुकाने अधिक असत, कारण उत्तरीय लोकांची संख्या तिकडे अधिक. तथापि उदमी किंवा आखाड्यांत जाणारे लोक सोडले, तर कोणताहि सभ्य माणूस बाजारांत मिठाई खात नसे. ५०-६० वर्षांपूर्वी महालावर एक व बर्डीवर एक अशीं दोनच फराळाचीं दुकाने असत. हिस्लाप कॉलेजांत एकदां एक, विद्यार्थी सभेंत भाषण करीत असतां टेबलावरचे पाणी प्याला, तर प्रिन्सिपल व्हिटन साहेबाना धन्यता वाटली. ते म्हणाले "I have not lived in vain" मुसलमानांचे हिस्लाप कॉलेजच्या बाजूनें सडकेवर भटारखाने व मटनखाने असत. उघड्यावर टांगलेल्या हलाल केलेल्या बकऱ्यांच्या तंगड्या आम्ही पाहात असूं. या भटारखान्यांचे चालक घाणेरडे भदत्ती (मदक्की) असे मुसलमान असत व त्यांचे गिऱ्हाईक म्हणजे मुसलमान टांगेवाले किंवा वेश्या असत. अर्थात हें ब्रिटिशांच्या आमदनींतले जुने दृश्य होय.

नागपुरांत "२०० हत्ती, ८०० लठ्ठी व १२०० भट्टी" असल्याबद्दलची एक म्हण कानावर पडली, तेव्हां विश्वास बसेना. हत्ती संबंधी तर इंग्रज प्रवाशांचा पुरावा आहे लठ्ठी म्हणजे वेश्या व्यवसायातील स्त्रिया. अशांचे २-३ मोहल्ले आमच्या लहानपणी गजबजलेले असत. दारूच्या भट्ट्याविषयींहि शंका नाही, कारण त्या बद्दल तोंडी व लेखी दोन्ही प्रकारचा पुरावा आहे[2] पुढे हें व्यसन खालच्या थरांतून कसीकमी होऊन इंग्रजांचे अनुकरण करणाऱ्या प्रतिष्ठित व सुशिक्षित लोकांत-विशेषतः सरकारी अधिकाऱ्यांत-बोकाळलें. मध्यम वर्गीय ब्राम्हणांत क्वाचितच मद्यपी सापडतो. वैदिक ब्राम्हणांत असलेंच तर भांगेचे व्यसन असे. आखाड्यांत जाणारे बदामीच्या थंडाईत थोडी भंग घालीत. त्यामुळें तब्यत तर्र राही. निरुद्योगी मराठा मान कऱ्यांत कांही थोड्यांत दारूचें व्यसन असे खालच्या थरांच्या हिंदूंचेहि

१ १८१०-११ ची गोष्ट असावी. ती फार बोधप्रद आहे; नीरजोल्हासात दिली आहे.

२ पेशवाईत दारूची बंदी असे, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्या सारखी आहे.

मदक्कीचे अड्डे असत.[१] क्वचित् दुर्दैवी ब्राम्हणहि पाहण्यांत आले. बेकारीमुळे कांही प्रतिष्ठितांना जुव्याचेहि व्यसन जडलेलें असे. मोहित्यांचा वाडा व मनभट उपाध्यांचा वाडा, हे या दृष्टीने सोईचे असत.

सकाळच्या वेळीं माता लहान मुलांना कढीभात करून घालीत. जेवावयास वेळ असला तर मोठी मुलें सातूच्या पिठाचा 'रद्दा' चढवीत. नाही तर खारीक, गूळ खोबरें, पोहे, लाह्या, मुरमुरे, 'लाह्यवड्या,' कुटकीचे लाडूगाठीची पदकें, देऊन त्यांची समजावणी करीत. बहुधा उद्योगी मुलामुलींनी सकाळचे वेळीं शिळ्या पोळ्या व त्यावर एशेल तेल, (अलसी-जवस) पेंड (घट्ट) वरण, आंब्याचे रायते (लोणचें) या मिश्रणाचा एकदां खुराक चढविला कीं, त्यांच्या माता इतर उद्योगास मोकळ्या होत. ऐपतदारांची गोष्ट वेगळी. पुनः दुपारचे जेवण व रात्रौ ८ चे आंत एक हलकें जेवण झालें की, मुलाची निद्रेची तयारी होई. स्त्रियां व मुलें यांची तोंड दुध तुपावर विशेष नसे. घाण्याचें शुद्ध जवसाचे तेल रुचकर वाटे. १८९० पर्यंत मातीचे (रॉकेल) तेल नव्हते. त्यामुळें रात्रीं अभ्यास केलाच तर जवसाच्या तेलाच्या दिव्यावर विद्यार्थी अभ्यास करीत. बहुधा रात्र ही विश्रान्तीची व सकाळ ही अभ्यासाची वेळ समजली जाई. झोप चांगली झाल्यामुळें जाग लवकर येई व तरुण पाहटेस ४ ला उठून आखाड्यांत जात किंवा स्नान वगैरे केल्यावर शरीरास हुशारी यावी म्हणून नमस्कारादि व्यायाम घेत व यामुळें अध्ययनांत किंवा इतर कामांत एकाग्रता होई. उठल्या बसल्या चहा इत्यादि पोटांत ढोसण्याची हल्ली संवय लागल्यामुळें आधींच हीणकस व अशुद्ध अन्न व तेंहि जेमतेमच पोटांत जाणार तेव्हां शक्ति कशी यावी ?

साधारण मुलांचे खेळ म्हणजे गोळ्या, चेंडू, घनपेंड्या, गिल्ली-दांडू, खोखो, डूडू (हुतुतू) लोणपाटया (आट्यापाट्या) पतंग, घानमाकड[२]

---

१ तृतीय रघूजीची एक मुसलमान रखेली धुमनबी मदक पीत असे. मदक पिणाऱ्या इतर मुसलमान वेश्याहि आम्ही लहानपणीं पाहिल्या.

२ एक लाकडी खांब जमीनीत रोवून त्याच्यावर त्याचा खुंटा एका आडव्या लाकडांत घालावयाचा व तों तोलून ठेंऊन त्यात दोन बाजूला दोन मुले लटकून चक्कर घेणे.

(शिमग्यांतला खेळ) टिक्करबिल्ला, पावड्या (पावसाळ्यांत) हे असत. मोठी व्यवसायी मंडळी सायंकाळी आखाड्यात जात किंवा तळ्याच्या पाळीवर फिरावयास जात. नागपुरांत त्यापुढें जाण्याची सोय नसे, कारण दोन्ही बाजूंनी मोनमोठ्या अस्ताव्यस्त मातीच्या टेकड्या असत व त्यावर झाडीहि असे. ६०-७० वर्षां पूर्वीं अग्यारामच्या देवीजवळ पोलीस ठाणे ठेवावे, अशी सरकारास नागपूर म्युनिसिपल कमीटीने विनंति केली होती, कारण येथें जिवास भय असे. वडील मंडळी तळ्यावरचा गणपति, जागृतेश्वर, पाताळेश्वर व हनुमान खिडकीचा मारुती यांची दर्शनें घेत. तरुण मंडळी उशीरा घरीं आली कीं, संशय येई. कारण रात्रीं दंढार, डफबाजी व नाचरंग यांज पासून दूर राहण्याची आवश्यकता भासे. रात्रीं वाटेनें दिवे नसल्यामुळें सहसा मशाल 'काकडो' किंवा चारी बाजूंनी कांचा बसविलेल्या लांकडी कंदीलाशिवाय भागत नसे. बायकांना घरगुती कामाशिवाय दुसरा व्यायाम नसे. अल्पवयांत मुलीहि सासुरवासिनी होत. त्यामुळें त्याहि दिसत ना. त्यांचे लहानपणचें खेळ म्हणजे भराडी गौरीच्या व इतर वेळच्या फुगड्या, पिंगा वगैरे. तरी बायका घरकामामुळें काटक असत. क्वचित् मराठ्यांच्या व इतर जातींच्याहि बायका तट्टावर बसतांना दिसतात.

गेल्या शतकाच्या शेवटल्या दशकांत नाटक मंडळ्या इकडे येऊं लागल्या. येथील लोक रसिक व संपन्न असत. त्यामुळे नाटक पाहण्याचा व क्वचित् करण्याचाहि सुशिक्षितांना छंद जडला. कांहींचा त्यापायीं विद्याभ्यासहि गेला. पण एक गोष्ट झाली. वेश्यागमनापासून मन परावृत्त होऊं लागलें, हल्ली नाटकें सुटली, तर सिनेमा आले व त्याच बरोबर चहा सिगारेट व उपहारगृहे यांत लोकांचे चित्त रममाण होऊं लागलें पूर्वीं शिष्ट मंडळीत रखेल्या असत. हल्ली स्वतःच्या उदर पोषणाचीच मारामार, तेव्हां हे चोचले कोण करील ? तेव्हा लोक बाहेरख्याली असले तरी कुटुंबाची जबाबदारी बरोबर पार पाडीत. हल्लीं नीतिमूल्येंच बदलत आहेत. त्यांत. लैंगिक नीतिहि आली. रशिअन समाजरचनेच्या सिद्धान्तामुळें संतति नियमनाचाहि प्रश्न आला. बहिर्जातीय विवाह होत आहेत. या सर्व गोष्टीवर सुप्रजाजनन शास्त्र आपला काय निर्णय देईल तें खरें. मुलींची विवाहमर्यादा वाढल्यामुळें क्वचित् सास्वाच सुनांना भिऊं लागल्या. अर्थात् पूर्वीची 'सासुरवास' ही

कल्पनाच कांही वर्षांनी कळणार नाहीं. फार तर मतभेद हें त्याला नांव मिळेल. गुणकारी औषधांमुळे म्हणा, अगर अस्वास्थ्य, द्रव्याभाव व व्यवसायबाहुल्य यामुळें विपरीत पद्धतीनें विषयवासनेच्या तृतीला वाव नसल्यामुळें म्हणा, पूर्वी सारखे इंद्रिय जन्य रोगांविषयीं फारसे कानावर येत नाही. यावर निर्णायक मत त्या विषयांतील संशोधकच देऊं शकतील.

हल्लीं स्वास्थ्य संरक्षणाचे कृत्रिम पण शास्त्रीय उपाय उपलब्ध झाल्यामुळे मृत्यूची भीति कमी वाटते. परंतु प्रजा मात्र क्षीण होत आहे. घरींच जर आपण आपल्या जुन्या मंडळीशी तुलना केली, तर खात्री पटेल. आजोबा, पणजोबांचे छायाचित्रें पाहा व स्वतःच्या शरीराकडे पाहा म्हणजे दुसऱ्या पुराव्याची जरूरच पडणार नाहीं. कारणें सांगण्याची आवश्यकता नाही. पूर्वीचे 'खवय्ये' नाहीत व 'खिलवय्ये'हि नाहीत. पूर्वी १० लाडू खाणें, ही साधारण गोष्ट होती. सतालभर (पातेले) रस पिणे, 'कोटमभर' पीठ खाणें, आग्रह पडल्यास ४०-४० लाडू खाणें, गळ्यांत दगडाचे वेटोळे घालून बैठका मारणें, १० कुडवांचे पोते हातांनी उचलणे, घरीच विहीर खोदणें, पुरांत पोहून जाणें, आखाड्यांत १०-२० पठ्यांचा दम करणें, ७५ वर्षांच्या वयांत वडे खाणें वगैरे गोष्टींचे अवशेष आज क्वचितच पहावयास मिळतील. पूर्वी बायका बाळंतपणातून उठल्या की, पाटलिणी सारख्या गुबगुबीत दिसत. शरीराच्या नैसर्गिक शोभेपेक्षा नेपथ्य शोभेवरच हल्ली अधिक भर देण्यांत येत आहे. आग्रहाने वाढलेलें पण नकोसें झालें म्हणून जेवढें तूप आम्ही पानावर टाकून देत असूं, तेवढें एका आठवड्यांतहि आम्ही बहुधा हल्ली खात नाहीं. आमच्या पिढीच्या पूर्वीच्या कथा तर आणखीच रम्य आहेत. कॉडलिव्हरआईलची बरोबरी करणारे जवसाचे तेल सोडून आम्ही तिळाचे तेल पत्करलें, तेंहि गेले. हिंवाळ्यांत जादा व्यायाम करणें व पौष्टिक औषधींचे सेवन करणें ही प्रथा असे. शिवाय सुंदर अलंकार, सुवासिक अत्तरें, तिळाच्या तेलाची मालिश, नैसर्गिक राहणी, चिन्ता व मनोभंगाचा अभाव, मधून मधून उपास तापास, व्रतवैकल्य व संयमपूर्ण आचरण, यामुळें स्वास्थ्यवृद्धीस मदत होई

१ नरम दगडाच्या लहान वाटीला दगडी म्हणतात. 'कोटम' दगडीच्या मानाने पुष्कळ मोठा असतो.

हल्लीं दुधांत पाणी घालून किंवा इतर रीतीनें समाजाची प्रतारणा करणें, अनार्यत्वाचें लक्षण मानलें जात नाही. ज्यांची राहणी अनेक पिढ्यांच्या संस्कारामुळे-धन संचयामुळे नव्हे–उच्च प्रकारची दिसते, ते आपल्यासारखे असंस्कृत होतील तर बरें, अशी श्रमिकांची इच्छा असते. काळाच्या ओघानें श्रमिक व चळवळे लोक द्रव्यार्जन अधिक करतात व सुखीहि दिसतात पण श्रमिक व आर्य संस्कृति यांची सांगड कशी राहणार, हा प्रश्न आहे. तों पावेतों मध्यम वर्गाचें स्वास्थ्य मात्र बिघडत आहे व त्यांची संस्कृतीहि घसरगुंडीला लागली आहे. अर्थात याचा परिणाम आयुर्मानांवरहि होणे शक्य आहे. मरणाचें भय तसें कमी झालें असेल, म्हणून दीर्घजीवन लाभेल, यांची खात्री नाही. (पाश्चात्य देशांतील जीवमानाचे आकडे पहा.) आमच्या जवळ ३-४ पिढ्यांची दीर्घजीवी लोकांची उदाहरणे आहेत. पूर्वींचे लोक पूर्णायुषी असत, असे वृद्ध म्हणतहि आले आहेत. नवीन पिढीनें या गोष्टीकडेहि लक्ष पुरवावयास हवें. यामुळें लोक संख्या वाढेल. आजच १५० कोटींवरून २५० कोटींवर जगाची संख्या गेली आहे. तेव्हां संहार झालेला बरा असेहि कोणी म्हणेल, परंतु पुस्तकाच्या कक्षेबाहेर हा मुद्दा जाऊं पाहतो म्हणून येथेंच थांबलेलें बरें.

विवाह विधि व इतर संस्कार

हल्ली हिंदूंच्या षोडश संस्कारांपैकीं बरेच लुप्त झाले आहेत. द्विजातींत नामकरण विधि, उपनयन विवाह व अंतेष्टि, एवढे कायम आहेत. तरी ब्राम्हण सोडून इतर द्विजातींत उपनयन संस्कार बहुतेक लोपला आहे. ब्राम्हणांतहि त्याची उपयुक्तता उरली नाही. पुष्कळदां चार चौघांस आपले घरीं बोलावण्याचा एक शास्त्रोक्त प्रसंग, एवढेंच त्याचें प्रयोजन असते. तें जर एरव्ही भागले असेल, तर कांही नैतिक धैर्याचेंहि प्रदर्शन करण्याच्या दृष्टीनें मुंजीचा विधि लग्नापर्यंत लोक ढकलूं लागले आहेत. हल्लीं 'घोडमुंजे' पुष्कळ पहावयास मिळतात. अलीकडे कांही विवाह मंगल कार्यालयांत होतात, तर बरेच घरीं होतात. विधींच्या दृष्टीनें दोहोंत फरक पडत नाही. परिवर्तन जाणवते तें अवडंबरात, सोहाळ्यांत व रुढींत. पूर्वीं पाश्चात्यांतहि विवाह अल्पवयांत होत, वॉरनहेस्टिंग्सचा बाप लग्नात १५ वर्षांचा होता.

(इ. स. १७१५) हल्लीं आपल्याकडेहि वयोमर्यादा चांगलीच वाढली आहे. परिस्थिति अशीच राहिल्यास सोहाळे क्रमाक्रमाने इतके कमी होतील की, त्यांची आठवण देखील राहणार नाही. विवाहाला केवळ वैयक्तिक भौतिक स्वरूप आमच्यांत नाही, म्हणून या विषयाचें महत्व वाटते आणि म्हणून थोडे लिहिलें.

हल्ली पूर्वी सारखी पत्रिकांची जुळवाजुळव कोणी फारशी करीत नाही. वरच्या म्हणून गणल्या गेलेल्या जातींत मुलीचा विवाह एकदांच होई. यामुळें फलज्योतिषाचा अधिकांत अधिक फायदा घेण्यांत येई. हल्लीं पुनर्विवाहाची सोय झाली आहे व बायकांहि पूर्वी इतक्या परावलंबी व लाजाळू नसतात व फलज्योतिष खरेंच ठरते असेंहि नाहीं म्हणून तिकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ति आहे. दुसरें, प्रेमविवाह ही एक नवीन वस्तु समाजांत आली आहे. त्यामुळें त्याच्या आड येणाऱ्या पत्रिकाच काय, इतरहि बरींच बंधने युवक युवती झुगारून देताना दिसतात. तरी पुनः अलीकडे प्रेमाला जरा ओहटी लागलेली दिसते. कदाचित् उपेक्षेमुळेंहि तसें होत असेल.

लग्नाचे ठरल्यावर पूर्वी सारखे साक्षगंध होतेच असें नाही. साखरपुडा कांहीसा ब्राम्हणेतरांत ऐकूं येतो. ब्राम्हणातून तो नाहीसा झाला व त्याच-बरोबर शालमुदीहि लुप्त झाली. पूर्वीची पाल्हाळिक न्हाणीं व पतिपत्नींनी एकमेकांची चारचौघा समोर 'आह्यनें' (उखाणे) म्हणून नावे घेणे, अहेरपट्टी, डाहका, गोंधळ या गोष्टींचा बराच संकोच झाला आहे. शौकीन ब्राम्हण, श्रीमंत मारवाडी व व्यापारी वगैरेकडे पूर्वी लग्नात नर्तकींचा नाच होई. ही प्रथा मात्र आतां कोठें दिसत नाही. समान्त (शेवती) पूजन व त्यांतील पसोनसे सुपाऱ्या, खारखा, रुखवंताचे प्रकार, तांब्यापितळीच्या भांड्यांची रास, (हल्लीहि हें सर्व आहे पण त्यांत भरीवपणा कमी. सजावट मात्र अधिक) मानकरणींच्या कासया (मानाचे कमींतकमी किमतीचे वस्त्र) व तीं न मिळाल्यास उद्भवणारीं भांडणे, न्हाव्याच्या मशाली व तेल चोरण्याचे प्रकार आतां दिसत नाहीत. लग्नाचा मोसम आला की, नारळ; सुपाऱ्या व खारका बरोबर दक्षिणाहि मिळणार या भावनेने मध्यम स्थितीतील गरीब मुले टिऱ्या बडवीत. पण ते दिवस गेले. लग्न घटकेच्या थोडे आधीचें मुलीचें तेलवाण व 'वर्धावा' यांत मोठी मौज असे. आपल्याला बसावयास

घोडा मिळणार व शिवाय खाऊहि मिळणार म्हणून आपल्यावर पाळी यावी म्हणून लहान मुले कोण उत्सुक असत. वधू मंडपाकडे येणारी वरपक्षाची मिरवणूक तरी कोण थाटाची असावयाची. हल्लीं गुढ्या उभारावयास पुरेसे खण व रंगीबेरंगी उंची वस्त्रे तरी कोणाजवळ आहेत व असलीहि तरी ती उंच धरावयास माणसे कोठून आणावयाची ? पूर्वी लग्नांत भुरसी (भूयसी) दक्षिणा किती द्यावयाची म्हणून व्याह्यांत स्पर्धा माजे. कारण आपलें औदार्य दाखविण्याचा तो एक प्रसंग असे. आतां सर्वांत कमी खर्च दक्षिणेत होतो. वैदिक, भिक्षुक व आगंतुक-सर्वच कमी झाले. पूर्वीं आगंतुक पाहतां पाहतां पानदानातील वस्तूंचा फडशा उडवीत. अगदीं परवापर्यंत इकडे नारळ वाटीत असत व तें नागपूरचे वैशिष्ट्य म्हणून गाजत असे. कोकणस्थांत पेढेतरी वाटतात. हल्ली बहिणीचे दार लावणीचे कौतुक तेवढेसे करीत नाहीत. पूर्वी भटजीच केवळ मंगलाष्टकें म्हणत. आतां पुष्कळदां मुली स्वकृत किंवा इतरकृत कविता ध्वनिक्षेपकावर म्हणतात व त्याच्या छापील प्रती लोकांच्या हाती असतात. पूर्वीं बँड नसे. चौघडा होता. वाजंत्र्याचे पोषाख तरी कोण थाटाचे असत. लाऊड स्पिकरच्या (बोंबल्या) कर्णकटु आरडा ओरडीत सनईच्या रागरागिणीला कोण विचारतो ? ' मंगल वाद्य ' म्हणायचे मात्र ! अर्थहीन शब्द वापरण्याची हल्ली संवयच्च लागली आहे.

पूर्वी देवदेवक व हरिद्रा मिळून ५ दिवसांचे लग्न असे. घरोब्याचे लोकांस व जवळच्या नातलगास चुलीसुद्धां आमन्त्रण देण्यांत येई. हल्ली लग्नाचे दिवशीच वराती सुद्धा सर्व आटोपते. पूर्वीं लग्नाच्या दुसऱ्या दिवशी मुलाकडील मंडळीस यथाविधि आमन्त्रणे जात व मानापानामुळें, कृत्रिम औपचारिक भाषणामुळें व हिंडण्या फिरण्यामुळें जीव रंजीस येई. व्याहीमंडळी यावयास लागली म्हणजे बिनीवर त्यांची सोवळयाची व पिण्याच्या भांड्यांची ओझीं असत. जेवणाला उशीर व्हावयाचा व त्यांतहि कोठे बिघडले कीं, एक तर वधू पक्षावर खूब मंडळी लादली जाई किंवा फार थोडी व किरकोळ मंडळी जेवावयास पाठवून वर पक्ष वधूपक्षाचा सूड घेई. मराठा समाजात तर ह्या भानगडी विशेष असावयाच्या कारण त्यांच्यात मानापानाचे व कुटुंबाच्या श्रेष्ठ कनिष्ठपणाचे फार बारकावे असत. याच दिवशीं रात्री स्त्रियांना बांगड्या व चुडे भरण्याचा प्रकार असे. यांतहि क्षोभ होण्याचा संभव असे.

विहिणीच्या चुड्याच्या कावेडया सोन्याच्या कीं चांदीच्या या बद्दल कुरापत निघत असे. कासई म्हणजे किति क्षुल्लक वस्त्र, पण त्याकरितां कोण भांडणे होत. नंतर त्याच दिवशी सुन्मुख पाहण्याचा विधि होई. यांत वरमातेने मुलामुलीस मांडीवर घेऊन दूध पाजावयाचे असे. हल्ली दोन्ही वाढलेले तेव्हां हा विधि तसा कौतुकास्पद रीतीने जमत नाहीं यानंतर बायकांची जेवणें. पहाटच व्हावयाची. चवथ्या दिवशीं वराकडची मेजवानी बहुधा होई व रात्रीं तिकडची मंडळी मुलीस स्वगृहीं नेण्याकरितां येई. या दिवशीं पुनः मुलास कपडे मिळत व व्याही त्याचे कुटुंबीय व मानकरी या सर्वांना वस्त्रें व नारळे वगैरे देऊन सत्कार करीत. या दिवशीचे वधूवर व विहीण यांचे कपडे शुभ्र असावयाचे. आजहि असतात. वरातीच्या आधीं एक गमतीचा प्रकार असे. तो म्हणजे दोन्ही बाजूंच्या न्हाव्यानीं वधूवरास कडेवर घेऊन 'झेंडा' नाचणे व मंडपातील लोकांनी त्याना ओवाळणी टाकणें. आतां कोणी न्हावी तसें करील तर त्याच्या आयुष्याची दोरी तुटलीच म्हणावयाची वरातीचे वेळीं पालखी, सुसज्ज घोडी, हत्ती लवाजमा, आतषबाजी असावयाची. आजहि आहे, पण साधनांत व प्रमाणांत फरक झाला आहे. खूब 'हवाई' (आतषबाजी) उडविण्यांत मोठेपणा वाटे. लग्नांत एक जावयाचा रुसण्याचा प्रकार असे. यांत एखादी तो विशिष्ट किमती वस्तू सासऱ्या जवळून उपट्ट इच्छी. त्यांत हसेंहि होण्याचा संभव असे.

पाचवा दिवस म्हणजे देवक सुटण्याचा व परळचा. तो विधि आजहि होतो पण लग्नाच्या दुसऱ्या दिवशीं. पूर्वी वराती नंतरहि दोन्हीकडे सोयरे मंडळी थांबत. वाहतुकीची साधने कमी त्यामुळें वारंवार भेटी गोष्टी व स्नेह संवर्धन होणें कठिण असे. तेव्हां लग्नाची दगदग आटोपल्यावरच सर्व व्हावयाचें. दासदासीना इनामे वाटीत. त्याला 'शिरपाव' म्हणतात. कोणी परत जात असल्यास त्याला मानाचें वस्त्र देऊन व खूब फराळाचें देऊन रवाना करीत. हल्ली दोन्हींचे प्रमाण कमी झालें आहे. उन्हाळ्यात लग्न असले म्हणजे विहिणीचे व तिच्या स्त्री नातलगांचे पाय भाजू नये म्हणून धोबी वाटेने पायघड्या टाकीत. हल्ली बायका चपला वापरतात व एवढें गजगतीने चालण्यास वेळहि कोणास आहे ?

पूर्वीं लग्नांत जेवणावळींचा खूब 'रोंभा' चाले. आतां तेवढे अन्नहि नाही व त्याला स्वादहि नाही. लग्नानंतर पुनः मांडव परतणी आपली

असावयाचीच. शिवाय १२ महिन्याच्या सणावारांत जावई, व्याही व संलग्न मंडळी असावयाची. दिवाळसण तर दिवाळेच काढी. मुलाचे वय १०-१२ तर मुलीचे ७-८ वर्षांचे असे. तेव्हां मुलगी ऋतुस्नात व्हावयास कांही काळ जावा लागे. मग फलशोभणाचा विधि होई. यातहि मुलीच्या बापाला खूब खर्च येई. याला 'शान्तिक' म्हणत. मुलगी सासरी १५ दिवस मखरात बसावयाची. तिला आप्तेष्टांकडून आळीपाळीनें मिष्टान्नाची ताटे येत. शेवटीं ठराविक दिवस पाहून होमहवन झाल्यावर सायंकाळी सासऱ्याकडची 'गोदई' येई. गोदई 'गोदडी'चा अपभ्रंश दिसतो. 'गोदई' म्हणजे मसरूच्या किंवा इतर उचा कपड्याच्या गाद्या गिर्द्यासहित सुसज्ज केलेला बिछाना रंगीत पलंगावर ठेऊन व त्याच बरोबर त्यावर सर्व प्रकारच्या विड्याच्या उंची सामानानें भरलेला नवा चांदीचा किंवा पितळेचा पानडबा चांदीची अत्तरदाणी, गुलाबदाणी झालरीचा पंखा वगैरे मांडून तें सर्व सामान वाजत गाजत मिरवीत आणीत. यामुळें भलत्याच गोष्टीची निष्कारण जाहिरात होत असे व बरोबरची मंडळी मुलाची टिंगलहि करीत जेवणावळी झाल्या तर रात्रीं हौशी बायका सजविलेल्या खोलीत रंगवल्लिका वगैरे काढून विलासाचे वातावरण निर्माण करीत. पुढें यथाकाल मुलगी गरोदर राहिली म्हणजे आजच्या प्रमाणे चांदणी चोळी व डोहाळ जेवण वगैरे प्रकार होई, पण प्रमाण अधिक.

मुंजी विषयीं थोडेसें वर सांगितलें आहे. यांतही थाटाला अधिक प्राधान्य असते. गायत्र्युपदेश स्नानसंध्येची व स्वाध्यायाची पुढील तयारी या दृष्टीनें तीत कांहीं स्वारस्य राहिलें नाही.

वर विशेषतः ब्राम्हण समाजातील सोहळयांचे वर्णन आलें आहे. तेंच कमी अधिक प्रमाणांत चालीरीतीस अनुसरून इतर हिंदुजातीं विषयीं समजावे.

भाग ९ वा

उरलेलें थोडें

लोकसंख्या

लोकसंख्येचा अभ्यासही एका दृष्टीनें महत्वाचा आहे. १८२०-२१ मध्ये नागपूरची लोकसंख्या १ लक्ष ११ हजार होती. ती पुढील ४ वर्षांत ४ हजारांनी वाढली. नागपुर सुभ्यांत हिंदूत निरनिराळया ११४ जाती होत्या

व त्या ६२ प्रकारचे धंदे करीत. अर्थात् जात आणि धंदा यांची भेसळ तेव्हांही झाली होती एवढेच नव्हे तर त्यापूर्वीहि होती. रुक्मिणी स्वयंवराचा कर्ता (रचना काल शके १५९६) विठ्ठल कवि हा व्यापारी होता. तरी तो उत्तम कवि म्हणून प्रसिद्ध आहे असो. मुसलमानांच्या ४ जाती मानल्या जात होत्या. तृतीय रघूजीचे वेळी सबंध राज्यांत २४ लक्ष लोक होते. त्यापैकीं मुसलमान सुमारे ५८००० म्हणजे एकंदर लोकसंख्येच्या मानाने २·३६ होते. गोंड ११०८ असत. खुद्द नागपुरांत ४१६२ विणकर कोष्टी व १००८ सूत कातणारे होते. १८६६ मध्यें नागपूरची लोकसंख्या ८५॥. हजारावर आली म्हणजे १८२५ च्या मानानें ३० ह. नी घटली. कारण उघड आहे. राज्य गेले. यावेळीं कामठीची लोकसंख्या ५१ हजार होती व सागर, बऱ्हाणपूर व जबलपूरची अनुक्रमे ४३, ३४ व ५५ हजार होती. दुसरे कारण असे कीं, व्यापार बुडाला. पुण्यास पेशवाईत नागपूरचे १४ लक्ष किमतीचे कापड जात असे म्हणून मागें आलें आहे. १८२६ त तें पुण्यास व विठूर येथे अनुक्रमें ३ लक्ष व १½ लक्ष जाऊं लागले. १८६६ त तर परिस्थिति आणखीच बदलली. यावेळी नागपूरच्या ८५½ ह. जनसंख्येंत पुरुष २९½ ह. तर स्त्रिया ३३ हजार होत्या व मुले मुली सारख्या होत्या. यांत ४५६ युरोपियन व फक्त १० पारशी होते. ७५ हजार हिंदूत ब्राम्हण सर्वांत अधिक म्हणजे १७४१३ होते. कोष्टयांचा क्रमांक दुसरा येतो. तिसरा कुणब्यांचा, चौथा मराठ्यांचा (६५००) व त्यांचे खालोखाल 'धेड' (५५००) व तेली होते. ७ वा क्रम हिंदुस्थान्यांचा, तर आठव्यांत विदूर येत. (३ हजार) २२·६ हजार लोक कृषिजीवी होते. मोलमजूरी करणारे १७ हजार व नौकरी पेशांत ७ ह. होते. सुतार २ हजार, चांभार १३०० व किराण्याचे दुकानदार फक्त १ ह. होते. वकील मात्र ३७ म्हणजे अधिक वाटतात. (त्यावेळीं थोडा कायदा आला की वकीलीचा धंदा करतां येई.) पुढें १८८१ त लोकसंख्या १३ ह. नी वाढली व पुढील दोन दशकात १ लक्ष २६ ह. झाली. १९११ त प्लेगादि कारणानी ती २६ हजारांनी घटली, परंतु तेव्हा पासून मात्र सारखी वाढ होत आहे. १९२१ त ४४ ह. ची वाढ झाली. १९४१ त नागपूरची संख्या ३ लक्ष २ ह. वर गेली व १९५१ त ती ४ लक्ष ६४ ह. झाली. हल्लीं तर ७ लक्षा पर्यंत गेली असावी, असें काहींचे म्हणणे आहे. मात्र खरे वाटत नाहीं असो.

बाजार भाव

ज्या कारणास्तव नागपूरच्या व्यापारांत स्थित्यन्तर झालें, त्याचे वर्णन या पूर्वीं आलें आहे. येथें फक्त खाद्य पदार्थांचे व इतर वस्तूंचे भाव द्यावयाचें आहेत. सर जॉन मालकम आपल्या माळव्याच्या इतिवृत्तांत म्हणतो "In the time of Raghoji the great, the price of grain (juwar) was one khandi or 400 lbs. per rupee, under Janoji, the rate was 200 lbs. per rupee; under Mudhoji it was 150 lbs. per rupee, while under Raghoji II it rose gradually from 8 lbs. to 50 lbs. per rupee" जेन्किन्स म्हणतो "In the reigns of Janoji & Mudhoji grain sold at the (१८२६) rate of three rupees a khandi, which is nearly the present rate"

१८६२ चे भाव. १८७२ चे भाव.

मालाचें नांव.	किंमत. वजन दर रुपयास.	मालाचें नांव.	भाव १ रु० स.
गहूं	२४ शेर ७ छटाक	गहू	३२ पायल्या
तांदूळ	२१ ,, ,,	तांदूळ	२६ ,,
चणे	२७ ,, ,,	चणे	२६ ,,
डाळ	२२ ,, ,,	—	-- अडीच रु० ला
साखर	२ शेर ८ छटाक	साखर	२½ शेर
मीठ	६ ,, ११ ,,		
तूप	२ ,,	तूप	१½ शेर
कापूस	२ ,, ९ छटाक		
गूळ	७ ,, ८ ,,	गूळ	१२ शेर
तेल	३ ,, १४ ,,	ज्वारी	३४ पायल्या

धान्याच्या भावावरूनच मजूरीचे दर ठरतात म्हणून त्याची थोडी कल्पना देतो. १८२६ मध्यें जेन्किन्स म्हणतो कीं, चांगल्या मजूराला २ किंवा ३ पैसे रोज मिळतो व वीस वर्षां पूर्वीं हा दर १ पैसा असे. १८७१-७२ मध्यें मजूरीचे दर-रोज ।≡ कारागीर, ≤≡ मजूर, ।।।– गाडी व ।= उंट.

(ब) वृद्धां कडून घेतलेली माहिती:—

१ अनंत पांडुरंग खेडकर नागपूरांत पोष्टाच्या नोकरी निमित्त १८८३ साली आले. हल्ली वय ९०. दर १ रु० ला तांदूळ १६ पा. तु. दाळ २० पा. दूध १२ शेर, सोने १ तोळा १६ ते २० रु. चांदी, १ तो. ॥.

२ दिनाजी वैरागडे १९४७ त ८३ वय निवृत्त हेडमास्तर, प्राय. शाळा तांदूळ १८ पा. गहूं १६ पा. तुरीची डाळ १६ पा. लाखोळी २५-३० पा. ज्वारी २५-३० पा. तूप १$\frac{१}{४}$ पायली तेल २ पा.

३ रखमाबाई गोखले कै. लालूभाऊ गोखल्यांची आई. १९४५ मध्ये ९२ वर्षांच्या. दर १ रु० ला गहूं १६ पा., तांदूळ २० पा., दूध १० शेर.

४ विनायकराव मराठे बी. ए. मृत्यु १९४५ जन्म २४-१०-१८५३ कुटुंब राजेशाहीत आलें. तांदूळ २० पायल्या. तांदूळ ६० पा. (बिलासपुरांत) तांदूळ ८ पा. चिन्नूर. तांदूळ १४ पा. लुचई व रामकेळ. गहू २ कुडव. ज्वारी १ खंडी ३ रु., तेल २॥ पायल्या १ रु. ला, दूध १२ शेर १ रु. ला, तूप ६ रु. मण (१० शेर)

(क) (सरकारी आकडे)

	१८९१	१९००	१९०६	दर १ रु. शेर
ज्वारी	२२	१७$\frac{१}{२}$	१४	
गहू	१४$\frac{१}{२}$	१२$\frac{१}{२}$	१३	,,
तांदूळ मागील १५ वर्षांत ११ शेर.				,,
कापूस	२$\frac{१}{२}$	२$\frac{१}{२}$	२	
जवस	८$\frac{१}{२}$	८ शेर	७	,,
चणे	१५	१५	१५	,,
मीठ	१०	१०	१५	,,
गूळ	६	५	५	,,
तूप	८	८	१८ (१२ शेरांचा मण)	,,

(ड) स्वतः लेखकानें सुमारे ५० वर्षांपूर्वी ८-१० रु. मण तूप, १ रु. ला १। पायली तेल, १ रु. ला १२ पायल्या गहूं, ७ रु. खंडी ज्वारी व १० रु. खंडी तांदूळ पाहिले आहेत. (१ पायली १०० रु. भार)

वेशभूषा

माणसाची बुद्धि जशी कालाचे ओघात बदलते, तसा त्याचा पोषाखही बदलतो. या शतकाच्या प्रारंभीं जे वयस्क इंग्रज असत त्यांची चेहरेपट्टी व पोशाख चित्रांत पाहिले म्हणजे आपण जी त्यांची वेशभूषा व चेहरेपट्टी पाहिली, तशी ती दिसणार नाहीं. आणखी मागची जुनी छायाचित्रें पाहिली, तर कांहींना आजच्या मानानें त्यांचे वर रानटीपणाचाच आरोप करावासा वाटेल, तर कांहींना त्यांत ऐश्वर्याची व शरीर संपत्तीची भूषणीय लक्षणें दिसतील. असेंच हिंदुस्थानचेंहि आहे. पूर्वींचे भरघोस चेहरे व पोशाख आज दिसत नाहीत. हल्लीं सर्व सुटसुटीतपणा दिसतो. तरी आपल्याला जुन्या मंडळींचे पोशाख पहावयाचे झाल्यास त्यांचे अवशेष वैदिक वर्ग, शास्त्रीपुराणिक, हरिदास व खेड्यापाड्यातील वृद्ध मंडळींत किंवा कांहीं घरंदाज लोक विवाहादि मंगलप्रसंगी पोषाख करतात तेव्हा थोडे फार पहावयास मिळतात. स्त्रियांचेंही असेंच झालें आहे.

नागपुरी पागोटे तर आतां ब्राम्हणांत श्री. बाबाजी दीक्षित व वे. शा. सं. वासुदेव शास्त्री घाटे यांचे डोक्यावर दिसते. इतरांत आदितवारींत तें एका व्यापाऱ्याचे डोक्यावर अलीकडे पर्यंत असे. आम्ही आपल्या वडील धाऱ्या मंडळीना त्यांच्या अर्ध्या आयुष्यांत पगडी घालताना पाहिले तर उत्तरार्धात फेटा व टोपी वापरतांना पाहिले. आम्हास समवयस्क अशी स्थानिक पुराण प्रिय मंडळी लवकरच नागपुरी पगडीवरून पुणेरी पगडीवर आली व पुणेरी पगडीवरून फेट्यावर आली. फेटा जाऊन फेल्ट कॅप आली व ती जाऊन हॅट किंवा साधी टोपी किंवा बोडकेच राहण्यापर्यंत मजल आली. अंगरखा व बाराकशी यांची फारकत केव्हांच झाली. लो. टिळकांनी इहलोक सोडल्यावर म. गांधी राजकारणात अवतीर्ण झाले आणि जुन्या कलाबतूच्या, वेलबुटीच्या व जरीच्या टोप्या तर सोडाच, पण साध्या स्वदेशी टोप्याही लोकांनी टाकल्या व त्या ऐवजीं खादीच्या हलक्या पांढऱ्या टोप्यापर्यंत लोक आले. आता विवाहादि मंगलप्रसंगींहि घरांत वेळेवर टोपी सांपडणे कठिण झालें आहे. फार काय विवाह प्रसंगीहि तरुण बोडके सापडतांत. पूर्वी बोडका माणूस अपशकुनी समजला जाई. तर आतां उलट टोपीचा माणूस जरा जुनाटच

समजला जातो. पूर्वी खिस्ती देखील बिनटोपीने राहात नसत. त्यांच्या छोट्या दिवालीच्या काळ्या मखमलीच्या ठरविक टोप्या असत. हल्लीं मिशा कोणताही सपितृक तरुण काढतो, तर पूर्वी तसें फक्त क्षौराचे वेळीच करीत. पूर्वी गुलमुछा ठेवण्यांत भूषण वाटे. आतां साफ. ब्राम्हण मुंजीत फक्त मुलाचा 'चष्पीघोटा' करतात. एरव्ही घेर किंवा चनोडा डोळे फाडफाडून बघतो म्हटलें तरी सामान्यतः दिसणार नाही. पुरोहित सोडून इतर कोणी असलाच तर तो कमी शिकलेला किंवा जुन्या पीढीतला सनातनी वृत्तीचा वृद्ध माणूस असेल. हल्लीं सर्व हिंदुमात्रांच्या डोक्यावर विशिष्ट रचनेचे केस आले आहेत. मराठ्यांचे झापरें असे, तेंही गेले. १९०६–०७ पर्यंत डोकीवर केस ठेविले कीं, नावे ठेवीत. इतर जातीहि डोकीची हजामत करीत.

हल्लीं व्यापारी म्हटला कीं, मग तो मारवाडी असो. गुजराथी असो, तेली असो किंवा कोणीहि असो, पोषाख ठरलेला. पूर्वी मारवाड्याची पगडी निराळी, (व पोटही). तेल्याची पगडी निराळी, कोष्ट्याची निराळी, महाराजाचे शिरस्त्राण निराळे. असें वैचित्र्य असे. गंधातही फरक असे. आडव्याचे उभे गंध झाले, उभ्याचे दोन ठिपके किंवा एक झाला. इतर प्रकार सांगण्याची जरुर नाही. हल्लीं कपाळ रंगविणे वाईट समजले जाते. डोईचा मंदिल आतां दिसत नाही. देवळांत देवाला असेल तेवढाच. मराठ्याची पीळेदार पगडी नागपुरांतील वडील राजघराणे व सरदार व्यंकटराव गुजर पावेतो कटाक्षाने राहील. लहान पातीतील मंडळी फक्त विवाहादि प्रसंगापुरतीच पगडीची कदर बाळगताना दिसते. जुन्या पोषाखाची लोकांना कल्पनाच उरली नाहीं. त्यामुळे नाटके व सिनेमातील जुने प्रसंग यथार्थ दाखविणे कठिण जाते. फिरून जुन्या वेशभूषेची कल्पना असली तरी, कपडे कोठून आणावयाचे ? मध्यंतरी स्वदेशी व कॉंग्रेसच्या चळवळीमुळें युरोपिअन पोषाखाची पद्धति कमी झाली होती, पण पुनः महागाईमुळें गाडे उलटलें. मुलींनाहि धोतर नेसलेला मुलगा आवडेनासा झाला आहे कारण त्यांत 'स्मार्टनेस' कमी. पूर्वी मुसलमान देखील चोळणा वापरीत नसत. दाढी सोडली; तर इतर दृष्टींनी ते हिंदूसारखेच दिसत. लहान मुलामुलींच्या पोषाखातहि बरेंच अंतर पडलें आहे; तसेंच दागदागीन्यांतहि. पूर्वी मुंज झाल्यापासून मुले धोतरे नेमाने नेसीत. मुंजेत रेशमी धोतर आपल्याला मिळेल म्हणून मुले उत्सुक असत.

कमरेला चांदीचा ' करदोडा, ' हातांत चांदीचे तोडे व कानांत भिकबाळी, गळयांत सोन्याची कंठी, ही नेहमीचीं शिष्ट कुटुंबातील लहान मुलांची आभूषणें होत. डोकीला लोकरीच्या टोप्या असत. नंतर कलाबतूच्या व नंतर सलम्याच्या झाल्या. नंतर रेशमी वेलबुट्ट्यांच्या व गोंड्याच्या टोप्या आल्या मग काळया मखमली नाटकी टोप्या आल्या. मुलांचे अतलशीचे किंव 'किनखापाचें बागे गेले. मसरूच्या विजारी गेल्या व बाराकशीच्या ऐवजी कुडतें व नंतर शर्ट आलें. लंगोटी लावणारा ब्राम्हणाचा मुलगा सहसा दिसत नाही. हल्ली हाफपँटचा प्रघात पडला आहे. कडेवरच्या मुलांच्या किनखापाच्या कुंचल्या केव्हांच लोपल्या.

स्त्रीवर्गाच्या वेशभूषेंतहि फरक झाला आहे. लहान मुलींच्या चोळया परकर जाऊन त्या ऐवजी झबले, फ्रॉक आले. सुशिक्षित मोठ्या बायकांत चोळया मागे पडून ब्लाऊजचा रिवाज पडला आहे. कधीं कधीं पुनः खण अवतरत असतात. पुनः थोडें पोट मोकळें पडूं लागलें आहे. पूर्वी मोठ्या बायका कपाळाला मेण लावून डबल पैशाच्या आकाराचे लाल कोरडे कुंकू लावीत. आतां कुंकूहि निराळया रंगाचे असते व आकार तर बराच सूक्ष्म झाला आहे. एके काळी याच गोष्टीवर वाद होत. मध्यंतरी ओलें कुंकू आलें होते, तें लोपलें. हल्ली गोलसाडया व अंडरवेअर यांचे साम्राज्य आहे. डोकी-वरील मूद, राखडी, गुलाबाचें फूल, बुगडया, कर्णफुले, जोडवे, विरोद्या, पायातले रूळ, तोडे, घागऱ्या, गळयातल्या पुतळयाची माळ, मोहनमाळ वज्रटीक, ठुशी, सरी, कमरपट्टा, बिंदी, बिरडे इ. दागिन्यांचे प्रकार नाहीसे झाले आहेत. पोट पाटल्यांचीच मारामार, तेव्हां मस्तुरे, चंद्रहार, बाजूबंद कसे दिसणार ? एकदाणी, चपडाकंठी व एकदोन सोन्याच्या बांगडया एवढे असलें कीं बस्स झालें. स्त्रियां आम्हाला दागीने आवडत नाहींत असें म्हणतात मात्र, पण मिळतातच कोठें ? कांहीं अर्थ शास्त्राचे सिद्धान्त मांडू पाहतात, पण त्यांत जिव्हाळा नाही. रेशमी काठांच्या बाल्यां शाली व पैठण्या गेल्या. शालू क्वचित् दिसतात. हल्लीं स्त्रियांचे पोट पूर्णपणे झाकले असते पण गळा व डोकें उघडे असते. उघडे राहणे पुरुष गावंढळपणाचे समजतात. या पद्धतीमुळे पूर्वी सारखी रोमरन्ध्रे खुलीं राहात नाहीत व त्वचाहि तकतकीत नसते. ज्या मानाने दारिद्र्य आलें आहे, त्याच मानानें कपड्याच

हव्यास अधिक दिसून येतो. उपयुक्ततेपेक्षां डौल, 'फॅशन' व उत्तानता अधिक. पाठीपासून तहत समोरपर्यंत अर्धा भाग पदरानें झाकण्यांत स्त्रिया भूषण मानतात. आतां तर पंजाबी हिडिस पोशाखाकडे तरुण मुली झुकत आहेत. पूर्वी ओटी पोट सोडून सर्व अंग झाकून घेण्याची प्रवृत्ति असे व रस्त्याने चालताना देखील स्त्री सुलभ मार्दव व मर्यादा असे. पुरुषाप्रमाणे स्त्रियानाहि हल्ली इस्त्रीचे कपडे आवडावयास लागले. केशरचनेंतहिं कोण प्रकार ! हें सर्व ठीक असेल, पण शरीर सौष्ठव कोठून आणावयाचे ? कृत्रिम राहणीमुळें व पुरुषाप्रमाणें स्त्रियांचाही खानपानांत तोल सुटल्यामुळें, त्यांचे नैसर्गिक स्वास्थ्य व सौंदर्य कमी कमी होत आहे. वेशभूषेच्या 'मेकअप'वर अधिक भर आहे. शरीराचा 'मेकअप' मात्र कमी पडतो. कांहीं मुली तर हॉटेलांतहि जावयास लागल्या आहेत. मागील युद्धा पासून स्त्रियांनी पुष्कळ बाबतींत अघाडीच खोललेली दिसते. पहावे, लोंढा कोणीकडे वळतो तें !

नागपुरी भाषा

एवढ्याश्या जागेंत नागपुरी भाषेसंबंधीं विशेष विवेचन करणे शक्य नाही. नागपुरी मराठी म्हणजे कांहीं निराळी मराठी आहे, असे नव्हे. हल्ली सर्वत्र शिष्ट संमत ग्रांथिक भाषा प्रचलित आहे. फक्त कुटुंबांत खेळीमेळीने वागताना उच्च वर्णीय नागपुरी मंडळी देखील ती बोलतात एवढेच. तरी समाजातील इतर थर नागपुरी बोलीचाच वापर करतात-विशेषतः भंडारा व चंद्रपूर जिल्ह्यांत, बालाघाट, बैतुल, छिंदवाडा, रायपूर, बिलासपूर व सागर कडील मराठीवर हिंदीचा परिणाम झालेला दिसतो. सागर सोडून इतर ठिकाणच्या मूळ बोलीत साम्य आहे व हीच जुनी वैदर्भी भाषा होय. हिच्यात हल्लीच्या व्याकरणाचे कांही नियम मोडले जातात, बरेच नागपुरी शब्द 'शब्दकोशा'त आले आहेत. कित्येक अस्सल नागपुरी शब्द महानुभावीय-वाङमय व ज्ञानेश्वरी इत्यादि अव्वल मराठीच्या ग्रंथांत आढळतात. खरें म्हटलें तर 'ण'च्या ठिकाणीं 'न' 'कां'चे ठिकाणी 'काहून' "कृष्णा जातो"च्या ठिकाणीं 'कृष्णा जाते' व स्त्रियांच्या तोंडी प्रथम पुरुषी एक वचनी वर्तमान-काळी 'मी जाते' च्या ऐवजी 'मी जातो' असले प्रयोग लक्षांत आणले कीं, बाकीचा जो फरक आहे तो भाषेच्या उच्चारण पद्धतींत, हेलांत व शब्द योजनेंत आहे. तेव्हां या विषयाची विशेष चर्चा न करतां निरनिराळ्य

वेळचे व थरांचे कांही नमूने देतो. येथें एक विशेष गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे की, जुने सरकारी खालिते व शास्त्री पंडित यांच्या भाषेंत व पुण्याकडच्या भाषेंत विशेष फरक दिसत नाही.

नमूने

(अ)

नागपूरकर भोसल्यांची कागदपत्रें

दि. २९-१०-१७७९ पत्र क्रमांक २० "आम्ही परस्परे ऐक्यतेने चालून आपल्या दौलती रक्षाव्या; कारण राजमंडलात, बंधुत्वात व वडील धाकटेपणात विक्षेप येऊन बहुतानी आपल्या दौलती बुडाविल्या. ×× काळवेळ समयी दवलतीवर पेच येत असतो."

१८४६ इ. पत्र-क्रमांक १२ "जे सरकार सूक्त अथवा असूक्त बाई-साहेबास व तावेदार लोकास आज्ञा फर्मावितील त्या आज्ञेनुरूप वर्तणूक करावी. या आज्ञेत खलेल दिसून आल्यास जवाब देही घेण्यात येईल"

१८४५ क्रमांक २३ " या फौजेतील अव्वल व दुय्यम रिसाल्यांत जे कित्येक लोक फंदी फितुरी होते त्यांनी हल्ली बखेडा करून दंगा उभा केला होता. तेव्हां त्याचा कच्चा इतल्ला साहेब रेसिदन्त बहादुरास देण्यांत येऊन साहेब मवसुफाचे सल्लयाने त्या लोकास नातिज्या देऊन दोनशे सतरा इसम बरतर्फ जाहले. × जे रेवानच्या[1] तीन कंपन्या या तीनही पलटणावर अधिक आहेत. ×× आखाचे पोटात भरती होऊन तिल्लेरिच्या[2] दोन तोफाही उभ्या राहतात."

पेशवे दप्तर भाग २० क्र. २५ दि. ११-८-१७४२. आद्य रघूजी लिहितो–" प्रस्तुत तुम्हा कडील वृत राजश्री वेंकाजी देवराम याही निवेदन केले. ×× दुसरी गोष्ट सार्वभौमाचा लोभ विशेष संपादून घेतला यतद् विशयींचे व कितेक अर्थश्रुत जाहले ×× सर्वकाळ पत्री अविस्मर असावे."

पे. द. भाग २० क्र. १७ दि. २९-१-१७५९ जानोजींचें सदाशिवराव भाऊस पत्र–"येंदा समजावीस कार्ये निकडेने जिवाभ्य श्रम करून केली. पुढे समजावीस करावी यैसा विचार राहिला नाही. कालवंचना करावी.

१ रेवानच्या–राऊंडच्या २ तिल्लेरिच्या–आर्टिलरीच्या.

गंगथडीस असावे तरी सरदारी या रीतीने परिछिन्न राहता दिसत नाही. सर्व लोकिक आपला प्रिथवीत होईल की आज्ञेप्रमाणे वर्तत आसता सरदारी मोडली."

पौनी एथील दशपुत्रांचे सुमारे १५० वर्षां पूर्वीचें बाळबोधींत लिहिलेलें पत्र. तिथि नाही. लेखक यति झाले होते व रामटेकला असत. "दोन पत्र पाठविलीत परंतु तुम्हास प्रविष्ट न केलीत पत्र आणून देणाराही या करिता तुम्ही लिहिले ते उचीत असे आम्ही पत्र पाठविलीत कोणा हस्ती ते परिसा. XX स्वामीस पुस्तकाच व्यसन फार आहे याकारिता तुम्हास रुपये मागतील XX ऐशा फुकट गोष्टी झाल्यात. त्याही फुकट कवडी न दिधली. आम्ही फारकत स्वहस्ते अक्षर लिहून दीधले"

सन १८०५ मध्ये श्रीरामपुर मिशन प्रेसमध्ये छापलेल्या डॉ. केरी यांच्या मराठी भाषेच्या व्याकरणांत शेवटी दिलेल्या नागपुरी मराठीच्या उताऱ्यांतील एक छोटा उतारा. नागपुरचा पंडित वैजनाथ शास्त्री कानफाडे याचे सहाय्यानें हें व्याकरण डॉ. केरीने लिहिलें आहे. (डॉ. य. खु. देशपांडे यांच्या विलायतच्या नोटबुकावरून)

संभाषण–श्रीमन्ताशी आणी नायकाशी.

अरे कोण्ही आहे ॥
हो महाराज मी आहे ॥
नायकजीस बलाऊन् आण ॥
जे आज्ञा ॥
नायकजी तुम्हास श्रीमन्ताही आठविले आहे ॥
चला ॥

कां रे काश्यास् असे समयो बलाविले आहे ॥
तुला काही ठाऊक आहे ? ॥
नाही महाराज मला तर कांहीं कळले नाही ।
परन्त आसे वाट्ते जे कोण्ही कार्याची आज्ञा करतील् ॥
श्रीमन्त काय करित् आहेत् ? ॥

विहिरींचे कांठी वाजवटावर बसले आहेत् आणि कोनेरपन्त तथा मोरोबा आपा गाड्यावर बसून श्रीमन्ताशी बोलत् आहेत् आणी आनन्द साग बागेचा दारोगा राघोजो समोर उभा आहे त्यास काही गोष्ट पुसत् होतेत् हे म्यां दुरुनं मात्र पाहिले. ××

छे लोण्डीच्या तुला प्रति गोष्टीस म्हटलें पाहिजे जाणतोस जे श्रीमन्ताकडे जातों । या समयीं मोचे आणावे की नाहीं । जौवर मी न मागेन तौवर तुला हे सुचत् नाहीं ॥

× ×

माझे सांगात चल.

गंगाधर शास्त्री मंग्रूळकर यानी लिहिलेली नागपूरातील तृतीय रघूजीच्या वेळची बाळबोधींत लिहिलेली ग्रामण्याची हकीकत–शके १७७०. (इ. स. १८४८)

" बाबा मुळे पीतांबर नेसून समस्त ब्राम्हणास व समस्त पंडितास नमस्कार महाराज असे सेर्ष भाषण करीत होत्साते पंडित पंक्तीत भोजनास बसले. ते वेळेसचा प्रसंग खिरीत जसे लवण तसे मानून पंडितजन भोजन करू लागले. तेवेळेसच उठून आपआपुले घरी जावेत परंतु उपाध्ये म्हणत होता की जो न जेवील त्याचा आश्रय बंद होयील म्हणून न उठता विषतुल्य अन्न भक्षिते झाले "

बैजनाथ शास्त्री शेंडे ब्रम्हपुरी. पत्रावर तारीख नाही अंदाजे ५० वर्षांपूर्वीचे बाळबोधींत पत्र.

" सर्व ब्राम्हण\ ' 'अभीर व गुर्जर यांच्या येथे अन्न व्यवहार करीत होतेत हे आपण जाणत आहा या नंतर ×× बंद झाले. ते पुनश्च पूर्वी प्रमाणे असावे असा फंद होवुन बळीराम नानोटी व रामजी कात्यान हे दोघे तिकडे झाले असतां फंदि लोकांनी आपा फडनविषच्या द्वारा आबाजी रोटीवारला घेरत होतें ×× हा आपला आश्वलायन असून अधर्म प्रवर्तक होतो आणि इतराना म्हणतो की आमच्याकडे या. "

गंगाधर शास्त्रीची स्वतःच्या ग्रंथास बाळबोधींत प्रस्तावना शके १७८९ (१८६७ इ०)

" हा ग्रंथ प्राकृत वाल्याचे प्रीत्यर्थ झाला आहे तेव्हां इतकेंच त्याहांस कळलें म्हणजे पुरे वृथा कशा करिता त्याहांस पेचात पाडावे आणि अलंकारा. हींचा एकमेकासी मिश्रीभाव दिसण्यात येत असता ते पेचात पडतीलच मग न पडावे या अर्थी प्रति अलंकाराचे अंती-भेदक चिन्हें व नावें असें म्हणून व जीं जीं चिन्हें पंक्तीनें लिहिली आहेत तीं तीं लक्षांत ठेविली असतां कधीही संकट त्याहास पडणार नाहीं "

(ब)

बोलण्यांतील स्वकृत नमूने

१ बाबा, आवा, मुतून गितून आलेका नाहीरे पोट्टेव्हा ? नाही तर भरवाल गिरवाल सात्री (अंथरूण).

२ पत्नी–झाली काव तुमची पूजा गिजा ?

पति–काहयची होतेव पूजा, आझून माही तर इजामतच व्हायची आहे. तुज भुकागिक लागली असल तर खाऊन घेबा.

३ हे रांड नलटली मोठी लंड आहे. इज म्हनल, मज तेथच लोटाळन दे, त हे पोट्टी महा ऐकत नाही. जागेहुन पोट्टी ढगढगत नाही.

४ " खर सांगायस का भेव ? तिन साऱ्या बायकाहीस कुकु लावल-पन तिच्या डोळ्यास का मी दिसलीच नसन काव ? का मी भितिआड बसली होती ? माय, माय, केवढी व आहे धुर्पता ! "

एक संवाद

५ दोन्ही पात्रें ब्राम्हण वर्णीय.

दादी–का गा यंकटी बहु दिसा दिसलास गा ? कोठ टोळपला होता गा इतके दिवस ?

यंकटी–तुज ठाऊक नाही काव ? मी दो चो वर्सा पासून बल्लारस्यास राहयतो त ?

दादी–बापा, हे कोनत गाव व्हय गा ? बापा, बापा, उमरड, पालकवाडी, भानार, पौनी, चांद, काटवल, मोव्वाड असे पुस्कळ गाव आमच्या घरचे तहयसिलदार होते का नाही तेव्हा म्या पाह्यले. मग हे एकष्ट्रा झाले, तेव्हा त

सिवनी छप्पारा, बालाघाट, शिंदवाडा बैतुल, असे मोठे मोठे गाव पाह्यले पर तु म्हनतेस ते गाव कोठ आहे गा ?

यंकटी–वाव वाव ! एवढी बुद्धी झालीस पर मह्या गाव तुज कस ठाऊक नाही बा ! तुइ माहेर कोन्या गावच ?

दादी–आरमोरीच.

यंकटी–ते कोठ आहे ?

दादा–चांदा जिल्यांत नाही कागा ?

यंकटी–अस बेस सांग. त्याच त जिल्यात आहे बल्लारसा ? तेथ मोठ्या मोठ्या खदानी आहेत, खदानी.

दादी–मज काह्यची याद गा. पाचा वर्सात त माहे हाड हुरडले. अन् तेव्हा पासून मी माह्यरास गेलीच नाही. काह्यची जातो ? होतेच कोन मोठे नांदत. अन् तु तेथ नोकरी करते कागा ? काह्यची नौकरी आहे तुज ? भेटते तुज ४०-५० रुपे तनखा ?

यंकटी–यिनायकराव बाईवारास तु वळखते का ?

दादी–काहुन नाही ? तो त माह्या मोठ्या बहिनीच्या भासे सुनेच्या आतवेचा भाऊ. त्याज म्या नागोळा पाह्यला. कोन आहे गा तो ?

यंकटी–होच हो तेच. पर दादी तु त्याहीस 'त्याज' गीज नको म्हनू बा. त्याह्यच्या हाताखाली पुष्कळ लावलस्कर आहे. ते मोठे इजनेर आहेत, इजनेर.

दादी–मजका, रांडल्याक, समजतच नाही का गा ? गाडीच इंजन असते बा ! ते तो हाकलते का गा ! त्याचा बाप मोठा इस्तव मानूख होता इस्तव. मोठा इक्राळ. नाहीत नादर गिदर असल तो.

यंकटी–आव नादर कोन्या कथल्यात ? त्याहिन इंजन चालवल नाही त सर्वा गाडाच बसते अन मग सर्वे मजूर उपासी मरतेत. एकट्या पक्षी त्याहिस ज्यास्त तनखा मिळते. पाह्यला होता कहि १ हजार रुपये दरमा ?

दादी–मग तो याहि परिसहि मोठा झाला ? चांगल नाव कहाडल पोरान. पर तु कोनत काम करतेस हे त एकडावच रड.

यंकटी–मी त त्याहीकडेच आहो व.

दादी–पर कोन ? शिरस्तेदार का सुपरदंड ?

यंकटी–तुज वायकाहीस का ! उगीच खोदून खोदून विचारते बा ! कोनास सांगशील त नाही ? मी त्याहिच्या गळयाचा ताईत आहो, ताईत.

दादी–पर, बोहाऱ्या, काम त सांगशील ?

यंकटी–साहेबाचीच नाही, बाईचीहि माहयावर मोठी मर्जी. त्या मावलीन महा लग्न करून देल्ह. फळसोबणास पैसे लावले. पोराच बारस झाल तर खूब खूब केल. तीस इरोग्यापासून तर राखडी वज्रटिका पावत वाह्यल. माह्यासाठी गंगाजमनी घोत्र घेतल. पर मालकीनच्या पोराहिच्या XX घुताधुता महा टेर्पन निघते. इकडे घरच्या पोराहिच्या अन् तिकडे मालकिनच्या पोराहिच्या.

दादी–अइ अई, केवढाव सपस्कारान पोटयान आपला वह्यदा सांगितला. बरा निघाला रिसोळया. चांगला लावला माह्या नातीच्या नावाचा दिवा. आता म्या तुज कांहीं द्याव म्हनल त, पोऱ्या, माह्या जवळ देवान काहीच नाही ठेवल. जे टिचू मिचू होत, ते देऊन टाकल लहान नातीस. पर माह्या पूजेची एक सोन्यान गाठलेली माळ आहे, माळ. देईन तुज मरायच्या येळी. सुखाचा राह्य बापा ! सुनबाईस पाठवून देजो. नाही तर होच ? मी करीन काही तीस. मी खडे खडे येतो म्हनल त मज दम लागते. बोटभर चिठ्ठी तरी पाठवजो. आजकालचे पोर पोरी त हात हात बंद लिहितेत. यादीन लखोटा पाठवजो बर. सुनबाईसही पाठवजो. भुल्ू नको. जातो मी आता. मज सयपाकाची लाग्रकी आहे. वाढकोच १० वाजले कागा ? माय माय, घड्याळ तरी कागा ? तिजत सटवीस कामच नाही; चालतेच चालते.”

बालाघाट जिल्हा

महारामहारांचे बोलणें

“ कारे चिरकुट्या, तुले पाटलाचे वाड्यामंधि जाजो मनलु होतु त गेलाच नाहीं ? माह्यावर मोठा माह्यजन आत किति बोखारला. आत तरि पेज खाऊनसऱ्या लोकर लोकर जायकरे. ह्या पोराहिच्या पाई माही इज्जत फजत गली गोदरीन लागली हाये ”

भंडारा जिल्हा

“ माहेजन, मंघानि मिन म्हनलु, ह्या झिपऱ्या घराकड येह्येल. पर ह्या काह्यले मले बघते. याच का अह्य आहे. समद महाच अह्य. मी रातदीस

पायाले दोर बांधतो त याव्यचाल्या जिनगीसाठी खर म्हनल त मले नसे आत काव्यची बी फिकर. महाकोठि दिल ठयरत नाही जी, माहेजन. आता इले म्हनल का मी इठलाकड पंढरपूरच्या जत्रेले जातो, तर त्ये म्हनते "मी बी येतो." इले म्हनल तू कोठी बी वन मजूरी कर, आपले हाड घरड अन् आपली हांडी सिजव. आंबील भाकर त मिरल. पर श्ये मी जावाच नांव घेतल का भोंगाच पसरते. अन मंग माह्या जीवाच पानी पानी होते. घरामंधि खावाले कार अन भुइले भार पोट्टे आहेत. एका काडीले हात लावतील त सपेथ. पर हे आतड, माहेजन, मोठ वखुट आहे जी. देवानच लावून देल्ह. मीन बहु खाल्लून पहेनल्ह पर हे पोट्टे असे निघाले की, माइयजन, महा सर्वा खाना खराब केला याहयन."

उपसंहार

जेवढें येथवर थोडक्यांत लिहितां आलें, तेवढें लिहिलें. तरी अझून न्यायज्ञान पद्धति, सारा वसूलीची पद्धति, कर, सणवार, लष्करी संघटना, पत्रव्यवहार, किल्ले, जुनेवाडे व बागबगीचे वगैरे विषयीं लिहावयाचें राहिलें. कुटुंब वृत्तांचा-विशेषतः ब्राम्हणांच्या-तर फारच संक्षेप केला आहे. तरी एवढी जरी कृति वाचकांस आवडली, तर हीच हकीकत अधिक मुद्देसूद व विस्तारानें लिहितां येईल. किंबहुना लिहून ठेविलीच आहे. ती सुधारुन छापण्याचा हुरुप येणें हें ज्या मानानें या छोट्या कृतीचा जनतेकडून स्वीकार होईल, त्यावर अवलंबून आहे. परमेश्वरी सूत्र जसें असेल तसें होईल.

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

समाप्त

मध्यप्रदेश संशोधन मंडळ, नागपूर. (रजि.)

स्थापना २-१-१९३४

मंडळाचे अध्यक्ष—डॉ० सर भवानीशंकर नियोगी,
एम्. ए., एल्एल्. एम्., एल्एल्. डी.

कार्यकारी समिति

कार्याध्यक्ष—म. म. वा. वि. मिराशी, एम्. ए.

उपाध्यक्ष—डॉ० के. ल. दप्तरी,
बी. ए., एल्एल्. बी., डी. लिट्.
श्री. श्री. ल. पांढरीपांडे,
एम्. ए. (संस्कृत व मराठी)

कार्यवाह—दे. गो. लांडगे,
बी. ए., एल्. टी. एल्एल्. बी.
सर्टि. ए. आय्. आय्. बी. (भारत)

कोषाध्यक्ष—प्रा. पां. कृ. सावळापूरकर,
बी. ए. (टिळक) काव्यतीर्थ

सभासद—प्रा. ह. ना. नेने, एम्. ए., एल्. टी.
श्री. स. ना. कुळकर्णी, बी. ए, एल्. टी.
,, श. वा. रानडे, बी. ए.
,, माणिक के. बैतुले, एम्. ए. विशारद (हिंदी)
,, रा. पु. सगदेव, एम्. ए., एल्एल्. बी.

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२	१८	शिदखेडचे	शिदखेड येथील
३	३	बारस्त	वारसा
,,	टीप	History of Marathas P.13	New History of Marathas Vol. II P. 13
५	खालून ६ वी ओळ	च्या	मध्यें
६	१८	हात होता	दुरून हात होता
८	२०	या	'या' गाळा
१०	१५	१–७–१८४०	१५–७–१८४०
११	८	त्याना राणी	त्याना आणि राणी
,,	खालून २ री ओळ	३ रघूजी	रघुजी[३]
१२	३	राजारामसिह	जयसिंगराव
१३	२	मराठे	'मराठे' गाळा
१६	२	तेथें	येथें
,,	शेवटली	ते	'ते' गाळा
,,	७	राजारामसिंह	जयसिंगराव
१८	१२	चिमणाबाई	चिमाबाई
१९	२१	बागूल	जेथें जेथें 'बागुल' असेल तेथें तेथें 'बागल' असें वाचावे
३०	४	१७३७	१८३७
,,	६	१७३९	१८३९
३३	१	वर्डीच्या...सांपडते	हा पोट पॅरा स्वतंत्र हवा
४५	१६	१८९८	१८९२
४६	१५	जी	जी 'गाळा'